डॉ. विजया वाड

# कमीत कमी खर्चात अमेरिका



REFBK-0029503

रजि नं. ८५८७८/संदर्भ

दिलीप प्रकाशन

मराठा ... संग्रहालय
भू-प्रवास ८२०
ग्रं. क्र. २९५०३
पुाधव्द
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

भू-प्रवास
८२०
२९५०३
पुाधव्द

REFBK-0029503

REFBK-0029503

# कमीत कमी खर्चात अमेरिका

डॉ. विजया वाड



कमीत कमी खर्चात अमेरिका
प्रथमावृत्ती मार्च १९९८

© डॉ. विजया वाड.
बी- २९, ३ रा मजला,
रणजित सोसायटी, सरोजिनी नायडू रोड,
मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०.


प्रकाशक :
दिलीप वामन काळे
दिलीप प्रकाशन
३०२, दादरकर बिल्डिंग,
बांगडवाडी, व्ही. पी. रोड,
मुंबई - ४०० ००४
दूरध्वनी - ३८५ ८१५१

मुद्रक .
प्रभाकर देसाई
सुप्रिंट, ७ डी गांधीनगर,
दैनिक शिवनेर मार्ग,
लोअर परेल (प.)
मुंबई ४०० ०१३

अक्षरजुळणी :
स्वयम् टाइपसेटर्स
कुसुमबाग, पहिला मजला,
फडके रोड, डोबिवली (पूर्व) ४२१ २०१

मुखपृष्ठ / मांडणी
कमल शेडगे

मूल्य ५० रुपये



ISBN 81-86926-04-6




*प्राजक्ता-अभिजित*
*निशिगंधा-दीपक*
*आणि ओजूएंजल*
*या माझ्या अतिशय*
*आवडत्या पंचकडीस*
*हे पुस्तक सप्रेम अर्पण*

—आई

# अनुक्रम


१. कमीत कमी खर्चात अमेरिका (भाग १ ते ७) / ७
२. सेल्फ गायडेड टूर / १६
३. सुरू झाला. 'व्हूसा' प्रवास / २०
४. चित्तथरारक आणि अविस्मरणीय / २३
५. लॉसएंजेलिसकडे / २७
६. स्वस्त आणि मस्त नायगरा / ३५
७. वॉशिंग्टन डी.सी. / ४०
८. यूथ हॉस्टेल्स / ४९
९. पासपोर्ट कसा काढावा / ५३
१०. व्हिसासाठी काय करावे / ५५
११. अमेरिकन अपेक्षाभंग / ६०
१२. लाखमोलाची थप्पड / ६४
१३. ऑपरेशन बाळंतिया / ६८
१४. अगतिक / ७२
१५. बॉब दि बेस्ट / ७५
१६. टिकलेलं लग्न / ७९
१७. निरोप / ८३
१८. काही महत्त्वाचे पत्ते / ८७

# हृद्गत

आयुष्यभर नोकरी करणारी नि 'हम दो, हमारे दो' जमान्यातली आपण माणसं. सुटसुटीत कुटुंब नि पंचेचाळिशीनंतर मिळणारं थोडं 'अर्थ-स्वास्थ्य'!

परदेशी जाऊन येण्याची इच्छा मनात येणं स्वाभाविक आहे. आम्हीही जाऊन आलो. पण अगदी कमीत कमी खर्चात. कसे? तेच तर वाचा या पुस्तकात.

शिवाय अमेरिकेत जाण्यापूर्वी पासपोर्ट, व्हिसा, व्हुसा, यूथ हॉस्टेलची वर्गणी या गोष्टींची माहिती थोडक्यात दिलीय. आपल्याला त्याचा निश्चित फायदा होईल.

अमेरिकेतली माणसे जिथे जिथे हृदयाला भिडली त्यांची शब्दचित्रे सोबत आहेत. आपल्याला ती आवडतील हा विश्वास!

दिलीप वामन काळे हे नुसते माझे प्रकाशक राहिले नाहीत. मित्र, आप्त, सुहृद झाले आहेत! हे पुस्तक सुंदर स्वरूपात सादर करण्याचं सारं सारं श्रेय त्यांनाच. त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करते.

या पुस्तकातील काही भाग किर्लोस्कर, महाराष्ट्र टाइम्स, चारचौघी व केसरी यातून प्रकाशित झाला. त्या सर्वांचे आभार.

हे पुस्तक वाचून आपल्या अमेरिका प्रवासात आपले पैसे 'वाचले' तर आम्हा उभयतांना ( मी आणि डॉ. वाड ) खूप आनंद वाटेल.

आपला प्रवास सुखाचा होवो!

**—विजया वाड**

## विशेष आभार

विभाकर वाड ह्या माझ्या दिराने ह्या पुस्तकाच्या पूर्ततेसाठी
बहुमोल सूचना केल्या. त्यांचे मनापासून आभार.

# कमीत कमी खर्चात
# अमेरिका कशी बघाल
# याचे खुमासदार प्रवासवर्णन

# कमीत कमी खर्चात अमेरिका

प्रत्येक सुशिक्षित घरातलं एक मूल हल्ली अमेरिकेत असत. त्यामुळे अमेरिका हल्ली खूपच 'जवळची' झाली आहे पूर्वी माझे पती सैन्यात असताना मी ऐकलं होतं की पंजाबातलं घरटी एक मूल सैन्यात असतं आणि त्या गोष्टीचा पंजाबकरांना आत्यंतिक अभिमान वाटतो. काय माझं हृदय भरून आलं होतं ते ऐकून!

माझा मुलगा मी सैन्यातच घालणार होते.

पण दोघी मुली झाल्या. . आणि आपापले व्यवसाय त्यांनी स्वतःच्या आवडीप्रमाणे निवडले. मोठी प्राजक्ता सर्जन झाली आणि आणखी शिकायचं म्हणून अमेरिकेस गेली.

लेकीची पाठवणी करायला मी गाठोडं बांधून बसले होते. पण ती म्हणाली, '' थोडी थांब! योग्य वेळ येताच बोलावते.''

ती 'योग्य' वेळ आली आणि आम्ही निघालो की!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ...८२०...
२१५०३
५०८८१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

कितीही हौस वाटली तरी पैशाची सोंगं काही आणता येत नाहीत आणि मास्तरकीत भरपूर आदर नि खूप कमी पैसे मिळतात.

कधी याबद्दल खंत वाटली की आमच्या डायरेक्टर जय गोदरेज शिक्षकांचे सात्वन करीत म्हणायच्या, ''यू हॅव नॉक्ड द डोअर ऑफ रिस्पेक्ट. व्हेअर ॲज युवर स्टुडंट्स हॅव नॉक्ड द डोअर ऑफ मनी!''



किती खरं आहे ते!

जावई म्हणाला, ''तिकिटाचे पैसे मी पाठवतो. काळजी करू नका.'' त्यामुळे पुढचं बजेट एकदम हलकं हलकं झालं.

पण त्याचे पैसे कमीत कमी खर्चले जावे नि माझेही वाचावे अशी कोकणस्थी इच्छा माझ्या मनात

स्वाभाविकपणे होतीच.

''येताना 'व्हूसा'चं तिकीट घेऊन या.'' माझी लेक म्हणाली. मला तोवर व्हूसा म्हणजे काय याची कल्पना नव्हती. व्हूसा म्हणजे व्हिजिट यू एस ए हे कळलं आणि मग व्हूसा कुठे मिळतो याची मी चौकशी करू लागले. माझ्या यजमानांनी भरपूर पत्ते जमवले एजंटस्‌चे. आता येथूनच खरी 'कमोत कमी खर्चात अमेरिका' वारीला सुरुवात झाली.

आमच्यासारखे मध्यमवर्गात जन्मलेले आणि आता थोड्याशा बऱ्या सांपत्तिक स्थैर्यापर्यंत पोचलेले बरेच जण आमच्या ह्या 'स्वस्त आणि मस्त' सफरीचा रेडीमेड गाईड म्हणून उपयोग करू शकतील.

## भरपूर डिस्काउंट

तर आमचा अनुभव असा होता की मोठमोठ्या कंपन्या बुकिंग करतात खरे.. पण पैचेही कन्सेशन देत नाहीत. आम्ही मात्र अशा एजंटाच्या शोधात होतो की जो विश्वसनीय असेल आणि आम्हाला जास्तीत जास्त कन्सेशन देईल. तेव्हा आम्हाला असा अनुभव आला की त्यांच्यात्यांच्यात भरपूर कॉंपिटीशन आहे, आणि त्याचा फायदा आपल्याला होतो. तिकिटावरचा छापलेला दर आणि तुम्हाला भरावे लागणारे पैसे यात खूप फरक असतो. अगदी हजारोंच्या घरात.

आमची बोलणी तीन एजंट्सशी चालू होती. शेवटी आरगिल ट्रॅव्हल्सच्या उपेंद्र शहा या एजंटने आम्हाला सर्वात स्वस्त म्हणजे सव्वीस हजारामध्ये रिटर्न तिकिटे दिली. ती मुंबई ते न्यूयॉर्क आणि न्यूयॉर्क ते मुंबई अशी होती. अर्थात आमचा जाण्याचा दिवस आणि तिकिटे बुक करण्याचा दिवस यात बरोबर एक महिन्याचा अवधी होता. आम्ही २४ फेब्रुवारी १९९६ रोजी भारतातून निघालो. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात तसेच मे महिन्याच्या काळात वेगवेगळ्या विमान कंपन्या डिसकाउंट ऑफर्स जाहीर करतात. त्याकडे नजर हवी तिकीट जितके लवकर बुक कराल तितका आपलाच फायदा. कारण डिस्काउंट अधिक!

आमचे एजंट उपेंद्र शहा यांनी सांगितले की स्वस्त तिकिटे देतो; पण त्यासाठी तुम्हाला दुबईपर्यंत इमिरेट्सने आणि नंतर केएल्एमने (KLM) प्रवास करावा लागेल. म्हणजे मुंबई ते दुबई एक विमान, दुबई ते ॲमस्टरडॅम दुसरे विमान आणि ॲमस्टरडॅम ते न्यूयॉर्क तिसरे विमान।

बापरे!

आणि आमच्या त्या मोठ्या मोठ्या बॅगा?

माझ्या पोटात गोळाच उठला!

मी उपेंद्रला माझी भीती बोलून दाखवली तेव्हा तो म्हणाला, '' काळजी नको. इथे सामान त्यांच्या ताब्यात दिलेत की ते सर्व सामान तुम्हाला थेट न्यूयॉर्कला मिळेल.''

तरी सुद्धा मला सामानाची भीती वाटतच राहिली. ती त्याने माझ्या चेहऱ्यावर स्पष्ट वाचली असावी. कारण तो म्हणाला, '' लगेज अगदी सुरक्षित राहते. आणि ते जर का मिसप्लेस झाले तर उलटे तुमचे भाग्यच! कारण ते अगदी स्वखर्चाने तुमच्या घरी पोचवतात.''

मी अगदी खरंच सांगते तुम्हाला की त्या क्षणी मला तो जे सांगत होता त्या सगळ्या तद्दन बाता वाटल्या. पण मग पुष्कळ जणांचे अनुभव नंतर ऐकायला मिळाले. आणि उपेंद्रचे सांगणे खरे आहे हे कळले.

आता व्हूसा याने की व्हिजिट यू. एस्. ए. ची तिकिटेही आम्ही उपेंद्रकडेच बुक केली. एकूण सहा स्टेट्स बघता येतील अशी त्यात योजना होती.

त्याने आम्हाला एक योजना दिली. तशीच्या तशी ती आपल्या माहितीसाठी देत आहे.

न्यूयॉर्क ते ऑरलेन्डो,
ऑरलेन्डो ते पिट्सबर्ग ( हा फक्त थांबा ) ते लॉसएंजेलिस,
लॉसएंजेलिस् ते सॅनफ्रॅन्सिस्को,
सॅनफ्रॅन्सिस्को ते पिट्सबर्ग ( हा फक्त थांबा ) ते बफेलो,
बफेलो ते वॉशिंग्टन,
आणि वॉशिंग्टन ते न्यूयॉर्क!

यात आम्हाला ऑरेलेन्डो येथे डिस्नेवर्ल्ड बघायला मिळणार होते. डिस्नेलँड होती लॉसएंजेलिस येथे. तेथे ' मिकीज टूनटाऊन' बघण्यासारखे होते आणि जगप्रसिद्ध हॉलिवूड, युनिव्हर्सल स्टुडिओ यांचे दर्शन घडणार होते. सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये अगदी प्रत्येक इंग्रजी सिनेमात दिसणारे गोल्डन गेट, पिअर थर्टीनाईन हे शॉपिंग सेंटर आणि तो आगळा वेगळा क्रुकेड स्ट्रीट पाहायला मिळणार होता. नंतर बफेलो! सगळ्या जगातल्या पर्यटकांचे आकर्षण असलेला नायगराचा धबधबा बफेलो इथे होता. वॉशिंग्टन डी. सी. ही अमेरिकन लोकांची गर्वभूमी! तिथे तर दिमाखदार व्हाइट हाऊस, लिंकन मेमोरिअल, वॉशिंग्टन मेमोरिअल, जगप्रसिद्ध स्मितत्सोनिअज म्युझियम्स, केनेडींची समाधी. कितीतरी बघणीय गोष्टी! तिथून परत आकाशमार्गे न्यूयॉर्क. स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याचे गाव. जगप्रसिद्ध आणि गर्विष्ठ मॅनहटनची स्कायलाईन मिरवणारा अमेरिकेचा महाश्रीमंत भाग! या संपूर्ण 'व्हूसा'चे तिकीट

आम्हाला भारतात प्रत्येकी केवळ सोळा हजार पाचशे रुपयांस पडले. सर्व प्रवास विमानाने!

भारतातूनच 'व्हूसा' काढणे कमालीचे स्वस्त पडते हे प्रत्येक पर्यटकाने लक्षात ठेवण्याजोगे आहे.

एकूण तिकिटांचा असा डोळस व्यवहार संपला.

आम्ही खूष होतो. पण ही सगळी पुढची तिकिटे खरी असतील ना? ही मध्यमवर्गीय भीती मनात होतीच. पण ती पुढे वितळली.

बरोबर नेण्यासाठी आम्ही अकराशे डॉलर घेतले दोघांचे मिळून. त्यावेळच्या म्हणजे १९९६ च्या फेब्रुवारी महिन्यात त्यांचा भाव होता ३६ रु. प्रती डॉलर. त्यामुळे त्यावेळच्या भावाप्रमाणे ३६ x ११०० = ३९,६०० रु. भरून ते फॉरेन एक्सचेंज मिळवावे लागले. म्हणजे एकूण तिकिटांचे दोघांचे मिळून बावन्न हजार + व्हूसाचे दोघांचे मिळून ३३ हजार आणि हे ३९,६०० असे एकूण एक लक्ष चोवीस हजार सहाशे रुपये दोघांनी मिळून खर्च केले.

## यूथ हॉस्टेलची मेंबरशीप

आम्ही घेतलेल्या अकराशे डॉलर्समध्ये तो प्रचंड प्रवास उरकेल का? . असं आम्ही दोघे एकमेकांना विचारीत होतो. या वेळी विभाकर वाड हे माझे उत्साही दीर देवदूतासारखे आमच्या प्रवासी योजनेत अवतरले. त्यांनी सांगितले की आम्ही यूथ हॉस्टेलचे मेबर होणे गरजेचे आहे. तेही १ वर्षासाठी फक्त चाळीस रुपये प्रत्येकी देऊन!

मी चकित झाले. विभा जे सांगत होता ते आश्चर्य वाटण्याजोगेच होते मी म्हटले, ''अरे विभा, मी नि तुझे बंधू आता फक्त मनाने तरुण आहोत. आमच्या मुलीच आता चवीस नि सव्वीस वर्षाच्या झाल्यावर आम्ही कसे काय बुवा यूथ हॉस्टेल्सचे मेंबर होऊ शकू?''

विभा यावर हसला. म्हणाला, ''अग वैनी, अगदी पासष्ट सत्तरीला सुद्धा यूथ हॉस्टेलचे मेबर होता येते.''

त्या तुलनेत मी फारच तरुण वाटून उत्साहाने फॉर्म भरला. विभाने आमचे फार मोठे काम केले. ह्या इंटरनॅशनल मेंबरशीपचा आम्हाला पुढे इतका उपयोग झाला की मी प्रत्येकाला आता आवर्जून सांगते,

''प्रवासाला निघताय? मग आधी यूथ हॉस्टेलचे मेंबर व्हा!''

तर जेहेत्ते कालाच्या ठायी आम्ही प्रयाणाला सिद्ध झालो. ट्रॅव्हल लाईट वगैरे सगळे खरे असले तरी लेकीसाठी घेतलेला खाऊच इतका प्रचंड होता की मला

शिवाजीच्या पेटाऱ्याची आठवण झाली. हे सारे सामान आम्हाला न्यूयॉर्कला मिळणार होते म्हणून बरे!

आमचे स्वत:चे कपडे मात्र आम्ही चार-चारच घेतले. गरम कपडे मात्र भरपूर!

**दीड डॉलरचा चहा!**

विमान प्रवास या आधी मी तसा केला होता. नाही असे नाही. पण फक्त दिल्ली येथे दोन वेळा. एकदा काठमांडूला आणि एकदा मुंबई-बंगलोर. हा प्रवासही चारचार वर्षांच्या अंतरानं झालेला. एरवी आपली करोडों की लोकल मेरी जान की सहेली! त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळावर जरा बुजल्यासारखे वाटले. अगदी पोरसवदा वयाची मुलं आपल्यापेक्षा अधिक आत्मविश्वासाने आणि अगदी सहजतेने इमिग्रेशन... कस्टमसचे व्यवहार करताना बघून एकदम नर्व्हस व्हायला झालं. मग मनाशी निश्चय केला. आपल्याला काय कमीय? आपल्याला इंग्लिश फाडता येत. मुंबैत जन्म गेला. लेट अस बी स्मार्ट.

छाती पुढे काढून सर्व व्यवहार पार पाडले... आणि विमानात बसलो. माझी धाकटी मुलगी निशिगंधा ही इमिरेट्सची लोकल प्रवासिनी आहे. तिची 'दास्तान' नावाची झी-अरेबिया करीत असलेली मालिका शारजा येथे शूट होते. त्यामुळे ती सदैव येत-जात असते तिकडे. विमानातल्या सुंदरींनी निशूचे आईवडील म्हणून आमची आस्थेने बडदास्त ठेवली. कारण त्यांना तिचे काम आवडे. आमचा आत्मविश्वास आणखी दुणावला. दुबईला पहिला थांबा होता.

नंतर KLM ने आम्ही ॲमस्टरडॅमला गेलो.

''आता चहा हवाच!'' विजय म्हणाले.

एअरपोर्टवर आम्हाला आठ तास काढायचे होते ना!

मला चहाची तल्लफ कमी! जवळजवळ नाहीच म्हणा ना! खादाड मात्र भरपूर. मी हँडबॅगमधून चकली, चिवडा काढला. बेसनलाडू हादडला.

विजय मात्र बारीक चेहरा करून परतले.

''काय झालं?''

''अग, चहा दीड डॉलरला आहे.''

''म्हणजे चौपन्न रुपये?''

''हो ना!''

''बाप रे!''

''मी पाणी पितो.''

''नको. चहाच प्या. दीड तर दीड!'' असं म्हणत हिय्या करून तो अकराशेतला

दीड डॉलर आम्ही संपवला. पहिला दीड डॉलर! त्या चहात दूधही नव्हते. मिल्कबॅग्ज मागितल्या तर देतात हे समजले, तोवर चहा पिऊन संपला होता.

ॲमस्टरडॅमच्या भव्य एअरपोर्टबाहेर बर्फाचे ढीगच्या ढीग पहुडले होते. आत मात्र छान उबदार होते. तिथल्या शॉपमधून एक दाढी करायचे यंत्र घ्यावे अशी इच्छा माझ्या नवऱ्याला झाली. पण एकोणतीस डॉलर... म्हणजे दहाशे चव्वेचाळीस रुपये ही किंमत ऐकून आम्ही परत फिरलो. प्रत्येक डॉलरची रुपयात किंमत काढण्याचे हे वेड अमेरिकेत फिरता फिरता पुढे विरून कधी गेले ते आमचे आम्हालाच समजले नाही.. आणि निघताना तर रुंद हसत आम्ही एकमेकांना सांगू लागलो. '' घे घे. ओनली नाईन्टी नाईन सेंट्स.'' अमेरिकन शॉपकीपर्स मोठे धूर्त असतात. प्रत्येक एक डॉलरची वस्तू नाईन्टी नाईन सेंट्सला विकून ते गिऱ्हाइकं गोळा करतात. आणि आपणही नको असलेल्या अनेक वस्तू घेऊन बावळटासारखे खुशीत परततो. 'ओन्ली नाईन्टी नाईन सेंटस्' करीत! त्या दुकानांची नावंच मुळी 'नाईन्टी नाईन सेंट्स' अशी.

ॲमस्टरडॅमला चांगले आठ तास होतो आम्ही. पण बाहेर फिरण्यासाठी व्हिसा आवश्यक होता. तो भारतातच काढायला लागतो हे तेथे समजले आणि मन जरा खट्टू झाले. 'सिलसिला' नावाचा अमिताभ रेखाचा सिनेमा मी बघितला होता. त्यांचं प्रेमगाणं ॲमस्टरडॅमला ट्युलिप्सच्या गच्च ताटव्यात चित्रित केलं होतं. काय सुंदर होते ते सिनेमातले रंगीबेरंगी गालिचे! चांगले बघितले असते... पण. व्हिसा!

हाच व्हिसा मिळताना मनात कोण धाकधूक होती. रात्री बारापासून फुटपाथवर नंबर लावले होते. माझा एक माजी विद्यार्थी माझ्यासाठी नंबर लावून उभा होता. मी त्याला पहाटे चारला सोडवला होता.

अमेरिकन एम्बसीच्या बाहेर कितीतरी धनिक माणसं वर्तमानपत्राच्या घडीवर फुटपाथवर बसलेली दिसतात. कारण व्हिसा!

परदेशी जायचा हा परवाना इतका जाचक असेल याची मला कल्पना नव्हती. अनेकांनी अनेक सल्ले दिले होते. तिथे इंटरव्ह्यूत सांगू नका.. मुलीच्या बाळंतपणाला जातोय म्हणून. ताबडतोब रिजेक्ट करतील!

''का?''

''अहो, तिथल्या बेबीसीटरचा जॉब जातो ना तुमच्या तिथे जाण्यानं!''

अरे बापरे. असं आहे काय!. माझ्या डोक्यात प्रकाश पडला होता.

आम्ही जेव्हा प्रत्यक्षात खिडकीपाशी पोचलो तेव्हा मात्र मी क्षणार्धात ठरवले.. सारे आहे ते खरे सांगायचे. आपण कायम थोडेच चिकटायला चाललोय त्यांच्या

देशाला? लेक बघू. लेकीचं बाळ बघू. देश बघू नि येऊच की तीन महिन्यांनी परत.

माझी शाळा, नवऱ्याची डिस्पेन्सरी!

मेरा भारत महान.

काही एवढं बोलावंच लागलं नाही.

माझ्या नवऱ्यानं हौसेनं फाईलमधे त्याचं आर्मीचं सर्टिफिकेट लावलं होतं. आणि माझ्या फाईलमध्ये जावई आमचा तिथला खर्च करू शकेल असं बँकेचं स्टेटमेंट होतं. बस्. मिळाला की मास्तरीणबाईंना व्हिसा!

उगाच बाऊ करतात झालं...

असं मी म्हणणार इतक्यात माझ्या मागचे नऊच्या नऊ गुजराथी 'नकार' घेऊन परतले.

बहुधा आमची भटजी छाप व्यक्तिमत्त्वं बघून हे काय अमेरिकेत राहून आपल्याला गंडवणार?... असं त्या खिडकीमागच्या गोऱ्या अधिकाऱ्याला वाटलं असावं. शिवाय ते आर्मीचं सर्टिफिकेट बघून तो सद्गदित झाला असावा. कारण नवरा भारत-पाक युद्धात सहभागी! त्याला रक्षा मेडल! त्याच्या नोंदी! .

कधी नव्हे तो अमेरिकन एंबसीत मला नवऱ्याचा अभिमान वाटला होता. पण शहाण्या बायका तो चेहराभर दाखवीत नाहीत. मीही तो लपवला.

हा व्हिसा मिळाल्याच्या आनंदात आम्ही ॲमस्टरडॅमच्या व्हिसाचं विसरूनच गेलो नि तिकिटांच्या मागे लागलो ना!

त्या ट्युलिप्सच्या बागेत आपला एक रंगीत फोटो काढायची माझी सुप्त इच्छा तशीच काचेतून दिसणाऱ्या बर्फाच्या ढिगात गाडली गेली.

मग काय?

वेळ काढण्यासाठी मी एखाद्या लहान मुलीसारखी सरकत्या जिन्यावर वरून खाली नि खालून वर जात राहिले. इथे ओळखीचं कुणीच नसल्याने मज्जा करून घेतली.

नवऱ्यानं खुणा करून बोलावलं, तशी मी आश्चर्यानं तो बसला होता त्या बाकड्याकडे गेले.

''आता वेडेपणा पुरे!'' तो म्हणाला.

''का?''

''सरक जिन्यावर साडीत पाय अडकून नीता वैनी पडली होती नि तिचा पाय फ्रॅक्चर झाला होता. तस्सं परत यावं लागलं भारतात.''

"अरे बापरे! मी विसरलेच होते."

"आता एका जागी बैस. लेकीचं बाळंतपण करायचं आहे ना?"

"हो." असं म्हणून मी आसन जमवलं नि पुन्हा हँडबॅग उघडली. पोतडीतला 'श्यामच्या आई'चा खाऊ बराच खपला. न्यूयॉर्कला जायला आम्ही सज्ज झालो.

एक फोन लेकीला करावा अशी इच्छा झाली. आम्ही पाच डॉलरची डच नाणी करून घेतली. येथे आधी पैसे टाका नि मग फोन फिरवा ही सिस्टिम. मला आपल्या पब्लिक टेलिफोनचा धसका. एकेक रुपया कितीदा वाया जातो. नाही का? आपले पब्लिक टेलिफोन आणि वजनाचे काटे, एकेक रुपया गिळून ढम्म होतात हा माझा नित्यानुभव! म्हणून तर मी बिचकत होते.

मनात आणखी शंका!

आपण नाणी टाकली आणि फोन नाही लागला तर?

एंगेज असला तर?

माझी घालमेल एका जर्मन माणसाच्या लक्षात आली. तो शेजारीच फोन करीत होता.

मला म्हणाला, "डोंट वरी. फोन लागला नाही तर हे बटण दाबायचं. सर्व नाणी व्यवस्थित परत मिळतील."

खरंच सांगते... मला अगदी लाज वाटली.

चेहरा इतका बोलू लागला तर पंचाईत ना!

मग मात्र मी फोनपाशी लिहिलेल्या सर्व सूचना नीट वाचल्या नि फोन केला. तो अगदी व्यवस्थित लागला.

तिच्याशी आम्ही दोघं बोललो तेव्हा तिलाही खूपच आनंद झाला. आईबाबा आपल्याला आता लवकरच भेटणार, या कल्पनेनं ती किती आनंदली होती!

आम्ही विमानात बसलो.

के.एल्.एम्. चे जेवण त्याच त्या चवीचे. त्या डीश मला फारशा आवडल्या नाहीत. नवऱ्याला मात्र बऱ्या वाटल्या. मी जेवण्यापेक्षा झोपणे पसंत केले.

न्यूयॉर्कच्या जे. एफ्. केनेडी या भव्य विमानतळावर आम्ही पोचलो नि मला एकदम भारतात सोडलेल्या आमच्या मोठ्या मोठ्या बॅगांची.. लगेजची आठवण झाली. सरकपट्ट्याकडे आम्ही धावलो. आपल्या बॅगा लवकर ओळखू याव्यात म्हणून आम्ही त्या वरल्या अंगाला शेंदरी रंगाच्या प्लास्टिकच्या दोरीने बांधल्या होत्या. गावठी दिसल्या तर दिसल्या आपल्यासारखी खूण कुणाचीच नसणार. ये

अंदर की बात!

पण शेदूर सोडून सगळ्या बॅगा सरकपट्टीवर मंडलाकार फिरत राहिल्या.

"तू दुबईला लगेच चेक करायला हवं होतंस." मी रागानं नवऱ्याला म्हटलं.

"तू आठवण करायला हवी होतीस." त्यानंही चापलं.

"आता रे?"

"उपेंद्र शहा म्हणाला ना. तशा फुकटात बॅगा घरी येणार बहुधा."

"आय होप सो! पण ताईचा खाऊ मला तिला पोचल्या पोचल्या द्यायचा होता."

आम्ही निराश मनानं तिथे उभे होतो. सरकपट्ट्यावरले सगळे लगेज उतरले. आणि धाडधाड नवे लगेज त्यावर लागले.

"आपल्या बॅगा ऽऽ" नवरा ओरडला. मी धावलेच. तो ट्रॉली घेऊन सज्ज झाला.

विजयी वीरांसारखे आम्ही कस्टम्स पार करून बाहेर आलो. डोळे लेकीला शोधत होते.

आणि ती दिसली.

आमची लाडकी ताई तिच्या नवऱ्याचा हात हातात घेऊन आमची वाट बघत तिथे उभी होती.

डोळे भरून आले. ती बाबांच्या कुशीत शिरली आणि माझा हात तिनं गच्च पकडून ठेवला.

मी तिच्याकडे डोळाभर पाहत होते. तिचे पोट खूपच वर आलेले दिसले आणि माझ्यातली आई मनात म्हणाली . आता फारसा विलंब नाही!

विमानतळ अतिशय उबदार होता, पण बाहेर पडलो तर न्यूयॉर्कने हवामानाचा पहिला हिसका दाखवला. बाहेर कडाक्याची थंडी आणि बोचरे वारे अंगाला झोंबत होते. बर्फ इथे तिथे साचलेला दिसत होता. माझ्या जावयाने आमच्यासाठी मोठेमोठे पुलओव्हर्स आणले होते म्हणून फार बरं वाटलं.

प्राजक्ताला मुलगा होऊन तो दीड महिन्यांचा होईपर्यंत आम्ही दोघं तिच्या तैनातीत होतो. तिचे दोन वर्षांत राहिलेले सर्व लाड पूर्ण करीत होतो. तिच्या बाळंतपणाच्या वेळी आलेले अगदी वेगळे अनुभव मी पुस्तकात पुढे उद्‌धृत केले आहेत. पण ह्या भागात आपण पाहायचे आहे ते हजार डॉलर्स आणि 'व्हूसा'कडे.

तर त्याकडे वळूया.

## सेल्फ गायडेड टूर

सबंध 'व्हूसा'चा प्रवास आम्ही दोघांनीच करायचा निर्णय घेतला होता. मनात थोडी धाकधूक होती. आपण दोघेच दोघे या परमुलखात भटकणार तर बावळटपणा व्हायला नको म्हणून मग न्यूयॉर्कची सेल्फ गाइडेड टूर आम्ही दोघांनी करायचे ठरविले.

न्यूयॉर्क शहर भले विस्तीर्ण आहे आणि येथे मुंबईसारखेच ट्रेनचे मोठे जाळे आहे. फक्त दीड डॉलर्समध्ये कुठूनही कुठेही जाता येते. ही मोठीच सोय! दीड डॉलर दिला की एक चपटी पितळी गोल चकती देतात. ती फलाटात शिरण्याअगोदर फटीत सरकवायची की लगेच शिटी वाजते. मग ताबडतोब फलाटाकडे जाणारा दांडा ढकलायचा. हेच तिकीट! सगळे लोक तिकीट घेऊनच जातात. पण काही गुंड माणसं, ज्यांना तिकडे कल्लू म्हणतात, ती दांड्याच्या वरून ढांगा मारून जातात. एक गोष्ट लक्षात ठेवायची आपण. तिथे कृष्णवर्णीय लोकांना नीग्रो कधीही म्हणू नका. त्यांचे माथे 'नीग्रो' या शब्दाने भडकते. आणि शूट करायलाही ती मागेपुढे बघत नाहीत. मग कशाला हवंय ते झंझट? कल्लूंची दंडेलशाही जिथे तिथे चालतेच. आपण त्या गावचेच नाही असे दाखवत पुढे सरकायचे म्हणजे झाले. शिवाय सारेच कृष्णवर्णीय काही गुंडागर्दी करीत नाहीत.



इथे एन् रूट, आर् रूट असे रूट आहेत. आम्ही एन् ट्रेन पकडली आणि स्टॅटन आयलंडला उतरलो. इथल्या गाड्या फलाटाशी समांतर असतात. म्हणजे तितक्याच उंच। अपंग व्यक्तीला व्हीलचेअरसकट आत येता यावे, वृद्ध माणसांना सहजपणे प्रवेश करता यावा यासाठी ही सोय. सर्व दरवाजे बंद झाले की गाडी स्थानक सोडते. पूर्णपणे वातानुकूलित असते. प्रत्येक डब्यात सीकर्स असतात

आणि ते मुख्य म्हणजे नियमित वापरले जातात. स्टेशन कुठले आले, गाडी मधेच थांबवावी लागली तर त्याचे कारण काय? ती केव्हा सुटेल? सगळे सांगितले जाते.

स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा बघण्यासाठी स्टॅटन आयलंडला उतरावे लागते. आणखी विशेष म्हणजे न्यूयॉर्क शहराचा नकाशा प्रत्येक स्टेशनात बुकिंग क्लार्कजवळ फुकट मिळतो. त्यात प्रेक्षणीय स्थळांची व्यवस्थित माहिती कळते. शिवाय स्टॅटन आयलडला उतरल्याबरोबर मोठमोठ्या पाट्या होत्याच. फेरी बोटीकडे जाणारी वाट या जिन्याने आहे. मार्गदर्शक सूचनांचे हे फलक आपल्या छत्रपती शिवाजी टर्मिनसलाही हवेत असे आग्रहपूर्वक सांगावेसे वाटते. क्रॉफर्ड मार्केट, युनिव्हर्सिटी, मंत्रालय, चर्चगेट किती तरी महत्त्वाची ठिकाणे आहेत. त्यांचा नकाशा ठळकपणे चित्रित केलेला असायला हवा.

आम्ही मार्गदर्शित जिन्याने बाहेर पडलो. बाहेरच गाड्या होत्या जेवणाच्या. दुपार झाली होती म्हणून म्हटले घ्यावे जेवून. स्टॅटन आयलंडला फूडसेटर्सही भरपूर आहेत. तिथे पाच डॉलर्सना जेवण मिळते. पण गाडीवर अडीच डॉलर्समध्ये जेवण मिळाले. मला अगदी आपल्या वडापावाच्या गाड्यांची आठवण झाली. इथे वडा नव्हता. चिकन होते. ब्रेड होता. भातही होता. माझ्या नवऱ्याने भाजी घेतली तरी त्यालाही अडीच डॉलरच लागले. फेरी बोटीसाठी आम्ही पोटोबा तुडुंब करून उभे राहिलो. तिथे मात्र लांबच लांब रांग असते आणि फेरी बोटी दीडनंतर बंद होतात. तेव्हा वेळेच्या बाबतीत आपण सावध असायला हवे. फेरी बोटीचे तिकीट ७ डॉलर्स आहे. म्हणजे 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी' बघायचा प्रत्यक्ष खर्च ७ डॉलर्स. एकदा फेरी बोटीत बसलात की ती तुम्हाला स्वातंत्र्यदेवतेपर्यंत नेऊन पोचवते आणि परत देखील आणते. वेगळे पैसे नाहीत. ७ डॉलर्समध्ये स्वातंत्र्यदेवता प्रसन्न! शिवाय हवे तेवढे फोटो काढा! कॅमेऱ्यासाठी पैसे उकळत नाहीत. भारतात आपण जागोजागी कॅमेरा आत न्यायला पैसे मोजतो. इकडे लोक व्हिडिओ शुटिंगही फ्री ऑफ चार्ज करू शकतात. अर्थात यंत्र आपले हवे. फेरी बोटीवरही जेवण मिळते. पण ते अत्यंत महाग आणि बेचव असते. म्हणून स्टेशनावर गाडीवाला झिंदाबाद म्हणावे!

स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा म्हणजे खरोखर जगातले एक आश्चर्य आहे, हे त्याच्याकडे बघितल्यावर उमगते. भव्य दिव्य अगदी! तिच्या स्कर्टपर्यंत जायला लिफ्ट आहे. पण त्याहून पुढे.. म्हणजे तिच्या मस्तकापर्यंत जायचे असेल तर चारशे नव्वद पायऱ्या चढायची तयारी ठेवा! आधीच इशारा दिला जातो.

मी म्हटलं, आपण पुन्हा पुन्हा इथे थोडेच येणार आहोत? चढूया पाहूया. नवराही तयार झाला. चढलो. अगदी मस्तकी पोहोचण्याचा रस्ता निरुंद आहे नागमोडी आहे खाली नजर गेली तरी भय वाटते. चढता चढता माझा आखडलेला गुडघा मोकळा झाल्याचा मला साक्षात्कार झाला. आनंदले वरून, म्हणजे स्वातंत्र्यदेवतेच्या मुकुटातून दिसणारे न्यूयॉर्क आणि न्यूजर्सी बघून डोळ्यांचे पारणे फिटले. मोठे विहंगम दृश्य!

खाली आलो तेव्हा हलके हलके वाटत होते पाय. आणि घरी गेलो तेव्हा ते चक्क बोलू लागले होते पायात गोळे येऊन मी बेजार झाले एकूण तो मुकुट प्रवास मला गोळेबंद करून गेला

तेव्हा एक लक्षात ठेवायचं, ज्यांना दोन दिवसातच न्यूयॉर्क आख्ख पालथं घालायचंय त्यांनी मुकुटमण्याचा मोह सोडून स्कर्टपर्यंत लिफ्टने जाणे श्रेयस्कर.

अशी स्वातंत्र्यदेवतेची सफर दीड + दीड डॉलर्स ट्रेन (जाता-येता), ७ डॉलर फेरी बोट- एकूण दहा डॉलर्समध्ये होते. जेवणाचे आपण खर्चू तसे.

**चायना टाऊन**

न्यूयॉर्क शहरात चायना टाऊन ही आणखी एक मोहनगरी आहे. जगभरातल्या वस्तू मिरवणारी. इथे खास चायनीज जेवण पाच डॉलर्समध्ये मिळते. इथली घड्याळ तर अतिसुंदर असतात. अवघ्या ९ डॉलर्समध्ये मिळणारी. अंध लोकांसाठी टॉकिग वॉचहो फार सुंदर मिळतात माझी मैत्रीण विभा हिच्यासाठी मी एक टॉकिंग वॉच खरीदले चायना टाऊन खरेदीसाठी फार छान आहे. मात्र इथे भरपूर बार्गेनिग चालते हे लक्षात ठेवा: न्यूयॉर्कमधील इलेक्ट्रॉनिक शॉप्सही खरेदीसाठी अत्युत्तम आहेत स्टेन वे नावाचा प्रसिद्ध रस्ता जगभरचा बाजार इथे भरवतो. आणि पाहताना हे घेऊ की ते घेऊ असे अगदी वेडे व्हायला होते ओनली नाईन्टी नाईन सेंट्स असा बोर्ड मिरवणारी आणि अगदी दुकानात ठेवलेली प्रत्येक वस्तू खरोखर तेवढ्याच किमतीला देणारी दुकाने स्टेनवे वर भरपूर आहेत. आपल्याकडे मिळतात तसे हॉट डॉग इथेही भाजून देतात. फक्त ते गोमांस असते. दोन डॉलरला गाडीवर मिळतात आणि बऱ्यापैकी चवदार असतात येथे सोन्याचांदीचे दुकान अगदी उघड्यावर दागिने मिरवते. वाटेल त्याने हाताळावे पण बंदूकधारी शरीररक्षक तेथे उभा असतो. प्रत्येक दुकानात व्हिडिओ कॅमेरा गिऱ्हाइकांच्या हालचाली टिपत असतो जगातली सर्वात उंच इमारत वर्ल्ड ट्रेड सेंटर न्यूयॉर्क येथेच आहे अतिशय बघण्यासारखी आहे. आम्ही गेलो तेव्हा एका शाळेची ट्रिप तेथे आली होती. मुले इयत्ता चौथीमधील होती पण प्रत्येकाच्या हातात एक प्रश्नावली होती काय पाहाल? त्याच्या सूचना

आधी आणि प्रश्नावली नंतर. त्यातल्या प्रत्येक मुलाने अगदी टिपून परदेशस्थ नागरिकांशी हस्तांदोलन केले. शिवाय रांगेत उभी मुले वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे चित्र सुद्धा काढीत होती या नोंदी माझ्यातल्या शिक्षिकेला फार महत्त्वाच्या वाटल्या. आपल्याकडल्या सहलीना असाच अर्थपूर्ण आकार असला पाहिजे असे आवर्जून वाटले. वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गच्चीवरून (जगातील सर्वात उंच गच्ची) न्यूयॉर्क आणि न्यूजर्सीतली ती घरे अगदी विमानातून बघावे तशी इवलाली दिसतात. नजर फिरते. चहूबाजूंनी सुरक्षारक्षक अर्थातच असतात.

न्यूयॉर्कच्या सबरेलने ही सर्व ठिकाणे केवळ दीड डॉलरमधे जोडली जातात. तेव्हा ट्रेन झिंदाबाद!

माझी मुलगी तेथे असल्याने मला राहण्याचा, जेवणाचा खर्च आला नाही. पण इतर पर्यटकानी यूथ हॉस्टेलचा लाभ घ्यावा. कारण पुढील पुष्कळशा प्रवासात आम्ही तेच केले.

यूथ हॉस्टेल्स कमालीची स्वच्छ आहेत. टॉयलेट्स घरच्याइतकी प्रसन्न आणि चकचकीत आहेत. चादरी, पांघरुणे भट्टीची मिळतात. शिवाय मेंबरर्सना केवळ १८ डॉलर्सना राहणे, कॉफी, माफक नाश्ता आणि गरम पाणी स्नानाला मिळण्याची सोय! क्या बात है! खरं ना? हॉटेलात राहाल तर किमान ऐंशी ब्याऐंशी डॉलर्सना खड्डा! कारण न्यूयॉर्क, वॉशिंग्टन डी.सी. ही अत्यंत महागडी शहरे आहेत. यूथ हॉस्टेलमध्ये गॅस फुकट वापरता येतो. अर्थात जेवणाचा. तुम्ही डाळ तांदूळ नेऊन अगदी गरमागरम खिचडी पकवू शकता. म्हणजे जेवणही चकटफू!

## सुरू झाला 'व्हूसा' प्रवास

आम्ही ८ मे १९९६ रोजी लग्वार्डिया एअरपोर्ट सोडले आणि आमच्या 'व्हूसा' प्रवासाला सुरुवात झाली. विमानतळावर सोडायला स्वत: ताई आली होती. ती परत गेली तिच्या चिमण्या बाळाकडे. आणि आम्ही दोन बावरलेल्या चिमण्या ऑरलँडोला पोहोचलो.

हा अमेरिकेतला आमचा सर्व प्रवास आम्ही यू. एस्. एअर लाईन्सनी केला. न्यूयॉर्क येथेच मी आणि ताई ( प्राजक्ता ) त्यांच्या ऑफीसमध्ये गेलो होतो. तिथल्या मुलीने आमचा पूर्ण प्रवासी चार्ट अगदी आमच्या मनाप्रमाणे तयार केला; म्हणजे ऑरलॅंडोला जायला कुठले विमान, कितीचे डिपार्चर, तुमचे सीट नंबर कोणते.. सर्व काही सर्व ठिकाणचे अगदी बसल्या ठिकाणी कन्फर्मड् बुकिंग. तुम्हाला संधिवाताचा त्रास असेल तर, तुम्ही गुडघ्यात अवघडत असाल तर.. सारं मोकळेपणी बुकिंग क्लार्कला सांगा. तुम्हाला शक्य असेल तेथे पुढच्या सीट्स दिल्या जातात.

प्रत्येक विमानतळावर मोठमोठे स्क्रीन आहेत. अगदी उतरल्या उतरल्या समोरच! तिथे त्या त्या ठिकाणाची सर्व माहिती आपल्याला विनासायास मिळते. म्हणजे कुणाशीच तोंड उचकटून बोलायची गरज नाही.



कॉंप्युटरवर सर्व माहिती सहजतेने उपलब्ध होते. 'टच द स्क्रीन अँड गेट द इनफॉर्मेशन' ही साधी सोपी पद्धत! टॅक्सी सेवा हवी असल्यास कुठे, कोणत्या नंबरवर फोन करावा, लॉज कुठल्या कुठल्या आहेत, त्यांचे कॉंटॅक्ट नंबर कोणते.. इ. शिवाय नकाशा हवा असेल तर तो जसा रेल्वेस्टेशनवर फुकट मिळतो तसा एअरपोर्टवरही फुकट मिळतो. म्हणजे कुठे कसे जायचे ते कुणाला

विचारत बसायला नको. ऑरलँडोला हॉटेल ट्रॅव्हलॉजचे माझ्या मुलीने केवळ फोनवर बुकिंग केले होते. आम्ही तिथे फोन करून विचारले की तुमच्याकडे आहे ना खरंच जागा? तेव्हा रिसेप्शनिस्टने 'हो' असे सांगितले आणि आमचा हुरूप वाढला.

''आता तुमची गाडी पाठवा.'' मी सांगितले.

''तुम्ही ए साईडला आहात की बी?'' तिने विचारले.

''कुणास ठाऊक!'' मला तिथे कुठेच ए नि बी दिसेना.

''तुम्ही बी सेव्हनटीनपाशी या. आमची गाडी वीस मिनिटात तिथे येईल आणि तुम्हाला पिकअप करील.''

तिनं दिला की फोन ठेवून.

फ्री शटल् मिळणार म्हणून मी आनंदात होते, पण इकडे ए नि बी गायब होते, त्यामुळे आम्हाला घाम फुटला!

एक महत्त्वाची गोष्ट! इथे लॉजसाठी, टॅक्सीसाठी १-८०० चे कलेक्ट कॉल्स असतात. म्हणजे थोडक्यात फ्री कॉल्स असतात. १-८०० ने जोडलेल्या सर्व सेवा फुकट. चकटफू! मुफ्त! गिऱ्हाइकांना आकर्षित करण्याच्या केवढ्या या युक्त्या!

कुण्णाला विचारायचे नाही ही प्रतिज्ञा शेवटी बाजूला ठेवून मी तोंड वाजवले. तर मिष्किलपणे एक उंचाड्या अमेरिकन माझी साडी बघत म्हणाला,

''इंडिया?''

''येस्.'' मी म्हटलं.

''आता थोड्याच वेळात एक चिमुकली ट्रेन येईल आणि ती तुम्हाला घेऊन जाईल हं ए नि बी गेटावर.'' तो म्हणाला वर ''मी येऊ का बरोबर?'' असंही विचारलं.

म्हटलं, '' नको. यजमान आहेत.'' तसा तो निघून गेला.

काही सेकंदात ती चिमुकली गाडी आली नि प्रवाशांना इच्छित गेटांपाशी सोडून मोकळी झाली. एकदाचे आम्ही बी-१७ पाशी आलो नि फ्री शटलने ट्रॅव्हलॉजला पोहोचलो. मी तुम्हाला एक सांगते. इथे ढीगभर हॉटेलं आहेत. अगदी आयत्या वेळी सुद्धा बुकिंग देणारी. पण फ्री शटल कोण देतं हे बघायचं. कारण कॅबला फार म्हणजे फारच पैसे पडतात. ट्रॅव्हलॉज परवडण्याजोगे आहे. मोठे आहे. खूप खोल्या आहेत.

**आमची 'फ'**

आम्ही सामान घेऊन आम्हाला दाखविलेल्या बिल्डिंगकडे निघालो. आमची रूम पहिल्या मजल्यावर जरा आतल्या बाजूला होती. तिथे खोलीला मॅग्नेट लॉक

होतं, कार्ड फटीत सरकवून द्यायचं नि हिरवा दिवा लागला की पटकन हँडल फिरवायचं. दार उघडतं. मी कार्ड घातलं तर एकसारखा लाल दिवा लागे. मला कळेचना! शेवटी नवऱ्यानं कार्ड सरकवून बघितलं. तरी पण लाल दिवा! पाच मिनिटात आम्ही परत बावळट! मग एकदम नवरा म्हणाला, ''ते कार्ड उलटं घालून बघ बरं!''

घातलं.

लागला की हिरवा दिवा! पटकन दार उघडलं. आम्ही जशी काही अलिबाबाची गुहाच उघडली होती! परमुलुखातला हा छोटासा विजय आम्हाला खूप महान वाटला. एक डेंटल सर्जन नि एक पीएचडी. . आणि एक साध लॉक उघडता येत नाही? काय आहे काय? एकदाचे खोलीत उताणे झालो नि शिणोटा गेला.

बस यायची वेळ झाली होती. फ्री शट्ल. आम्हाला डिस्नेवर्ल्डला घेऊन जाणारी मुफ्त सेवा. ती चुकवून चालणार नव्हतं. नाहीतर पदरचे डॉलर जायचे!

''मी गरम कपडे बॅगमधून काढून घेतो... तोवर तू पुढे होऊन बस थांबव.'' नवऱ्यानं सांगितलं.

मी धडपडत उठले. खाली पोचले. ती बस तेवढ्यात टिणटिणत आलीच.

''बंधू, पाच मिनिटं थांब. माझे पती येतायत.'' मी म्हटलं.

''मी पाच सेकंदही थांबणार नाही.''

वारे आतिथ्य!

पाच सेकंदात माझा नवरा धापा टाकत आला म्हणून ती बससेवा मिळाली. बस निघाली. आसपासची वनराजी अतिशय नेत्रसुखद... आनंददायी होती. स्वच्छता तर थक्क करणारी.

डिस्नेवर्ल्ड आलं.

तिथे एकेकाची एंट्री एक्केचाळीस डॉलर्सला. पण आत अगदी बहार! प्राजक्ताने आधीच सांगून ठेवले होते की इथले एपकॉट सेंटर फारच सुरेख आहे. एकच दिवस मुक्काम असल्याने त्याला प्राधान्य द्या. आधी ठरल्याप्रमाणे मग आम्ही त्याचेच तिकीट काढले, आणि आत सरकलो.

३ दिवसांचे, ५ दिवसांचे असेही तिकीट मिळते.

एपकॉट सेंटरमध्ये नं २१ आणि नं २६ प्रत्येकाने बघायलाच हवे. एकात 'जर्नी इन टू इमॅजिनेशन' हा अत्यंत अविस्मरणीय प्रवास; तर दुसऱ्यात 'हनी आय श्रंक द क्राऊड' हा शो.

# चित्तथरारक आणि अविस्मरणीय

'जर्नी इन टू इमॅजिनेशन'चा प्रवास एकदम चित्तथरारक आहे. तुम्ही बसलेल्या खुर्चीला अंधारात बसणारे प्रचंड हादरे तुम्हाला जणू अंतराळात प्रचंड वेगाने घेऊन जातात. सारे तारे, ग्रह, नक्षत्रे यांची आजूबाजूला झिम्म गर्दी. स्टार वॉर.

सारे मिथक!

सारा आभास!!

पण सत्यासमान थरारक!!!

तुम्ही हार्टपेशंट असाल तर या खेळात सामील होऊ नका. तशा स्पष्ट सूचना देतातच म्हणा! पण जगाची सफर घडवून आणणारी ही भव्य स्पेस राईड एकदा अनुभवण्याजोगी आहे निश्चित.

'हनी आय श्रंक द क्राऊड' हा मजेमजेदार खेळ बघायला देशी-विदेशी पर्यटकांची हीऽ भली थोरली रांग होती. आम्हीही त्यात सामील झालो. प्रवेशद्वारापाशी एक भल मोठं खोकं होतं. त्यात जादूचे चष्मे होते. आतली जादू-ई जंमत बघण्यासाठी ते प्रत्येकाने डोळ्यावर चढवायचे होते.

आत शिरणारा प्रत्येक माणूस आता परत एकदा छोटा प्रेक्षक झाला होता. मूडच तसा तयार केला गेला ना!

लक्ष लक्ष प्रतिमांचा खेळ सुरू झाला. उंदीरच उंदीर!

आणि हे काय?

पडद्यावरले लाखो उंदीर चक्क प्रेक्षागृहात शिरले की!

सारे थिएटर हादरले.

पायावर काहीतरी चढले याची खात्री वाटून वय वर्ष पन्नासही आई उई करून नाचतंय!

मीही थयाथया नाचले.

कथ्थक... भरतनाट्यम्.. कुचिपुडी.



इतक्यात एक अजगर हवेतून माझ्यापासून केवळ सहा इंचावर उभा वळवळू लागला.

मी डोळे गच्च मिटून फटीतून बघितलं.

अगदी लहानपणची आठवण झाली. पुण्यात होतो आम्ही तेव्हा. अलका टॉकीजला इंग्रजी सिनेमा बघताना चुंबनदृश्य आले की पाप लागेल म्हणून आम्ही डोळ्यावर हात धरायचो... नि बोटाच्या फटीतून बघायचो.

अजगराच्या लक्ष लक्ष भ्रामक प्रतिमा थिएटरभर साऱ्या प्रेक्षकांना भिववीत होत्या नि आरोळ्या काय अन् किंचाळणे काय. सारे थिएटर दणाणले होते. मजा आली! हा शो प्रचंड रांगेत पुनश्च उभे राहून आम्ही दोनदा बघितला.

बाहेर पडताच चष्मे परत करायला काही प्रेक्षक विसरले.

बहुधा ही 'प्यारी' आठवण त्यांनी खिशात टाकली.

आम्ही मात्र ते परत केले.

एपकॉट सेंटरमध्ये 'स्पेसशिप अर्थ' आणि 'द लिव्हिंग सीज' या आणखी दोन बघण्याजोग्या जागा आहेत. पहिल्यात १८ ऐतिहासिक गोष्टींना नाट्यस्वरूप दिले आहे; तर दुसऱ्यात रत्नाकराची संपत्ती उघडी केली आहे.

शिवाय 'वर्ल्ड शोकेस' फारच बघण्यासारखी आहे. सकाळी ११ ते रात्री ९ ती उघडी असते. रात्री ९ वाजता ती संपूर्ण उजळतात. ही 'शोकेस' म्हणजे एका अतिप्रचंड तलावाभोवती वसलेली देश-विदेशांची वैशिष्ट्ये. त्यात भारत कुठेच नव्हता म्हणून अतिशय वाईट वाटले. बोटीतूनही प्रत्येक ठिकाणी जाता येते, पण आम्ही पायीच राउंड मारायचे ठरवले. 'मेक्सिको' पाशी पोचल्यावर मेक्सिकन फूडचा आस्वाद घेतला. सबंध चक्कर पूर्ण होईपर्यंत पायाचे अगदी तुकडे पडले. नंतरच्या आकाशातल्या विजेच्या आतषबाजीला आम्ही आडवेच पडलो. पण हा जो इल्युमिनेशन शो आहे तो जन्माला आल्यासारखा एकदा बघावा असाच आहे. रंगरेखा, रूपरेखा, भव्यता, चमत्कृती, नावीन्य, संगीत साऱ्यासाऱ्यांचा अवकाशातला थक्क करणारा विद्युत आविष्कार! अमेरिकनांच्या कल्पकतेचे, भव्यतेच्या वेडाचे, नावीन्याच्या ध्यासाचे नि सर्वोत्तम सादरीकरणाचे कौतुक वाटले. असा भरगच्च आणि घटनाप्रधान दिवस रात्री खूप उशिरा संपला. स्वतंत्र प्रवासाचा पहिला उत्सवी दिवस! पहिला विजयी दिवस!

## हिंदीचे स्थान

एपकॉट सेंटरला हिंडत असताना एक गोष्ट लक्षात आली. ओ की ठो इंग्लिश न येणारी जपानी माणसं इथे अगदी मजेत पर्यटन करीत होती. मला तर हे बघून

आश्चर्याचा धक्काच बसला. मग लक्षात आलं की इथे इंग्रजीप्रमाणेच स्पॅनिश आणि जपानी भाषेतही सूचना देतात. कारण हे पर्यटक त्यांना पैसा मिळवून देतात ना!

हिंदी मात्र कुठेच नाही.

वाईट, वाईऽट वाटले.

हिंदी कुठे होती ठाऊक आहे?

फक्त KLM च्या फ्लाईटवर.

तीही फक्त टॉयलेटमध्ये!

स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यासाठी वापरली होती!

**एक पर्याय**

पर्यटकांनी आमच्यासारखं डिस्नेलँड आणि डिस्नेवर्ल्ड ही दोन्ही ठिकाणं न बघता केवळ डिस्नेलँड बघितली तरी चालण्यासारखे आहे, कारण डिस्नेलॅड ही ओरिजिनल आणि डिस्नेवर्ल्ड ही त्याचीच प्रतिकृती!

पण मुलांना डिस्नेलॅड अधिक आवडते असे मला वाटले. दोन्ही ठिकाणच्या मुलांच्याकडे बघितल्यावर असे माझे मत झाले.

**नियोजनाची आवश्यकता- काही महत्त्वाच्या सूचना**

आमच्या मुलीने आमच्या प्रवासाचे अत्युत्तम नियोजन केले होते. तिने काही महत्त्वाच्या सूचना केल्या होत्या.

१. एकदाच- सकाळी दाबून ब्रेकफास्ट करा. मग दिवसभर नाही खायला मिळाले तरी वाईट वाटायला नको.

२. पाचपाच डॉलर्सचे ट्रॅव्हलर्स चेक जवळ ठेवा. चोरीची भीती नाही.

३ सदैव गुडदाणी ( गुळाची चिक्की ) जवळ ठेवा. कारण सतत फिरतीवर असल्याने हायपोग्लायसेमियाची ( रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होऊन एकदम अशक्तपणा वाटण्याची ) शक्यता असते.

४ प्रत्येक दिवसाची पैशाची पाकिटे तयार करा आणि त्यात भागवायला शिका.

५. उगाच कुठेही खरेदीच्या भानगडीत पडू नका. अमेरिकेत सर्व ठिकाणी सारे काही मिळते.

आम्ही प्राजक्ताच्या सूचनांचे तंतोतंत पालन केले.. आणि पाकिटे करण्याची सूचना अफलातून उपयोगी पडली. उदाहरणादाखल-

ऑरलॅडो-

४० डॉलर्स हॉटेल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ६२०
२६५०३

७४ डॉलर्स ( दोघांची तिकिटे )

२५ डॉलर्स ( लंच आणि डिनर )

१० डॉलर्स ( जास्तीचे )

असे एका पाकिटावर लिहून आत नेमके पैसे होते.

पैकी तिकिटाला ४१ X २ = ८२ डॉलर्स लागले. तेथे सरप्लस पैसे उपयोगी पडले.

## लॉसएंजेलिसकडे

आठ मे च्या रोमहर्षक अनुभवानंतर आम्ही लॉसएंजेलिसला गेलो. डिस्नेलँडचा प्रदेश! आता आम्ही चांगलेच स्मार्ट झालो होतो. विमानतळावरनं फोन करून एक सुपर शटल मागवली आणि फोनवरच 'डील' केलं. अमेरिकेत मीटरप्रमाणे टॅक्सी चालते. पण डीलही होते.

लॉसएंजेलीसमध्ये पावलापावलावर लॉज दिसल्या. पण प्राजक्ताने फ्री ट्रिप टु डिस्नेलँड असलेल्या ॲना हाईम लॉजवर बुकिंग केले होते. तिथे भरपूर डोनट्स खाऊन, फ्री सर्विस घेऊन आम्ही डिस्नेनगरीत पोहोचलो.

१० मे चा दिवस! अमेरिकेतही उन्हाळा होताच. डिस्नेनगरीत लाखो माणसांची रंगीबेरंगी गर्दी पसरली होती. कडेवरल्या बाळांपासून ते सत्तरी पंचाहत्तरीच्या आजी आजोबांपर्यंत देश-विदेशांतली माणसेच माणसे आणि सारीच टीशर्टस् आणि अर्ध्या चड्डीत. आजीबाईंना पण दादा कोंडकेस्टाईल हाफपँटमधे बघितल्यावर गंमत वाटली.

मी आणि नवऱ्याने चमकून एकमेकांकडे बघितले. एकच विचार दोघांच्या मनात आला, तेव्हा हसू फुटले. तो म्हणाला,

''त्या आजीबाईसारखा वेश घालायची आहे हिमत?''

''छे बुवा!'' मी कबुली दिली.

''तुझ्या शाळेतल्या मुलांनी तुला अशा ड्रेसमधे बघितलं तर ग?''

''झीट येऊन पडतील ती!'' मी म्हटलं.

आम्ही हातात हात घालून चालू लागलो (एवढेच एकमेव ॲडव्हेंचर!)

डिस्नेलँड ही खरोखर मोहनगरी आहे. इथली फॅंटसी लँड, मिकीज टून टाऊन ही महान आकर्षणे.



डिस्नेलॅंडमध्ये प्रवेश करतानाच तिकीट घ्यावे लागते. ते प्रत्येकी ३४ डॉलर असते. जागोजागी छत्र्या उभारून खाणेपिणे यांची सोय केलेली आहे. इतकाली माणसे तिथे हिंडत होती, पण कागदाचा एकही बोळा जमिनीवर पडलेला नव्हता की प्लास्टिकच्या पिशव्या इकडे तिकडे लोळत नव्हता. कोणीही पचकन थुंकत नव्हते. सारे कसे स्वच्छ स्वच्छ. मला आपले रेल्वेचे फलाट आठवले. . कारण त्यांच्याशी माझा रोजचा संबंध ना! आम्ही स्वच्छता का राखू शकत नाही हे मला न उलगडलेले कोडं आहे. बसस्टॉपवर थुंकीची रांगोळी घालणाऱ्या एका किशोरवयीन मुलाला मी चापले असता तो आश्चर्यानं म्हणाला, ''मी तुमच्या साडीवर थुंकलो का?'' ... म्हणजे पाहा! क्यूमधली इतर माणसे शांत!. . जणू काहीही आक्षेपार्ह घडत नव्हतं समोर!

क्या करे?

असो... तर लक्षावधी पर्यटकांच्या गर्दीने भरलेली डिस्नेलँड अगदी स्वच्छ स्वच्छ होती. मिकिज टूनटाऊनमध्ये तुमच्या मनात भरपूर उत्सुकता निर्माण करून तुम्हाला नंतर मिकीचे दर्शन घडवतात. मिकीबरोबर हवा तर खुशाल फोटो काढा. नो प्रॉब्लेम!.. मी मिकीचा मुका घेतला. त्यानेही हसतमुखाने दिला. मिकीशी हस्तांदोलन करताना, मिकीचे घर चिमुकल्या आगगाडीतून बघताना मजा आली. मोठीमोठी माणसे सुद्धा कपबशीत बसत होती, मेरी गो राउंडमधे घोड्यावर बसून हाऽहाऽहूऽहूऽ करीत होती आणि पाळण्यात बसून पाळणे जोरात हालले की लहान मुलांसारखी ओरडत होती. सगळ्यांचं सरासरी वयच मुळी नऊ वर्षाचं झालं होतं ना!

लाल लाल पोशाखातले गोरे गोरे बँडवाले जेव्हा मेरी गो राउंडपाशी येऊन धून वाजवू लागले तेव्हा मी नेमकी घोड्यावर होते. मला तर वाटलं की मी सरदार दरकदारच आहे. केवढा हा मान!

वॉल्ट डिस्नेच्या कॅरेक्टर्स गोष्टीच्या पुस्तकातून उठून चक्क बाहेर येतात आणि डिस्नेलँडमध्ये बागडतात. इथे त्यांचा ताफाच्या ताफा मोठ्या समारंभाने येतो आणि वाजत गाजत टाळ्यांच्या गजरात मिरवतो. ह्या कॅरेक्टर्स मग मुलांशी हस्तांदोलन करतात तेव्हा केवढा जल्लोष होतो! सारे वातावरणच मग अद्‌भुतरम्य होऊन जाते.

आपल्याकडे एस्सेलवर्ल्ड, फँटसीलँड इथे बरेचसे जे खेळ आहेत, ते डिस्नेलँडसारखे आहेत. डिस्नेलँडमध्ये फँटसीलँड, टुमॉरोजलँड याही बघण्याजोग्या आहेत. मोठीच्या मोठी कार राईडही येथे आहे. म्हणजे खेळातल्या मोटारी आपण

भल्ला मोठ्ठा राउंड घेत चालवायच्या. मज्जा! मी खरंच सांगते, मी अगदी लायसेन्सधारक गाडीचालक आहे: पण भारतातही मी गाडी चालवू शकले नाही. प्रत्येक बसवाला, रिक्षावाला आपल्याच अंगावर चालून येतोयसं वाटून माझी व्हीलवरली पकड ढिली पडते.

"आई, तू ट्रेनिंग स्कूलची फी भरून ६५० रुपयांत मागे बसायला शिकलीस!" असं माझ्या लेकी म्हणतात.

इथेही माझी 'फ' झाली. ती साधी खेळातली गाडीसुद्धा मला चालवता आली नाही, तेव्हा मी जाम म्हणजे जामच नर्व्हस झाले. सहासात वर्षाची पोरटी सुद्धा मजेत ड्राइव्ह करीत होती.

"हे बघ, सगळ्या गोष्टी आपल्याला जमल्याच पाहिजेत असा अट्टाहास कशाला? माझ्याबरोबर मारतेच आहेस ना राउंड?" नवरा म्हणाला. माझा मूड मात्र पार बुटात होता. तो स्पेस शटल्मधल्या वेगात जरा बाहेर आला.

डिस्नेलँडमध्ये पिझ्झा स्वस्त आणि मस्त मिळतो. पिझ्झा, फ्रेंच फ्राईज आणि कोक! बस्. मधून चघळायला वेफर्स. ३४ डॉलर्स प्रत्येकी दोघांचे तिकीट, दोघांच जेवण २० डॉलर्स, रात्रीचे मिनी जेवण १० डॉलर्स असा तो दिवस पाकिटातल्या ठरीव रकमेत संपला.

रात्री खूप उशिरा फँटास्मिक शो होता. म्हणजे आकाशातली रोषणाई. त्यात सिंड्रेलाची कथा विद्युल्लतांच्या चित्रांनी दाखवली तेव्हा मी परत परकरी बेबुटली झाले. रात्री दीड वाजता आम्ही ॲनाहाईम लॉजवर परतलो.

एक लक्षात ठेवायचे. गेल्या गेल्या, म्हणजे लॉसएंजेलिसला पोचल्या पोचल्या युनिव्हर्सल स्टुडिओला जायचे बुकिग करून ठेवायचे. कारण हा स्टुडिओ थोडा लांब आहे. येथे बसेस जातात. कॉंट्रॅक्ट बसेस अर्थात. त्या तुलनेने स्वस्त असतात. तुम्ही राहता त्या लॉजवरही फोनवरून हे बुकिग करता येते. मात्र किमान चोवीस तास आधी हे बुकिंग केले म्हणजे आपल्याला टेन्शन नाही. बुकिंग केवळ १० डॉलर्स प्रत्येकी होते. व हे पैसे प्रवासाच्या तिकिटातून वळते होतात.

आम्ही रात्री गजर लावून झोपलो. कारण पुढला दिवस चांगलाच भरगच्च होता. त्यातून हॉलीवूड बघायचे म्हटल्यावर नवऱ्याला रात्री झोप नव्हती.

सकाळी उठून नाश्ता अगदी मनसोक्त करून घेतला. प्रत्येक हॉटेलच्या फीत नाश्ता फ्री असतो हे लक्षात असू द्यावे. मग आम्ही सामानासकट निघालो. हॉटेलचा निरोप घेतला. या युक्तीमुळे सबंध दिवसाचे हॉटेल चार्जेस वाचले.

## अत्यल्प सामान- ट्रॅव्हल लाईट!

ट्रॅव्हल लाईट हा सल्ला खरोखर मोलाचा आहे. कमीत कमी खर्चात आपली सहल बसविण्यासाठी फक्त एक पाठीवरचं दप्तर घेऊन हिंडा. केवळ ३ कपडे. कारण अंथरुणं, पांघरुण प्रत्येकी ठिकाणी मिळतात... आणि कपडे धुवायची यंत्रंही प्रत्येक हॉटेलात असतात. कपडे अगदी कोरडे ठक्क होऊन आपल्या हाती येतात.

११ मे रोजी सकाळी ८ वाजता आम्ही ॲनाहाईम लॉजला रामराम ठोकला. ॲनाहाईम लॉजचे मॅनेजर चक्क गुजुभाई होते तेव्हा गपशप् गुजु नि मराठीत झाल्याने खरी खरी सुप्रभात वाटत होती

युनिव्हर्सल स्टुडिओत आम्ही पोचलो ते कंत्राटी बसने. पॅसिफिक टूर्स नावाची ती कंपनी होती. त्यांनीच आमची युनिव्हर्सल स्टुडिओ बघण्याची तिकिटे काढल्याने आमचा रांगेत उभे रहण्याचा त्रास वाचला. पण नतर कळले की आम्हाला 'राजा'ची ट्रीटमेंट देऊन त्यांनी १० डॉलर्स प्रत्येकी कमिशन उकळले होते. जीव जळला! पण क्या करे? राजा एंजॉय करतो. वो जलता नही! मग 'राजा'च व्हायचे ठरवले.

युनिव्हर्सल स्टुडिओत सामान, तुमचे सारे बॅगेज अगदी फ्री ऑफ चार्ज ठेवायची सोय आहे हे लक्षात असू द्या. किती बरं वाटलं ना?

आम्ही सामान सुरक्षा रक्षकाच्या स्वाधीन केले आणि मोकळ्या हाताने आरामात आत गेलो.

युनिव्हर्सल स्टुडिओमधले खास आकर्षण म्हणजे हॉलीवूडला नेणारी ट्रॅमलॉट टूर. अप्रतिम! हॉलीवूडची रम्य नगरी ही एक ऐतिहासिक वास्तू आहे. माझ्या नवऱ्याला तर ती बेहद्द आवडली. कारण शर्ली मॅक्लीन, ज्यूली अँड्र्यूज, लिझ टेलर या सगळ्या त्याच्या मैत्रिणी! सिनेमाची शुटिंग्ज कशी होतात, सिनेमात आग लागलेली भयावह दृश्ये आपण पाहतो ती आग प्रत्यक्षात कशी लागते. म्हणजे कोणती युक्ती वापरली जाते, भूकंप, उत्पात, प्रलय. सारी प्रात्यक्षिके अंगावर आली अगदी. सगळं 'चटंखो' असूनही प्रत्यक्ष अनुभव घेताना घाबरायला होतं.

युनिव्हर्सल स्टुडिओमधली बॅक टु फ्यूचर ही राईडही अत्यंत अविस्मरणीय आहे. सकाळी ८ पासून संध्याकाळी साडेचारपर्यंत हॉलीवूडच्या मोहनगरीत वावरून आम्ही आधी बुक केलेल्या टॅक्सीने विमानतळावर पोहोचलो.

इथला ॲनिमल शो ( युनिव्हर्सल स्टुडिओतला ) सुद्धा अफलातून आहे. गोरीला माणसासारखा वागतो नि प्रेमही करतो. प्रेझेंटेशनही अत्युत्तम करतात.

माझ्या शाळेतल्या मुलांना हे सारे मला कळवायचे होते. त्यांची मला येणारी पत्रे आणि माझी त्यांना जाणारी पत्रे हा अमेरिकेतील वास्तव्यातला एक सुंदर पूल

होता. तिकडे दूर भारतात आपली कुणाला आठवण येतेय नि आपल्या पत्राची कुणीतरी उत्सुकतेने वाट बघतंय हा विचारच मुळी परदेशात आपल्याला संजीवनी देणारा आहे. माझी धाकटी मुलगी निशिगंधा तर फोनच्या बिलाची पर्वाच न करता दर दिवसाआड आमची वास्तपुस्त करीत असे.

युनिव्हर्सल स्टुडिओत एकूण जाणे + तिकीट मिळून ९४ डॉलर्स लागले. जेवण ११ डॉलर्समध्ये भागले. कारण मोठ्ठा पिझ्झा घेऊन आम्ही दोघांनी तो खाल्ला. जाताना बसचा उपयोग भाडे भरूनही करता आला नाही. कारण आम्ही दिल्या वेळेपेक्षा लवकर निघणार होतो, आम्हाला ३२ डॉलर्सची वेगळी टॅक्सी करावी लागली. पण हॉटेल सकाळीच सोडले होते; त्यामुळे त्याचे पैसे टॅक्सीत गेले असे समजून आम्ही समाधान मानले.

जेथे जेथे हॉटेलमधून फ्री सर्विस असते आणि ते तुम्हाला ठरल्या ठिकाणी फ्रीमध्ये सोडतात तिथे तिथे त्या गाडीच्या ड्रायव्हरची प्रामाणिक इच्छा असते की तुम्ही त्याला टीप द्यावी. ती सुद्धा किमान दोन डॉलर! त्याने आपल्या बसमध्ये प्रवाशांना दिसेल अशा ठळक अक्षरात लिहून ठेवलेली असतेच पाटी! टीप आनंदाने स्वीकारल्या जातील म्हणून! आपल्याला तसेच उतरून जाताना कसेसेच होते! डॉलर डॉलर आपण वाचवीत प्रवास करतो तो याला फुकाफुकी द्यावासा वाटत नाही. ही इज डुइंग हिज ड्यूटी! पण आपण टीप न देता पुढे सरकलो की तो इतका वाईट चेहरा करतो, इतका वाईट चेहरा करतो की आपलं तोंड कडू व्हावं! पुढे पुढे तो वाईट चेहरा दृष्टिआड करायला आम्ही सरावलो. पण जगात कुठेही गेलात तरी मनुष्यप्रवृत्ती नाण्यांभवतीच कशी फिरते याचा अनुभव आला नि माणुसकीला पैशानं कसं खाऊन टाकलंय हे बघून विषाद वाटला.

लॉसएंजेलिस ते सॅनफ्रॅन्सिस्को हे अतर विमानाने केवळ पाऊण तासाचे आहे. सव्वापाचला आमचे विमान सुटले. विमानात साड्याच साड्या होत्या. जणू भारतातच होतो आम्ही. एक मोठा गुजू ग्रुप, दोनचार मराठी जोडपी, सिंधी, साऊथी. . सगळ्या गप्पांचे मिश्र भारतीय आवाज! किती होमली वाटलं म्हणून सांगू!

सॅनफ्रॅन्सिस्को भारतीयांनी काबीज केलंय. पर्यटकांचे एक तरी नातेवाईक तिथे असतातच. कारण इथली पन्नास टक्के जनता भारतीय आहे आणि अत्यंत अगत्यशील आहे. आमचे मित्र येथे होते. सगळेच आमच्यापेक्षा वयाने छोटे होते.

विमानतळावर आम्हाला न्यायला आशिष देशपांडे आले. आशिष आणि अस्मिता देशपांडे या प्रेमळ, आतिथ्यशील दांपत्याने आमच्यावर पाहुणचाराचा अक्षरश: वर्षाव

केला. अकरा मेची संध्याकाळ अस्मिताने स्वत: खपून तयार केलेल्या इटालियन जेवणाने रंगीत संगीत झाली. तिचा छोटा अमेय बोबड्या नि गोड बोलांनी आम्हाला रिझवीत होता. प्रवासात हॉटेलात राहणं वेगळं. घर ते घर! खूप गप्पा मारून आम्ही झोपायला गेलो.

१२ मेची सकाळ मोठी सुंदर होती. कारण उठले तर माझ्या उशाशी चॉकलेटं आणि एक सुंदर भेटकार्ड!

"हे काय?" मी नवऱ्याला विचारलं. माझा वाढदिवस नसूनही त्याला प्रेमाचा उमाळा आला हे बघून मला गदगदून आलं अगदी.

"हे आपल्या ताईनं दिलंय."

"काय?"

"हो. आपल्या ताईनं. निघताना गुपचूप मला दिलंन. आज सकाळी तुला द्यायला सांगितलंन."

"का?"

"वाच ना!"

मी कार्ड उघडलं. मातृदिनाच्या निमित्तानं तिनं स्वत: रंगवून तयार केलेलं कार्ड. आपलं छोटं बाळ सांभाळून हे उद्योग तिनं केव्हा बरं केले असतील? माझ्या डोळ्यांवर पाण्याचा पातळ पडदा उभा राहिला.

नवरा हसत होता.

"तुला कधी असं सुचलंय?" मी नाक फुगवून विचारलं.

"नाही बुवा!" त्यानं प्रामाणिक कबुली देऊन टाकली.

अस्मितानं इडली, डोसे, नारळाची मस्त चटणी असा अम्मा बेत केला होता. आम्ही जाम खूष झालो. कारण बाहेर बर्गर खाऊन गरगर व्हायला झालं होतं होतं नि पिझ्झाची सज्जा वाटू लागली होती. अगदी ताव मारून खाणं झालं. तिनं वाटेत लागेल म्हणून चिवडा, केक, कोकचा क्रेट बरोबर दिला आणि आशिषने स्वत:च्या गाडीने आम्हाला क्रुकेड स्ट्रीट, गोल्डन गेट, पिअर थर्टीनाईन ही तेथील प्रेक्षणीय स्थळे दाखविली.

ज्यांना मित्रमैत्रिणी सॅनफ्रॅन्सिस्कोत मिळू शकणार नाहीत त्यांनी यूथ हॉस्टेलमधे राहून ३२ डॉलर्सची गाईडेड टूर घ्यावी. आम्ही ती माहिती काढून ठेवली होती; पण तिचा वापर करण्याची वेळ आली नाही.

ह्या सर्व माहितीसाठी 'ट्रिपल ए' ची पुस्तके फार उपयोगी पडतात. तसेच यूथ हॉस्टेल्सचे पत्ते त्या गाईड्समध्ये असतात. फोन नंबरसकट. यूथ हॉस्टेल्सवर

फोन करून आपण येण्याच्या तारखा एक आठवडा आधी कळवाव्या लागतात.

तुमच्याजवळ जर लहान मूल असेल तर तुमची स्पेशल सोय अगदी पाळण्यासकट ते करतात. आहे ना आनंदाची गोष्ट?

बारा मे रोजी आम्ही साऱ्या सॅनफ्रॅन्सिस्कोचे देखणेपण टिपले आणि १३ मे रोजी सकाळी अमेयची मॉंटेसरी बघितली. खरे तर 'प्रीस्कूल'च! खेळायसाठी छोटासा हौद हे मुलांचे मोठे आकर्षण होते. चिनी, जपानी, भारतीय, अमेरिकन- काळी, गोरी अशी सर्व देशांची मुलं त्या चोवीस मुलांत होती. सगळे पालक त्यात कोणाचे बाबा तर कोणाची आई होती; छोट्या छोट्या बसक्या स्टुलांवर मागे बसले होते. मुलांना चित्रं काढायला एक भिंत होती. खेळायला माती होती. मुलं खेळात रंगली की पालक-शाळा होती. या सेशनमधे पालक आपल्या समस्या मांडत नि अशा प्रसंगी कसं वागावं याचं मार्गदर्शन तिथली गाईड करीत होती.

''आम्ही दोघं बोलत असताना माझा मुलगा सतत लुडबूड करून मधे बोलतो. एक वाक्य धड आम्हा नवराबायकोला बोलता येत नाही.'' एक जपानी आई विचारत होती.

''अशा वेळी त्याला न दुखवता काय बरं करावं?'' गाईडनं पालकांनाच प्रश्न टाकला.

''त्याला आवडेल असा खाऊ देऊन गुंतवावा.'' एकीनं सांगितलं. मला मनात हसू आलं. खाऊ किती पुरणार? पुन्हा ये रे माझ्या मागल्याच!

खूप पूर्वीचा एक प्रसंग आठवला. सीमा आणि रमेश देव यांची भूमिका असलेला 'सुवासिनी' बघायला मी नि मोठी वहिनी गेलो होतो. बरोबर छोटा भाचा होता, तीन-चार वर्षाचा! सिनेमा सुरू झाल्याबरोबर त्याने भोकांड पसरले. त्याला गप्प करण्याकरता आम्ही वेफर्सचं पाकीट दिलं. ते त्यानं चार मिनिटात संपवल नि लगेच रेकॉर्ड वाजवायला सुरुवात केली. पॉपकॉर्न उघडल्या. त्या सुमारे पाच मिनिटे पुरल्या. केकचे दोन तुकडे चिवडले नि पुन्हा धमाका. वहिनीनं चिडून रट्टा हाणला तर तो रडत म्हणाला, ''शी आली!'' आजूबाजूला हशा पिकला. तिला बिचारीला मधूनच उठावे लागले. करतेय काय!

भारतात आईची आई नाहीतर बाबांची आई पुष्कळदा या जपानी आईला पडलेले प्रश्न सहजपणे सोडवते त्याचीही आठवण झाली. इथे आजी, आजोबा घरी असणंच मुळात कार्बन डायॉक्साईडच्या हवेतल्या प्रमाणाइतकं कमी! पण तरुण पालकांना पडलेले प्रश्न सोडवण्यासाठी पालक-शाळा असणं ही खूप स्वागतार्ह गोष्ट आहे हे मात्र निश्चित.

तिथून आम्ही माझी भाची अरुंधती दाते हिच्या घरी गेलो. ती आणि तिचे पती दीपक आम्हाला न्यायला आले होते. माझी बहीण निरुताई व तिचे यजमानही भेटले. कारण अरूच्या बाळंतपणासाठी ते आले होते. दिवसरात्र गप्पा झाल्या आणि आम्ही मग पुढील प्रवासाला तयार झालो. दीपकने आम्हाला एअरपोर्टवर सोडले.

सॅनफ्रॅन्सिस्को ते बफेलो हा प्रवास भला मोठा आहे. १४ मे रोजी रात्री साडेअकरा वाजता आम्ही विमानप्रवासाला सुरुवात केली. मधला पिट्सबर्ग थांबा संपवून बफेलो येथे दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ मे रोजी पोहोचलो.

# स्वस्त आणि मस्त नायगरा

नायगरा हे जगप्रसिद्ध आकर्षण. इथली हॉटेलं भयानक महागडी. टॅक्सीचे रेट अवाच्या सवा! पण आम्ही ह्या सर्वांवर मात करून ही सहल स्वस्तात नि तरीही अगदी मस्ताड केली.

कशी...?...

तेच नीट वाचून ठेवा. तुमचे डॉलर्स वाचतील. आम्हांला आनंद होईल.

बफेलोची विमानसफर सुरू झाली तेव्हा आता पुढे काय करायचे ते आम्ही विमानातच निश्चित केले होते. कारण श्रीशिल्लक संपत आली होती. तशी नायगरा आणि वॉशिंग्टन ही बजेटची पाकिटे आमच्या खिशात होती; पण अन्य काही नाही. मग आम्ही खूपच इकॉनॉमिकल प्लॅन केला.

पाहा कसा–

बफेलो एअरपोर्टवर केवळ एक डॉलरला आम्हाला लॉकर मिळाला. आमचे सर्व सामान आम्ही त्यात भरले आणि केवळ एकेक बॅगी खांद्यावर घेऊन आम्ही विमानतळाबाहेर पडलो. आम्ही मेट्रो बसच्या शोधात होतो. ती विमानतळाबाहेरच होती. प्रथम ३६ नंबरची बस पकडून आम्ही बसडेपोत गेलो. तिथे बस (३६ नं.ची) संपते. या बसडेपोतच जेवण घेतले ते केवळ ४ डॉलर्सला मिळाले. मग तिथले नकाशे बघून नायगरा धबधब्याकडे नेणारी बस आम्ही स्मार्टली हुडकून काढली. ४० नंबरची बस जाते हे समजले, तरी पण आजूबाजूला चार लोकांना विचारून कन्फर्म केलं. (जुन्या सवयी!) अशा प्रकारे एअरपोर्टपासून कॅब घेतली असती तर ८९ डॉलर्स पडले असते. आणि आम्ही केवळ ७ डॉलर्समध्ये धबधब्यापर्यंत येऊन थडकलो होतो. आमच्य पाकिटात खरे तर त्या ४९ डॉलर्सची तरतूद होती पण खूप पैसे सहजतेने वाचले.



नायगरा आपल्या गिरसप्पाएवढा सुद्धा उंच नाही; पण त्याचा विस्तार प्रचंड आहे. इतका प्रचंड की नजरेत मावू नये. इथली सर्वात मोठी आकर्षणे म्हणजे 'केव्ह ऑफ द विंड' आणि 'मेड ऑफ द मिस्ट बोट राईड.' आयुष्यात कधीही न विसरता येण्याजोग्या! रोमांचकारी!!...

नायगराचा परिसर अतिभव्य असल्यामुळे ट्रॅम टूरची सोय आहे. मोठी मौज येते. शिवाय नायगरावरला लघुपटही विलोभनीय आहे. सॅनफ्रॅन्सिस्को एका दिवसात संपवून इथे दोन दिवसही राहायला हरकत नाही. इतके हे ठिकाण निसर्गरम्य आहे. नायगराला पोचल्या पोचल्या आम्ही यूथ हॉस्टेलला फोन केला. ''आम्ही आलो आहोत. आहे ना आमचे बुकिंग?'' तिथे नॅन्सी नावाची जी बाई हॉस्टेलची व्यवस्था बघत होती ती मोठी छान होती. ''मजा करा नि संध्याकाळी या.'' तिने म्हटले. मग बिनघोरपणे आम्ही नायगरा बघत राहिलो.

खूप फोटो काढले. नायगराचे नि आमचेही. ट्रॅम टूर केली. लघुपट बघितला आणि मग टॅक्सीला फोन करून आम्ही टॅक्सीवाल्याशी 'डील' केले. संध्याकाळी यूथ हॉस्टेलवर सोडायचे (धबधब्यापासून), तिथून पुन्हा रात्री आठ वाजता घेऊन यायचे. धबधब्यापाशी सोडायचे नि रात्री साडेदहाला परत यूथ हॉस्टेलला सोडायचे. दुसऱ्या दिवशी ठीक पावणेपाच वाजता हॉस्टेलवर येऊन आम्हाला पिकअप करायचे आणि एअरपोर्टवर सोडायचे. एवढे सारे त्याने केवळ ३९ डॉलर्समध्ये मान्य केल्यामुळे आम्ही राजेच झालो!

यूथ हॉस्टेल नायगराच्या परिसरातच आहे. तुम्ही अगदी तरुण असाल तर चालत जाल.  याल. हॉस्टेल अतिशय उत्तम आहे. आपले डाळतांदूळ जवळ असतील तर भांडीकुंडी, गॅस आहेच. फुकट तोही! पकवा. खा. कॉफी नि ब्रेड बिनपैशांचा मिळतोच. एकूण मौजच मौज!

नायगराचे दिवसाचे सौंदर्य डोळ्यात साठवून आम्ही ठरवलेल्या टॅक्सीने यूथ हॉस्टेलवर पोचलो. ताणून दिली  रात्रभराच्या प्रवासाने आलेला शिणवटा कुठच्या कुठे पळाला. मग स्वच्छ स्नान करून आम्ही खाली उतरलो.

आमची टॅक्सी अगदी वेळेवर आम्हाला न्यायला आली. गाडीचालकाचे नाव होते रिच. रिच चांगला माणूस होता. गप्पिष्ट होता. ''नायगराच्या परिसरात खूप थंडी असते. बर्फच बर्फ पसरलेला असतो. तो आता कुठे वितळू लागला आहे. २५ मेनंतर बघा... इथे प्रवाशांची रीघ लागेल. मग तुम्हाला इतक्या स्वस्तात नाही बरं मिळायची कॅब.'' तो आम्हाला सांगत होता.

''ही तुमची स्वत:ची आहे का कॅब?'' मी विचारले.

''नाही. मी नुसता चालक आहे. मी नुसता नावाचाच रिच आहे.'' तो हसून म्हणाला.

''अरे होशील... एक दिवस तू खराखुरा रिच होशील!'' माझा नवरा अगदी मनापासून म्हणाला.

''थँक्यू अंकल!'' रिच खुशीने म्हणाला. त्यानं आम्हाला नायगराच्या परिसरात पुनश्च सोडलं. ''आता साडेदहाला घ्यायला येईन. ठरल्याप्रमाणे.''

''बरं.'' आम्ही निरोप दिला.

एकदम डोक्यात प्रकाश पडला. खायचं प्यायचं काय? इतक्या रात्री कुठे मिळेल बरं साडेदहाला?

''चल. आपण आधी पोटोबा करू!'' विजयची सूचना मला आवडली. आम्ही परिसराला चिकटून असलेल्या रेस्टॉरंटमध्ये उत्कृष्ट जेवण घेतलं. दिवसभराचा ताण एकदम सैल झाला.

भरल्या पोटी त्या खळाळल्या धबधब्याचं सौंदर्य अधिक डोळ्यात भरलं. नायगरावर सातत्यानं वेगवेगळ्या प्रकारचे प्रकाशझोत सोडले होते. सातत्याने धबधबा त्या इंद्रधनुषी रंगात नाहत होता. आम्ही भान विसरून बघत राहिलो. दहा वाजता लक्षात आलं की धबधब्यापाशी फक्त आम्ही दोघंच आहोत.

फक्त दोघं!

कल्पना करा. रात्रीची वेळ. नुसता प्रचंड आवाज. रंगाची आरास नि आम्ही दोघं. जोडीला फक्त बोचरा वारा. थोडी भीती वाटली. खरं सांगते. आम्ही त्या परिसरातल्या कार्यालयापाशी आलो. एक स्वीपर होता. सफाई करीत होता. त्याच्यावर कुणाची सुपरविजन नव्हती. पण व्हॅक्युम क्लीनरने तो जाजम साफ करण्यात मग्न होता. आम्ही काचेच्या दरवाजाला नाक लावून टकटक केलं. थोडा वेळ आत थांबू देण्याची विनंती केली. त्यानं न बोलता दरवाजा उघडला नि परत आपले काम चालू केले.

आत एकदम सुरक्षित वाटले.

सुरक्षित आणि उबदार!

मी पर्समधून कागद नि पेन काढलं. झरझर एक कविता लिहिली. फार चांगली उतरली होती असं वाटून शांत बसलेल्या नवऱ्याला ती वाचून दाखवली.

''कशावर आहे?''

''अरे नायगराला आलोय ना आपण? मग धबधबा सोडून मी कशावर रे लिहिणार?'' मी वैतागले.

''पण मग हीरोच्या नावाच्या उल्लेखाशिवायच कविता?''

''सपशेल फेल आहेस तू.''

''अगम्य कविता लिहिणारे कवीच फेल असतात.''

मला वाईट वाटले.

पण शहाण्या बायकोसारखी मी गप्प बसले.

टॅक्सीची, रिचची वाट बघू लागले.

ठीक साडेदहाला तो आला.

आम्ही बाहेर पडलो.

मी म्हटलं.. ''एक मिनीट. फक्त एकच मिनीट.''

''काय आता?'' पण नवऱ्याच्या प्रश्नाला उत्तर न देता मी त्या उसळत्या प्रपाताकडे धावले. कुणी पाहा. न पाहा. तो रंगात बुचकळून उधळतच होता. मी शांतपणे माझ्या कवितेच्या कागदाची नाव तयार केली. आपण शाळेत असताना कागदी होड्या करायचो तशी!

''हीरो. ही फक्त तुझ्यासाठी.'' असं म्हणून ती नाव मी झऱ्याच्या उधाण भरतीत सोडून दिली. मनात आलं.. नवलाख हिऱ्यांचा कंठा घातलेला हा प्रपात अक्षरमोती मिरवेल?.

भावुक आणि वेडी होऊन मी डोळ्यातलं पाणी पुसत नायगराचा निरोप घेतला. रिच ते सारं बघत होता.

''आवडला?''

''फार.'' अजून डोळे ओलेच होते.

''बायका नायगरावर अधिक प्रेम करतात. त्याला हजारो चुंबने देतात. फ्लाइंग किसेस! म्हणून तर हा परिसर इतका प्रेमळ झाला आहे.'' तो म्हणाला.

''सकाळी वेळेवर येशील ना?'' माझ्या नवऱ्याने रिचला एक अत्यंत गद्य प्रश्न विचारून पद्याला पूर्णविराम दिला.

''येस् सर!'' तो न रागावता म्हणाला.

आम्ही यूथ हॉस्टेलवर पोचलो तर बाहेर माझ्या नावाची चिठ्ठी नॅन्सीने लिहून ठेवली होती

''हाय. आता खूप उशीर करून तुम्ही येणार म्हणून गेट उघडं ठेवलं होतं. प्लीज ते नीट लॉक करून घ्या. सकाळी जाताना फार लवकर जाताय तेव्हा काउंटरवर चादरी आणि अभ्रे ठेवून जा. डिपॉझिटची टेन डॉलर्सची रक्कम काउंटरवर पाकिटात घालून ठेवलीय. शेजारी काही छान कार्डस् आहेत. टू डॉलर्स ईच. नायगराची आठवण! घ्यावीशी वाटली तरी नेमकी रक्कम पाकिटात ठेवून कार्डस्

घ्या. तुमचा पुढला प्रवास सुखाचा होवो. कारण तुम्ही जाल तेव्हा मी साखरझोपेत असेन. बाय. प्रेम. स्नेह— नॅन्सी.''

सारा विश्वासाचा मामला.

मी दार घट्ट बंद केलं.

आम्ही गजर लावून झोपेच्या अधीन झालो.

भल्या पहाटे सारं आवरलं नि खाली आलो.

चादरी, अभ्रे ठेवून आमचं पैशाचं पाकीट उचलल. कार्ड खरेदी केली. तब्बल पाच! नि ते पाकीट जसंच्या तसं परत काउंटरवर ठेवलं. मी त्या पाकिटावर एक सुंदरशी थँक्यू नोट लिहिली. नवऱ्याने वाचली.

''कधी कधी तू बरं लिहितेस.'' तो कौतुकानं म्हणाला. मी नाक फुगवून टॅक्सीत बसले.

''अग, एखाद्याला नाही समजत कविता.'' त्याचं चालूच होतं. रिचनं वाटेवर त्याचं घर दाखवलं. ''माझी सावत्र आई आणि तिची मुलं मी सांभाळतो. सख्खी आई नि बाप गेला!'' तो सहजपणे म्हणाला. ''ती बिचारी एकटी काय काय करेल?''

अरेच्या अमेरिकेतही 'स्व' पलीकडे बघणारी माणसे आहेत तर! . मनानं नोंद केली.

''रिच... यू आर रिअली रिच. कारण तुझं हृदय श्रीमंत आहे.'' नवरा मनापासून म्हणाला.

आम्ही अगदी वेळेआधी एअरपोर्टवर आलो. आज... अगदी प्रथमच माझ्या नवऱ्यानं रिचला सव्वापाच डॉलर्सची घसघशीत टीप दिली. वर म्हणाला,

''रिच, भारतात 'सव्वा'च्या दक्षिणेला फार मानतात. जा. आमचे आशीर्वाद आहेत तुला!''

''नमश्ते.'' तो अगदी भारतीय पद्धतीनं हात जोडून म्हणाला. आम्हाला मोठी गंमत वाटली. हे त्यानं भारतीय पर्यटकांकडून उचललं असणार.

आम्ही निरोप घेऊन वळलो.

''अंकल. '' त्यानं हाकारलं. आम्ही मागे वळून पाहिलं. त्यानं दोन बोटं हवेत उंच केली होती. दोस्तीची. आम्ही प्रतिसाद दिला. आणि तो टॅक्सीकडे वळला.

आम्ही लॉकरपाशी आलो. नोट आत सरकवली. लॉकर उघडला. सामान सुरक्षित होतं.

नायगराचा निरोप घेताना आम्ही एकमेकांचे हात घट्ट धरून म्हणालो

''स्वस्त मस्त झाली ना बफेलो टूर?''

## वॉशिंग्टन डी. सी.

१७ मे. सकाळी अगदी ठरल्यावेळी म्हणजे ७ वाजून २० मिनिटांनी आमचे विमान बफेलोहून सुटले... ते ८ वाजून २० मिनिटांनी वॉशिंग्टनला पोहोचले. केवळ एक तासाची फ्लाईट.

आम्ही आता खूपच शहाणे झालो होतो. विमानतळावर उतरताच आम्ही लॉकर्सकडे धाव घेतली.

पण हाय रे दैय्या!

इथले लॉकर्स चार डॉलर्स भाड्याचे!

आपण राजधानीत आलो आहोत.

तेही जगातल्या सर्वात श्रीमंत राष्ट्राच्या राजधानीत! याची जाणीव झाली. मग ओझे मुकाट्याने पाठीवर लादले आणि विमानतळाबाहेर पडलो.

आता मेट्रोबसने जाण्यात अर्थ नव्हता. एक तर ती दूर होती आणि हातात ओझे होते.

मग आम्ही टॅक्सीसाठी असलेल्या क्यूत उभे राहिलो. मी तिथल्या एका ट्रॅफीक ऑफीसरला यूथ हॉस्टेलचा पत्ता दाखविला आणि विचारले,

''इथपर्यंत टॅक्सी किती पैसे घेईल?''

''जवळ जवळ तेरा डॉलर्स.'' तो म्हणाला.

टॅक्सी खरोखरीच साडेतेरा डॉलर्समध्ये यूथ हॉस्टेलला पोचली.

वॉशिंग्टन डी. सी. चे यूथ हॉस्टेल प्रचंड मोठे आहे. देशविदेशचे नाना भाषा बोलणारे आणि नाना परीचे लोक तिथे होते. आम्ही विचारले,

''आमचे सामान, ताब्यात घ्याल का?''

''नक्की. दोन डॉलर पडतील. संध्याकाळपर्यंत एखादी रूम खाली होईल. तिथे तुम्हाला फिट करतो. कारण तुमचे रिझर्वेशन आहे म्हणून तुम्हाला प्रेफरन्स!''

''थँक्यू!''



आम्ही त्याचे आभार मानले. लगेज ताब्यात दिलं. अगदी मोकळे मोकळे होऊन बाहेर पडणार इतक्यात काउंटरवरला कल्लू ओरडला,

''विजया ऽऽ''

बाप रे! काय दचकले मी!

याला कसं माझं नाव ठाऊक?

मग क्षणार्धात लक्षात आलं. माझं नि ह्यांचं यूथ हॉस्टेलचं कार्ड आत्ताच तर मी त्याच्या स्वाधीन केलं होतं.

मागे विमानतळावर मुंबई-दिल्ली प्रवास एकटीनं करीत असताना एक तरुण मुलगा असाच ढांगा टाकीत माझ्या जवळ आला होता. माझ्या दोन हातातल्या दोन बॅगा बघून त्यानं आपुलकीनं विचारलं होतं,

''मे आय हेल्प यू मिसेस वाड?''

काय मी चकित झाले होते. मनात आलं, नटी वगैरे नसूनही यानं आपल्याला ओळखलं? कधीतरी टीव्हीवरले मुलाखतीचे कार्यक्रम बघितले असणार! माझ्या प्रसिद्धीचं वलय असं मनभर दाटून मी ममतेनं त्याला विचारलं,

''तू रे कसं मला ओळखलंस?''

त्यानं मिष्किलपणे माझ्या काळ्या बॅगेकडे बोट दाखवलं. सारा उलगडा क्षणार्धात झाला.

तो माझा पहिला विमानप्रवास होता आणि विमानप्रवासात नेहमी बॅगा हरवतात असं मला कुणीतरी सांगितलं असल्याने मी काळ्या बॅगेवर ओला खडू वापरून ढब्या अक्षरात लिहून ठेवलं होतं, माझंच नाव, आडनाव!

खरंच, इतकी लाज वाटली. कसली प्रसिद्धी न् कसलं काय! त्यानं एव्हाना माझ्या हातातली बॅग घेऊन चालायला सुरुवात सुद्धा केली होती.

''विजयाऽऽ युवर फोन.'' तो उंच आवाजात ओरडला

मी धावले. फोन घेतला. लेकीचा होता.

''सुखरूप पोचलात ना?''

''हो ग.''

''चला. आता हा प्रवासाचा शेवटचा टप्पा!''

''सगळं नियोजन तू इतकं झकास केलं होतंस तायडे की कुठे अडचण आली नाही.''

''लवकर या आता. बाळ तुमची वाट बघतंय.''

''आमच बाळ की बाळीचं बाळ?''

''दोघं.''

तिचा आवाज ऐकून खूप बरं वाटलं. ती बाबांशीही बोलली नि आम्ही खरोखर अधिक ताजेतवाने झालो.

आम्ही दोघं मेट्रो बसच्या शोधात निघालो. यूथ हॉस्टेलवर मिळालेला वॉशिंग्टन डी. सी. चा चकटफू नकाशा नीटपणे न्याहाळला.

मग लक्षात आले की इथे मेट्रो रेल ढेंगेवर आहे.

पायी पायी जाता येईल इतकी जवळ.

तेच केलं.

मेट्रो रेलचं तिकीट केवळ ५ डॉलर आहे. तेही सबंध दिवसभराचं. कितीही आणि कुठेही भटका! मध्यरात्रीपर्यंत!

बोला!

आणखी स्वस्त काय मिळेल?

मग ठरवले. गाइडेड टूर नको. आपण आपले! ..

मेट्रो रेलने प्रवास सुरू केला आणि स्मितत्सोनियन म्युझियम्सच्या 'गावा'तच सरळ शिरलो.

इतिहास, अवकाश, विज्ञान, चित्र, शिल्प अशा वेगवेगळ्या भव्य भव्य इमारती.

सकाळपासून रात्रीपर्यंत आम्ही तिथेच होतो.

माझा नवरा पक्का इतिहासप्रेमी. त्यामुळे त्याला आत्यंतिक आनंद झाला.

मी इतकी म्युझियम्स बघितली आहेत आजवर. . त्यातले आपले बंगलोरचे म्युझियम मला फार आवडले होते. पण इथले एकेक म्युझियम हा चमत्कार आहे चमत्कार!

बघावाच! अनुभवावाच असा!

तहानभूक विसरून आम्ही तो सारा चमत्कार डोळ्यात साठवीत होतो. बघता बघता दिवसच काय... संध्याकाळही सरली. रात्र गडद होऊ लागली तसे आम्ही मेट्रो रेलने परत यूथ हॉस्टेलकडे निघालो.

हॉस्टेलवर पोचलो तेव्हा रूम मिळाली होती. सामान घेऊन वर पोचलो. केवळ पंचाहत्तर सेंट्सचे लॉकर वर (आमच्या मजल्यावर. प्रत्येक मजल्यावर ते आहेत) उपलब्ध होते. त्यात सामान कोंबलं. दिवसभर चालून चालून पायाचे अगदी तुकडे पडले होते. अनावर झोप आणि भयंकर भूक अशी विचित्र अवस्था झाली होती. पण हॉस्टेलवर जेवण मिळत नाही. शेवटी तिथे उपलब्ध असलेली कॉफी पिऊन आणि वेफर्स खाऊन आम्ही झोपेच्या कुशीत शिरलो. दुसऱ्या दिवशी पहाटे उठायचे होते ना!

## व्हाईट हाऊस

ठरल्याप्रमाणे पहाटे उठलो. प्राजक्ताने माहिती काढली होती की पहाटेच व्हाईट हाऊसची तिकिटे मिळवावी लागतात. त्याप्रमाणे सहा वाजता लाईन लावून व्हाईट हाऊसची तिकिटे मिळवली.

एक मात्र बरंय.

वॉशिंग्टन डी. सी. चं यूथ हॉस्टेल अगदी मध्यवर्ती वस्तीत आहे. फार सोयीचं! इथून व्हाईट हाऊसला अक्षरश: वीस मिनिटात चालत जाता येतं.

स्वस्त आणि मस्त टूर करण्यासाठी थोडा त्रास घ्यावा लागतो आणि बरीच माहिती गोळा करावी लागते हे मात्र खरे. आता हेच पाहा ना! वॉशिंग्टन डी. सी. दाखवणाऱ्या टूरिस्ट बसेस रस्तोरस्ती आहेत. पण त्या ३६ डॉलर्स प्रत्येकी घेतात. सकाळी ९ ते संध्याकाळी ६. त्यात वडवड करीत तुम्ही २०-२० मिनिटात म्युझियम्सच्या भव्य इमारती वरवर बघा. व्हाईट हाऊससकट वॉशिंग्टन मेमोरिअल फटाफट नजरेखालून घाला. मधेच वीस मिनिटं देतील तेव्हा बकाबका जेवा!

सांगितलंय कुणी?

जे आवडेल तिथे मनसोक्त रेंगाळावं.

जे पाहण्यात फारसा इंटरेस्ट नसेल ते खुशाल टाळावं.

मस्त कलंदर भटकावं.

हवं तेव्हा खावं!

खरं ना?

आम्ही एका दिवसात कोंबलेली टूर दोन दिवसात आणि दोघं मिळून केवळ वीस डॉलर्समधे केली! आदल्या दिवशी दहा डॉलर्स. दुसऱ्या दिवशी दहा! जेवणाचे पैसे मात्र वेगळे

तर व्हाईट हाऊस!

व्हाईट हाऊसची तिकिटे फुकट मिळतात. फक्त रांग लावावी लागते.

लावली!

उसमे कौनसी बडी बात है?

मुंबईच्या लोकलने प्रवास करण्यात जन्म गेला आमचा. आमच्या इतकी सोशिक माणसे पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच आढळतील.

तिकीट पटकावून आम्ही धन्य धन्य झालो आणि मग व्हाईट हाऊस व्हिजिटर्स इन्फॉर्मेशन सेंटर येथे जाऊन व्हाईट हाऊसवर तयार केलेली एक अतिशय सुंदर फिल्म बघितली. यात हिलरी क्लिंटन आपले स्वागत करते आणि बिल् क्विंटन

आपल्याला निरोप देतात. त्यांची पिंक रूम, ब्लू हॉल अशी वेगवेगळ्या रंगात बुचकळलेली दालनं बघून डोळे दिपतात. पिंक म्हणजे भिंती, पडदे, रुजामे सारं सारं पिंक. इतकंच काय, त्या खोलीतली क्रोकरीसुद्धा पिंक. मला ते बघता बघता मी पुन्हा 'पिंक' झाले आहे असं वाटायला लागलं.

ह्याच इन्फॉर्मेशन सेंटरमधे अमेरिकेचे आजपर्यंत जे जे राष्ट्राध्यक्ष झाले त्या सर्वांचा चित्रालेख उभा केला आहे. अतिसुंदर!

राष्ट्राध्यक्षांची कुटुंबवत्सल प्रतिमाही छायाचित्रकारांनी मोठ्या कौशल्याने टिपली आहे. थेट लिंकन टु बिल् क्लिंटन.

आम्ही मग पुनश्च व्हाईट हाऊसकडे प्रयाण केले. ती फिल्म अगोदर बघितलेली असल्यामुळे बरेचसे कुतूहल शमले होते. बाहेरच्या बाजूने व्हाईट हाऊसचे खूप फोटो काढले. आत सरकलो. शिस्तबद्ध क्यूमधून.

अमेरिकन लोकांना या वास्तुबद्दल गर्वयुक्त अभिमान वाटतो. लेडी क्लिंटनला भेटायचा मी प्रयत्न केला. पण त्या म्हणाल्या की पुढल्या खेपी भेटू! मनात म्हटलं, त्या प्रत्येकालाच असं गोड बोलून कटवत असतील. हिलरीबाईबरोबर पिंकरूममध्ये बसून पिंक कपबशीतून पिंक चहा पीत पिंकी पिंकी गप्पा मारून त्यांचा एक पिंक इंटरव्ह्यू मराठी नियतकालिकासाठी घ्यायची माझी इच्छा त्यामुळे अपुरी राहिली.

नंतर सारी व्हाईट हाऊसची इमारत मनभर साठवून बाहेर पडलो आणि दाबून जेवण केलं. चायनीज. अगदी आठ डॉलरवाले! महागडे!!

कारण अद्याप एक दिडकीसुद्धा खर्च झाली नव्हती. आता आम्ही अगदी सराईत प्रवासी झालो होतो. लगेच कालच्यासारखी मेट्रो रेलची तिकिटे काढली आणि युनायटेड स्टेट कॅपिटॉल बघितले. अमेरिकन संसदेचे थेट दर्शन घेता येते. असेच रांग लावा... फुकट तिकिटे घ्या.. बघा.. पद्धतीने. फक्त पेशन्स हवा! युनायटेड स्टेट कॅपिटॉलमध्ये अगदी पहिला असेब्ली हॉलही जसाच्या तसा जपलेला आहे. त्याच्या ( इमारतीच्या ) अनेकानेक पायऱ्या चढून जाताना आपल्या भारतीय आर्किटेक्चरची आणि टाऊन हॉलच्या लायब्ररीची खूप आठवण झाली.

नंतर असे समजले की वॉशिंग्टनचे मॉन्युमेंट– ती जगप्रसिद्ध पेन्सिल- तिकिटाविना- अगदी चकटफू रात्री आठनंतर बघता येते. प्रमुदित होऊन आम्ही मग लिंकन मॉन्युमेंट बघितले. ॲब्राहम लिंकनचे मेमेरिअल बघताना ऊर भरून आला. वर्णभेदावर प्रहार करणारा, सर्वार्थानं मोठा माणूस. नि त्याचा रोमहर्षक इतिहास साक्षात उभा!

अक्षरश: रात्री आठपर्यंत आम्ही भटक भटक भटकलो. जवळ असलेली अमेरिकन आर्ट गॅलरीसुद्धा बघितली.

मग शांतपणे क्यूत उभे राहिलो आणि त्या जगप्रसिद्ध पेन्सिलच्या पोटात तब्बल एका तासाने शिरलो. ताशी ६ मैल वेगाने लिफ्ट वर जाते. पेन्सिलच्या अगदी उंच टोकापर्यंत! तिथून रात्रीचे रत्नहारासारखे चमचमते वॉशिंग्टन डी. सी. डोळाभर बघितले. आमची बघायची राहिलेली आरलिंग्टन् नॅशनल सिमेट्री, जॉन केनेडींची समाधी यांचे तेथूनच दुरून दर्शन घेतले. प्रत्येक ठिकाणी दुर्बिणी, तुम्ही काय बघत आहात त्याची माहिती, त्या ठिकाणाची ठळक ठळक वैशिष्ट्ये नीटसपणे लिहिलेली आहेत. त्यामुळे खूप समाधान वाटते.

वॉशिंग्टन डी. सी. ची सफर अशी संपत आली. रात्र चढत होती. सारी राजधानी दिव्यांच्या झगमगाटात न्हाऊन निघत होती. आम्ही पुन्हा एकदा त्याच सकाळच्या तिकिटावर मेट्रो रेलमध्ये बसलो नि यूथ हॉस्टेलकडे परतलो.

इतके हिंडलो, पण जराही थकलो नव्हतो. कारण काठोकाठ समाधान! स्मार्टनेसची फीलिंग! वाचलेले... हुशारीने वाचवलेले डॉलर्स.. आणि उद्या लाडकी ताई भेटणार ही गोड जाणीव! बरंच काही...

झोपेच्या कुशीत शिरताना डोळ्यांसमोर वॉशिंग्टन मेमोरियलची पेन्सिलच तरंगत होती.

मी आपल्याला आवर्जून सांगते.. की हे ठिकाण बघायला तुम्ही जाल तेव्हा हमखास रात्रीचीच वेळ निवडा. कारण रात्री तिकिटाची गरज नाही.

रांगेत उभे राहा.

प्रतीक्षा करा.

वर चला.

मजा लुटा!

ती जगातल्या आश्चर्यात सामावलेली 'पेन्सिल' हजारो पर्यटकांना अविस्मरणीय आनंद देत उभीच आहे. उभीच आहे!

रात्री बऱ्याच उशिरा दारावर टकटक झाली. ''विजया, युवर कॉल फ्रॉम न्यूयॉर्क!''

चादर फेकून ताडकन उठले. नवराही धावला.

फोन तायडीचा होता.

''उद्या येताय ना?''

''आलोच.'' म्हणून आरोळी ठोकली.

दुसऱ्या दिवशी अमेरिकनांच्या या सुंदर, स्वच्छ, डौलदार राजधानीचा निरोप घेतला.

वॉशिग्टन हे अत्यंत महागडे शहर आहे. पण या अतिमहागड्या शहरात केवळ १८ डॉलर प्रत्येकी खर्चून आम्ही यूथ हॉस्टेलमध्ये राहिलो. आणि मेट्रो रेलमुळे केवळ २० डॉलर्समध्ये सारे वॉशिग्टन पालथे घातले. जेवणाला त्यामुळे 'भपू' पैसे उरले आणि खरेदीलाही!

नातवासाठी खेळणी, मुलीना आणि जावयांना टी शर्ट खरिदता आले. वॉशिंग्टनची चित्रे मिरवणारे टी शर्टस् अवघ्या तीनतीन डॉलर्सना मिळाले तेव्हा आमची विजयी मुद्रा बघण्यासारखी होती.

वॉशिंग्टन डी. सी. ते न्यूयॉर्क हे अंतर विमानाने फक्त तासाभराचे आहे.

याच विमानतळावर आम्ही यू. एस. एअरलाईन्सचे फॉर्म भरले. आत्तापर्यंत आम्ही अमेरिकेत १० हजार स्कायमाईल्स प्रवास केला होता आणि त्या प्रवासाचे बक्षीस म्हणून आम्हाला एअर लाईन पुढल्या प्रवासात (म्हणजे त्याला काळाचं बंधन नाही बरं!) २५ % इतकं घसघशीत कन्सेशन देणार होती.

पुन्हा आम्ही जाऊ को न जाऊ!

पण ती कन्सेशनची बातमी ऐकून आम्ही खूप आनंदलो एवढं मात्र निश्चित.

आमचा एका संपूर्ण अनोळखी देशातला प्रवास आम्ही हिमतीने पार पाडला होता ह्याचाही आनंद आणि अभिमान मनात होताच.

अर्थात यात प्लॅनिंग स्टेजला प्राजक्ताचा सिहाचा वाटा होता.

कुठे गेल्यावर काय बघावे, कुठे राहावे, किती दिवस राहावे.. सारे काही!

पण प्रवास करायला आम्ही दोघंच दोघं होतो ना! तो करून आल्यावर आम्हाला केवढा तरी अनुभव आला होता. . नि तो अनमोल होता.

न्यूयॉर्कमध्ये लेक, जावई आणि लाडकं गोडुलं बुटकुलं विमानतळावर स्वागतासाठी सज्ज बघून मन आनंदून गेलं. एक सुंदरशी सफर आम्ही आत्मविश्वासाने पूर्ण केली होती.

अमेरिकेत तुमचे एक तरी नातेवाईक अथवा ओळखीचे नि प्रेमातले (साध्या.. मैत्रीच्या) माणूस असले तर खरोखर बहार! कारण लॉग ड्राइव्हला ती आपल्याला घेऊन जातात. इथले मैलोगणती पसरलेले, स्वच्छ, सुंदर नि खड्डेविरहित गुळगुळीत विस्तीर्ण रस्ते विलोभनीय आहेत. १२० मैलांच्या ( ताशी ) वेगानं धावणाऱ्या वातानुकूलित गाड्या हे आणखी एक आकर्षण!

आम्ही अशीच एक लाँग ड्राइव्ह कनेक्टिकट येथे केली. जाताना गाडी प्राजक्ता चालवीत होती. बाहेर बर्फ पडत होते. काचा बद असलेल्या आमच्या गाडीत उच्छवास जास्त होऊन समोरची काच एकदम अपारदर्शक झाली. गाडी सुसाट वेगात नि समोर शून्य व्हिजिबिलिटी. आतल्या नि बाहेरच्या तापमानातला फरक. क्षणार्धात आम्हाला संपवायला निघाला होता.

एकच क्षण!

जीवनमरणाची सीमारेषा पुसट करणारा!

फटकन प्राजक्ताने काचा खाली केल्या.

भणाणा वारे आत घुसले.

ओजस बाळाच्या गालावर एकदम गुलाबी गेंद उमटले.

पण समोरची काच निवळली. स्वच्छ झाली!

"गणपतीबाप्पा मोरयाऽऽ"

आम्ही आरोळी ठोकली नि स्वच्छ, प्रसन्न मनाने पुनश्च मार्ग आक्रमू लागलो.

कनेक्टिकट मध्ये ताईची जी. एस्. मेडिकल कॉलेजातली (मुंबईची) मैत्रीण डॉ. अश्विनी वाघोलीकर आणि तिचे पती राजू चव्हाण राहातात. त्यांचं भव्य दुमजली घर... घर नव्हे, बंगलाच... मोठा देखणा होता. भोवती चक्क लोळावं, बागडावं अशी हिरवीकंच कुरणं! कुरणंच कुरणं!!... त्या भागाचं नावच मुळी 'द मेडोज'

राजूने स्वत: खपून केलेली बारबेक्यू पार्टी हा तेथील आनंदाचा उत्कर्षबिंदू होता. त्याच्याकडल्या पन्नास इंची भव्य स्क्रीनवर आम्ही 'द मास्क' हा अमेरिकेतला ऑस्करविनर चित्रपट बघितला. कुरणावर निजलो. बालकवींच्या कविता आठवून आठवून म्हटल्या.

'हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे....' चा जिवंत प्रत्ययकारी अनुभव घेतला.

राजू-अश्विनी या प्रेमळ, हसऱ्या, आनंदी आणि आतिथ्यशील दांपत्याने आम्हाला स्वत:च्या आईबाबांना द्यावा तसा मान दिला. प्रेम दिले नि आनंदही!

हा अमेरिकेच्या सफरीतला इंडियन पाहुणचार कायम लक्षात राहण्याजोगा ठरला.

माझ्या नि माझ्या नवऱ्याच्या जोडीने केलेल्या सफरीचे इतिवृत्त तुमच्यासाठी सादर केले आहे. त्यातल्या काही गोष्टी आपल्याला उपयोगी पडल्या आणि आपले काही डॉलर्स वाचले... काही ठिकाणं बघतानाचे मार्गदर्शन उपयोगी पडले तर आम्हा उभयतांना आनंदच वाटेल.

आपला प्रवास सुखाचा होवो ही शुभेच्छा!
बाय् !
अहं!
रामराम!!...

---

कोणत्या काळात
अमेरिका बघणे
स्वस्त पडते?

जानेवारी ते मे
आणि
ऑक्टोबर ते डिसेंबर.

यातील १५ मे ते ३१ मे
हा अगदी **बेस्ट पिरियड** आहे
कारण थंडीचा कडाका
संपलेला आणि पर्यटक
नुकतेच बाहेर पडू लागलेले !





कोणत्या काळात
अमेरिका वारी
महाग पडते?

लक्षात ठेवा.
जून ते सप्टेंबर
हे महिने महागडे
आहेत.

# यूथ हॉस्टेल्स

(यांचे ब्रीद: चरण वै मध विन्दती)

जगभर सुमारे साडेपाच हजार यूथ हॉस्टेल्स आहेत. रोज एक रात्र एका यूथ हॉस्टेलमध्ये काढायची झाली तर १४ वर्षे जगभर फिराल इतका विस्तार म्हणा ना! पण हा 'वन'वास मात्र फॅमिली, फ्रेंड्स आणि बायकोसुद्धा बरोबर घेऊन करता येण्याजोगा.

'होम अवे फ्रॉम होम' असे आपण याला म्हणू शकतो.

अमेरिका आणि कॅनडा मिळून एकूण २७० हॉस्टेल्स आहेत. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, बॉस्टन, फिलाडेल्फिया, नायगरा, लासव्हेगास, सॅनफ्रॅन्सिस्को, डेट्रॉइट, लॉसएंजेलिस, ओरलँडो ह्या सर्व प्रेक्षणीय ठिकाणी यूथ हॉस्टेल्स आहेत आणि त्यांचा खर्च १० ते २५ डॉलर रोज इतका येतो. न्यूयॉर्क येथील यूथ हॉस्टेलमध्ये तर ४०० बेड्स आहेत.

यूथ हॉस्टेल्स म्हणजे पैशाची बचत आणि फायदेच फायदे. एक तर यूथ हॉस्टेलचा मेंबर होऊन तुम्ही चिततरुण राहता. तुमची स्नेहाची- मैत्रीची कक्षा आपोआप रुंदावते. कारण जगभरचा कोणीही, कुठल्याही देशाचा प्रवासी आपला शेजारी असू शकतो.

पुरुष आणि महिला यांना वेगवेगळ्या रूम्स मिळतात. कुटुंबाला एकत्रही राहता येतो.

येथे फ्रीज, मिक्सर, ज्यूसर, मायक्रोवेव्ह सगळ्या वस्तू उपलब्ध असतात.

ग्रँड कॅनियन (फ्लॅग स्टाफ) येथे यूथ हॉस्टेलचे व्यवस्थापन स्वत: टूर कंडक्ट करते. आणि तेही अगदी रास्त दरात.

यूथ हॉस्टेल ही 'नॉन प्रॉफिट सोशल ऑर्गनायझेशन' आहे.



## मेंबर कसे व्हावे?

तुम्ही १८ वर्षाचे किंवा कितीही वर्षांचे असा. तुम्हाला यूथ हॉस्टेलचे मेंबर होता येते. फक्त २ फोटोग्राफ आणि एक वर्षाची ४० रु वर्गणी भरा. १ वर्षाची सर्वसाधारण ( ऑर्डिनरी ) मेंबरशीप मिळते. आपल्याला आजीवन सदस्यत्व हवे असेल तर वर्गणी ७५० रुपये आहे. आपण १० ते १८ वर्षे या वयोगटातले असाल तर वर्गणी २५ रुपये असते ( वार्षिक ). १० वर्षाखालील मुलांना मेंबरशीपची गरज नाही.

यूथ हॉस्टेलचे मेंबर झालात की त्या देशातली काही सवलत आपल्याला उपलब्ध होते. शिवाय हे कार्ड बरोबर ठेवले की दरवेळी पासपोर्ट काढून दाखवावा लागत नाही. ज्या गावी आपण गेला असाल तिथली माहिती देणारे माहितीपत्रक यूथ हॉस्टेलवर फुकट मिळते.

अर्ज कसा असतो त्याची झेरॉक्स कॉपी सोबत उपलब्ध आहे. ती केवळ आपल्या माहितीसाठी आहे. प्रत्यक्षात मात्र ती वापरात आणता येणार नाही. ओरिजिनलच प्रत लागते.

महाराष्ट्रातील राज्यशाखेचा पत्ता खाली दिला आहे.

१०९, स्वप्नपूर्ती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,

परळ नाका.

मुंबई- ४०००१२.

फोन नं. ४१२ ६००४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
शा. क्र. 220
२०५०३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ENROLMENT FORM

The National Secretary
youth Hostels Association of India
5, Nyaya Marg, Chanakyapuri
New Delhi- 110 021.

YOUTH
HOSTELLING
INTERNATINAL

Dear Sir,

I have read the aims and objects of the Association. I undertake to abide by its rules and discipline. I am sending my membership subscription for One Year [ ] or Two Years [ ] or Life [ ] by Cash / Bank Draft dated........................ .... and one photograph (3 x 4.2 cm. size (Two photographs for life membership). Please enrol me as a member.

Please fill in BLOCK CAPITALS

Mr. / Mrs. / Miss

Name    Surname    Name

Date of Birth [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ] Nationality [ ] Indian [ ] Foreigner

D D    M M    Y Y

Sex-    M/F

Occupation [ ] Service [ ] Business [ ] Student [ ] Housewife [ ] Others

Address

City    Pin Code

Tel. No.

Date .. .... .. . ........................    Signature of Applicant

---

For use at State / Unit Office
membership Subscription Rs. ..................... received at ................

Vide Receipt No. ..................    D D    M M    Y Y

---

For use at National Office :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| State | [ ][ ] [ ][ ] | Rs. | [ ][ ] [ ][ ] | p. |
| Unit | [ ][ ] [ ][ ] | Rs. | [ ][ ] [ ][ ] | p. |
| National Office | [ ][ ] [ ][ ] | Rs. | [ ][ ] [ ][ ] | p. |

Specimen Signature    Specimen Signature

---

# SUBSCRIPTIONS

| Item | | Price Rs. |
|---|---|---|
| 1. Membership Subscription (below 18 years) | | 25.00 |
| 2. Membership Subscription (18 years and above) | Annual | 40.00 |
| | Two years | 75.00 |
| 3. Life Membership (above 18 years only) | | 750.00 |
| 4. Annual Subscription for youth Hosteller Magazine | | 30.00 |
| 5. Handbook-- YHA of India | | 15.00 |
| 6. Hand book-- International YH Federation | | |
| Vol. I (Europe and Mediterranean countries) | | 250.00 |
| Vol. II (Asia, America, Africa and Australia) | | 250.00 |
| 7. Membership Badge- YHA of India | | 5.00 |
| 8. Registration Charges if membership card required by Registered Post | | 7.00 |
| Note : Postal Charges if other Material also required by Regd. Post | | 20.00 |
| | Total | |

(Price and Fees subject to change without notice)

The Association cannot accept any responsibility for loss of cards or materials sent to members by ordinary post.

All remittances to be sent by Bank Draft drawn in favour of "National Secretary, Y. H. A. of India" and Payable at New Delhi CHEQUES ARE NOT ACCEPTED.

Enrolment Form without 3x4.2 cm. size photograph will not be entertained.
2 photographs for life membership

**For the latest on YHAI subscribe to "The Youth Hosteller"**

**WANDERING ONE GATHERS HONEY**

## पासपोर्ट कसा काढावा

पासपोर्ट काढण्यासाठी आवश्यक बाबी कोणत्या त्या खाली दिल्या आहेत :

१. ( फोटो २ ) रेशनकार्डाच्या पहिल्या व शेवटच्या पानाच्या २ फोटो कॉपी.

३. आपल्याजवळ रेशनकार्ड नसेल तर बँकेचे किमान ३ वर्षे वापरात असलेले पासबुक.

४. शिवाय टेलिफोन बिल. (क्र. ३ + ४) जर रेशनकार्ड नसेल तर.

५. आपण सरकारी वा निमसरकारी कर्मचारी असाल तर नो ओब्जेक्शन सर्टिफिकेट.

६. शाळा सोडल्याचा दाखला व जन्म-दाखला– आपल्या जन्मदिनांकासाठी.

७. पदवीचे प्रमाणपत्र + गुणवत्तापत्र (मार्कलिस्ट)

८. १८ वर्षाखाली वय असेल तर पालकाने अर्ज करावा व ॲफिडेविट बनवावे.

९. लग्न झाले. नाव बदलले. काळजी नको. मॅरेज सर्टिफिकेट, लग्नाचा फोटो, लग्नपत्रिका जोडावी.

१०. आडनाव, नाव कोणीही बदलले तर गॅझेटची कॉपी व २ प्रेस कटिंग्ज जोडावी.

पत्ता : प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, मनिष चेंबर्स, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०००२५.

सोमवार ते शुक्रवार हे कार्यालय उघडे असते.

१० ते १२॥ अर्ज मिळतो, ३॥ ते ६॥ पासपोर्ट मिळतो. पण अर्ज केल्यापासून १॥ ते ३ महिने इतका कालावधी लागतो. सुमारे ३६० रु. खर्च येतो. पासपोर्ट रजिष्टर टपालाने घरी येतो.

ही सर्व भागदौड टाळायची झाल्यास ५५० ते ६०० रुपयांत तो एजंटामार्फत मिळतो.



## टीसीआयची ही पहा नवी कोरी सवलत

ग्रेहाऊंड बसचा पास + यूथ हॉस्टेलमधली
राहण्याची सोय अशी एक नामी युती आता
TCI कंपनीने प्रवासी मित्र मैत्रिणीसाठी उपलब्ध
केली आहे. आणि या दोहोंचे मिळून दिवसाचे
डॉलर्स किती?
किती म्हणून काय विचारता?
अहो केवळ ३३ डॉलर्स! प्रतिदिन.
डॉलरचा भाव आजमितीला अगदी
४० रु. झाला तरी राहण्याची सोय
+ प्रवासी बसची सोय केवळ १३२० रु.त
होणे म्हणजे आपल्यासाठी तर चंगळच!
या स्कीमचं. . याने की युतीचं नाव आहे.
''गो हॉस्टेलिग यूएसए डबलडील''
( अशा एकूण १५० यूथ हॉस्टेलचा
लाभ घेऊ शकता.)
टीसीआयचा नंबर २०२१८८१ / २०२७१२०

## व्हिसासाठी काय करावे?

अमेरिकेचा व्हिसा हवा असल्यास

कौन्सुलेट जनरल ऑफ दि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका

लिंकन हाऊस, ७८, भुलाभाई देसाई रोड
मुंबई-४०० ०२६.

फोन : ३६३३६११ ते १८

सकाळी ८-३० ते सायं. ५ या वेळेत अर्ज मिळतो.

अर्ज दाखल करण्याची वेळ स. ७ ते ११

व्हिसा घेण्याची वेळ ( Collection of Vissa ) सायंकाळी ४ ते ४॥

**काय हवे?**

१. फोटो- रंगीत, ग्लॉसी, पांढरी बॅकग्राउंड, फ्रंट व्ह्यू. २ कॉपी

२. सध्या रु. ७२० चा डिमांड ड्राफ्ट लागतो. ही रक्कम अगदी नेमकी हवी. ती २० डॉलर इतकी असते. रुपयाचा भाव घसरला तर ही रक्कम बदलू शकते; म्हणून कार्यालयात विचारूनच नेमक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट घ्यावा.

३. ६ महिन्यांसाठी व्हिसा फी रु. ९२५; तर ५ वर्षांकरिता ती ३७०० रु. एवढी आहे. सर्व फी पेऑर्डरने भरावी लागते व त्याची स्लिप बरोबर लागते.

**इकडे लक्ष द्या**

१. काउन्सुलेटमध्ये ब्रीफकेस नेऊ नका. ती आत नेऊ देत नाहीत. प्लास्टिक बॅग न्या.

२. प्रॉपर्टी पेपर्स, इनकम टॅक्स सर्टिफिकेट, पगाराचे प्रमाणपत्र जवळ ठेवा.

३. स्पॉन्सरशीप लेटर असेल तर उत्तम. नसले तरी काळजी करू नका.

४ कुठलीही खोटी माहिती देऊ नका.



व्हिसासाठीही एजंट संपूर्ण मार्गदर्शन करतात. मात्र व्हिसा काढण्यासाठी स्वत:लाच जावे लागते.

आपल्याला इंग्रजी भाषा येत नसेल तरी मुळीच काळजी करू नये. तेथे दुभाषे आहेत.

**ग्रे हाउंड**

★ ग्रे हाउंड ही बससेवा अतिशय स्वस्त, मस्त आणि या टोकापासून त्या टोकापर्यंत शंभर हजार मैल प्रवास घडवणारी अशी ७५ वर्षे जुनी सेवा आहे. एकूण ४४०० ए.सी कोचेस असून १० हजार शहरे जोडणारी ही सेवा अमेरिका व कॅनडात उपलब्ध आहे.

४ दिवसात १०९ डॉलर्स ते ६० दिवसांत ४९९ डॉलर्सचा पास म्हणजे केवढी स्वस्ताई! ते सुद्धा रुपयांच्या चलनात! (१-८८८-GLI PASS हा अमेरिकेतील फ्री फोन) ज्यांना बसप्रवास झेपतो, आवडतो व ज्यांचेजवळ वेळ आहे त्यांनी ग्रे हाउंडचा लाभ घ्यावा.

★ या खेरीज ॲमट्रॅक ही **रेलसेवाही** उपलब्ध आहे. आपल्या एजंटकडे माहिती मिळवावी.

त्यांचा अमेरिकेतील नंबर ( मोफत सेवा- अमेरिकेत फक्त )

१-८०० - USD - RAIL

★ प्रकृतीची काळजी असल्यास **ओव्हरसीज मेडिक्लेमची सेवा** न्यू इंडिया ॲशुअरन्स आणि जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन येथे उपलब्ध होते. आपला एजंट या कामी साह्य करू शकेल.

## टी. सी. आय. सेवा

*टी. सी. आय. कंपनी ग्रेहाऊंड ही बससेवा व ॲमट्रॅक ही रेलसेवा उपलब्ध करून देते व भारतीय चलनात म्हणजे रुपयात त्याचे तिकिट अमेरिकेसाठी भारतातच बुक करता येते.*

*VISITING USA ?*

*Call 2021996/1881/7120*

*FOR BEST HOLIDAY BARGAINS*

***Hotel packages***
***Mini Tours***
***Amtrak rail passes***
***Greyhound coach passes***
***Cruises in Bahamas, Caribbean, Alaska***
***Railtours of Rocky Mountains - Canada***
***Funtours with Indian veg/non-veg meals.***

TCI

Travel Corporation (India) Ltd.

**Chander Mukhi, Nariman Point**
**Mumbai 400 021**

## असाही एक अनुभव

*खरे तर ग्रेहाऊंड बसेस हा अमेरिका पालथी घालण्याचा सर्वात स्वस्त आणि मस्त मार्ग! पण ज्यांना बस प्रवास झेपत नाही त्यांनी आमच्यासारखी व्हिजिट यूएसएची विमानमार्गाची तिकिटं काढणे उत्तम.*

*एकदा एका जोडप्याने ग्रेहाऊंड बस सेवेचा कसा उपयोग केला ते ऐकून आपली करमणूक तर होईलच वर आपण त्यांच्या कल्पनाशक्तीस दाद द्याल.*

*न्यूयॉर्क बघून हे जोडपे ग्रेहाऊंडने वॉशिंग्टनला पोचले. रात्र झाली होती. राजधानीतली हॉटेले भयानक रेट्स दाखवून जणु डोळे वटारत होती. मग काय? जोडी परत ग्रेहाऊंडमध्ये बसलं. पास होताच चांगला १५ दिवसांचा! चकटफू परत न्यूयॉर्क! रात्री बसमधल्या शयनकक्षात झोप! परत त्याच बसने दुसऱ्या दिवशी फुकटात वॉशिंग्टन डीसीला हजर! एक रात्र अशी ग्रेहाऊंड सखीसोबत चक्क चकटफू!*

अमेरिकेत
प्रेक्षणीय स्थळं पाहिली
तशी माणसंही...
काही अनुभव
मनावर कोरले गेले.
काही चटका लावून गेले.
त्या माणसांबद्दल नि
त्या अनुभवांबद्दल...

# अमेरिकन अपेक्षाभंग

लॉसएंजेलिसच्या अतिभव्य डिस्नेनगरीत जाण्यासाठी आम्ही दोघं बसमध्ये बसलो होतो. मनात मात्र गौरी ठाण मांडून बसली होती. कालची रात्र आम्ही गौरीच्या सहवासात काढली होती. गौरी माझ्या मैत्रिणीची मुलगी. शांताची. गौरी एम. बी. बी. एस्. झालेली. सहज म्हणून वर्तमानपत्रातल्या एका जाहिरातीला तिनं प्रतिसाद दिला आणि पुलकित हे नाव तिच्या नावाशी अलगद जोडलं गेलं. पुलकित अमेरिकेतून आला होता. स्वत: तिकडला एम्. डी. होता. लठ्ठ पगारावर लॉसएंजेलिस इथल्या हॉस्पिटलमध्ये नोकरी करीत होता. उत्तम बंगलीवजा घर. मोठी लंबेलाट लिमोसीन कार दाराशी! या वैभवी कोंदणात गौरी अलगद बसली. हुशार, सुंदर, गुणी! तिचं लग्न अवघ्या आठ दिवसात ठरलं आणि आमच्या ओळखीच्या एका मित्राच्या एअरकंडिशंड छोटेखानी हॉलमध्ये झालं. शांताचा मुलगा ऑस्ट्रेलियाहून खास लग्नासाठी आला होता.

लग्न लागलं. मुलगी पुलकितबरोबर अमेरिकेला आणि मुलगा त्याच्या पत्नीबरोबर ऑस्ट्रेलियाला रवाना झाले. शांता नि शांताचे यजमान अगदी एकटे झाले. आम्ही अमेरिकेला जायला निघालो तेव्हा शांतानं आवर्जून गौरीचा पत्ता आणि फोन नंबर आम्हाला दिला. ''लॉसएंजेलिसला जाणं होईल तेव्हा नक्की गौरीला भेटा'' असं तिनं डोळ्यात पाणी आणून बजावलं.



आम्ही व्हिजिट यूएस्‌एची तिकिटं भारतातून बुक केलेली होती. त्यामुळे आमच्या मुलीचं बाळंतपण यथास्थित करून बाळ दीड महिन्याचं झाल्यावर बाहेर पडलो होतो.

हा आमचा दुसरा थांबा होता. लॉसएंजेलिसला पोचल्यावर आम्ही गौरीला फोन केला ती स्वत:

आम्हाला घ्यायला आमच्या ॲनाहाईम लॉजवर आली. बरोबरचा तरुण मात्र वेगळा होता. मी कोड्यात पडलेली बघून ती म्हणाली, ''मावशी, अशी गोंधळू नकोस. हा पुलकित नाही. हा सत्यरंजन!''

असेल मित्राबरोबर आली, असा विचार करून मी अधिक काही बोलले नाही.

आम्ही तिच्या आलीशान सुंदर घरात पोचलो. सगळीकडे वैभवाच्या समृद्ध खुणा विखुरल्या होत्या. गौरीनं स्वयंपाकही फार रुचकर बनविला होता. सत्यरंजनसह आमचं जेवण तिनं वाढलं.

''अग, पुलकित येऊ दे ना!'' मी म्हटलं.

''तो येणार नाही.'' ती म्हणाली.

कसं काय अधिक काही विचारायचं? असा विचार करून आम्ही गप्प गप्प झालो. शेवटी जेवणं झाली. निरोप घेऊन सत्यरंजन गेला नि मग एकदाचं गौरीनं तोंड उघडलं.

''मावशी, पुलकित आणि मी वेगळे होतोय.''

''काय? केवळ सहा महिन्यात?''

''हो.''

''गौरी, तुझ्याबद्दल मला आत्मीयता वाटते, प्रेम वाटतं म्हणूनच बोलतेय. तू प्लीज गैरसमज करून घेऊ नकोस. पण नवरा नि बायको यांची एकमेकांना ओळख व्हायला काही वर्षं जावी लागतात ग. एकदम असं निकरावर येऊन कसं चालेल?''

''मावशी, लग्न मोडायला कुणाला आवडेल ग? सांग ना! आम्ही भारतीय मुली हा भातुकलीचा खेळ निश्चितच मानत नाही. पण पुलकित फार इगोइस्टिक आहे. तो माझा आत्मसन्मान जपत नाही. मला स्वत:ला निर्णय घेऊ देत नाही. आयुष्यभर हे असं जगणं मला शक्य नाही.''

''उदाहरणार्थ?''

''उदाहरणार्थ!'' गौरी विषादानं हसली.

''तुला त्रास होत असेल तर नको सांगूस बाळ!'' हे म्हणाले.

''नाही काका. त्रास व्हायचा तो होऊन गेला. आता माझं मन चांगलं कणखर बनलं आहे ''

''बोल मग. मनमोकळं!''

''येस् काका. मन मोकळं करणारच आहे मी. पुलकितला मी पसंत केला ते त्याची डिग्री, त्याचं रूप, त्याचं वैभव बघून हे तर खरंच! पण सुविद्य माणसं

सुसंस्कृत असतातच असं नाही मावशी कदाचित पुलकितला असंस्कृत म्हणणं चुकीचंही असू शकतं. पण ही इज नॉट मेंट फॉर मी! दॅट इज सर्टन. मी प्रथम इथे आले तेव्हा पुलकित म्हणाला की मी खास खास अशा इंडियन डिशेस त्याच्यासाठी बनवाव्यात म्हणून! मला कुठे ग मावशी स्वैपाक येत होता! एम्. बी. बी एस्. पर्यंत मीही 'बीझी बी'च होते ना! तरी पण आईनं दिलेलं 'रुचिरा' उघडलं आणि मी प्रयत्न करू लागले, केवळ पुलकितला हवं म्हणून! पण मी केलेल्या पदार्थाची खिल्ली उडवून मला 'यूसलेस वाईफ' हे बिरूद तो न चुकता द्यायला लागला मावशी, त्याला बिछान्यावर एकही सुरकुती चालत नाही उशीचा कोन बदलला तर तो उश्या खिडकीतून बाहेर फेकतो. मी त्या लॉनवरून उचलून आणायच्या. धिस् इज अनइमॅजिनेबल. मी मानसोपचारतज्ज्ञाकडे माझा प्रॉब्लेम घेऊन गेले होते ग. मला हे लग्न वाचवायची इच्छा होती. हा आज जेवायला आला होता ना. तोच तो सत्यरंजन. त्याच्याबरोबर माझी आठ सिटिंग्ज झाली. पुलकित सुद्धा त्याला दोनदा भेटला. त्यावरून सत्यरंजननं निष्कर्ष काढला आहे. पुलकितला एक छान छान दिसणारी, घर सजवणारी, उत्तम उत्तम कपडे परिधान करणारी, त्याला नटून सजून रिझवणारी नि खुशबूदार स्वैपाकीण हवी होती. त्या बदल्यात तो तिला खूप डॉलर्स आणि बायको ही पदवी मोठ्या उदारपणे द्यायला तयार झाला नव्हता का?''

आम्ही गप्प गप्प झालो. तीच माझे हात हातात घेऊन म्हणाली, '' मी मग बंड केलं. म्हटलं, मला इथल्या परीक्षा द्यायच्या आहेत. तुझ्यासारखंच इथे मलाही एम डी करायचंय आणि नवं नवं शिकून प्रॅक्टीस करायचीय. आपलं सहजीवन 'नटणे थटणे खाणे झोपणे' या चक्रावरच स्वार झालंय. मला ते असह्य झालंय.''

''मग?''

''मग काय ग? तो चवताळून माझ्या अंगावरच आला. म्हणाला, तुझ्या शिक्षणाला इथे पाच वर्ष लागतील. ते इतकं स्ट्रेन्युअस असतं की घरी आल्यावर तुला काही एक एनर्जी राहणार नाही. मग तोडा पावाचे तुकडे. मला ते बिलकूल चालणार नाही युवर डिग्री इज जस्ट अ डेकोरेशन हे समजून चाल. इथे माझे हाल करून तू शिकणार? बिलकूल नही चलेगा. नीट लक्ष देऊन ऐक जर का पुन्हा हा विषय काढलास तर यू विल हॅव टु लूज मी! आय विल पॅक यू ऑफ.''

माझे पाय एकदम गळून गेले. डोळे न ऐकता एकसारखे भरून येऊ लागले. गौरीसाठी माझा जीव अगदी हळवा हळवा झाला. तिनं मोठ्या ममतेनं माझे डोळे पुसले.

रडू नकोस मावशी. मी प्राप्त परिस्थितीवर व्यवस्थित तोडगा काढला आहे. त्या रात्री मी खूप रडले. एकदा निचरा झाल्यावर मी शांतपणे विचार केला. या परिस्थितीला पर्याय कोणते कोणते? एक- आनंदानं त्याच्या आवडीला रुकार देऊन लाडावलेल्या मांजरीगत जगणं!... शक्य आहे? अजिबात नाही. दोन- आईला फोन करून सांगणं नि भारतात परतणं... किंवा तीन- सत्यरंजन या भल्या मित्राचा सल्ला घेणं. मी मग सत्यरंजनशी बोलले. तो म्हणाला की मी इथे शिकावं आणि लागेल ती मदत तो करेल. व्हाय शुड आय क्राय? इतक्या प्रगत देशात आले आहे तर ज्ञान सोबतीला घेऊन जाईन.''

''अग पण पुलकित इथे राहू देईल?''

''नाही देणार. सध्या तो शॉकमध्ये आहे. कारण त्याच्या 'आय विल पॅक यू ऑफ'ला मी 'आय कॅन लिव्ह ऑन माय ओन इन धिस कंट्री,' असं सज्जड उत्तर दिलंय. गेले सात दिवस तो त्याच्या मेडिकल सेंटरमधून घरीच आलेला नाही.

''आता ग?'' माझ्या स्वरातली काळजी तिला जाणवली.

''मावशी, आईला अजून काही ठाऊक नाही. पण मीच कळवीन. तू काळजी नको करूस. सत्यरंजनसारखा सन्मित्र माझ्या पाठीशी उभाय. तो माझ्यासाठी धडपडतो ग. त्याच्या एका मैत्रिणीचं अपार्टमेंट मी शेअर करणार आहे लवकरच. मी नक्की उभी राहीन. तगेन. सडत कुजत जगण्यापेक्षा मोकळा श्वास घेत एकटं जगणं मी पसंत करते.''

गौरीचं चुकतंय असं आम्हाला मुळीच वाटलं नाही. आता बसमध्ये तिचीच आठवण येत होती नि मन म्हणत होतं..


''बेस्ट ऑफ लक गौरी!''

## लाखमोलाची थप्पड

आई किंवा बाप यांची थप्पड न खाल्लेला विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी अजून माझ्या पाहण्यात नाही. निदान एक तरी!. अहो, छडी लागे छमछम, विद्या येई घमघम...अशी पक्की समजूत असलेली माणसं आपण! मुलं लाडानं बिघडतात ही ठाम समजूत!

मी मात्र माझ्या दोघी मुलींना एकही थप्पड आजवर मारली नाही. (आता त्या पंचवीस-सव्वीस वर्षाच्या झाल्या तेव्हा 'पुढला' प्रश्न मिटला.) तर या गोष्टीचा मला कोण अभिमान होता! आणि वारंवार याचा उल्लेख करणं मला आवडत असे. (असे हा भूतकालीन शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे.) एकदा असंच मैत्रिणी घरी जमल्या असता 'आजकालची मुलं' असा नेहमीचा कधीही शिळा न होणारा विषय आम्ही चवीनं चघळत होतो, तेव्हा मी माझी खूपदा घासलेली रेकॉर्ड लावली

''माझ्या मुलीच्या अंगाला मी कधीही बोट लावलं नाही मारासाठी! तर थप्पड बाजूलाच राहू द्या!'' आता मैत्रिणींच्या कौतुकाच्या नजरा झेलण्यासाठी मी नजर किंचित उंचावली. तर माझी मोठी मुलगी सरळ म्हणाली, ''थप्पड मारली नाहीस हे खरं आई, पण तू इतकी बोलायचीस. . इतकी बोलायचीस की त्यापेक्षा थप्पड खाणं परवडलं असं वाटायचं!''



यानंतर माझा चेहरा थप्पड खाल्ल्यासारखा किंवा किमानपक्षी जळक्या थालिपिठासारखा झाला असावा. पण मी मैत्रिणींच्या डोळ्यात किंवा आरशात मुळीच बघितलं नाही.

तर 'थप्पड' या शब्दानं मला आठवणींचं गाठवण भरपूर दिलं. तिच्याविषयी सांगत होते.

माझा जावई लिंकन हॉस्पिटलमधून त्याची

ड्यूटी संपवून आला, तोच मुळी अतिशय व्यग्र अवस्थेत.

"काय झालं रे अभिजित?" प्राजक्तानं काळजी वाटून विचारलं.

"अग इतका त्रास झालाय माझ्या मनाला! काही विचारू नकोस."

प्राजक्ता तशी शहाणी बायको आहे. मला तिनं खूण केली की खायला काहीतरी दमदमीत कर. पोटोबा खवळला असेल त्याचा. मीही शहाण्या सासूसारखी उठले नि साजुक तुपातला काजू-बेदाणे घातलेला शिरा केला. मुलगी बाळंत असल्यानं शिरा नि कॅलरीज बिलरीज डॉक्टरांच्या घरातही माफ होतं! शिराबिरा पोटात गेल्यावर माझ्या जावयाला अंमळ बरे वाटले. अंघोळ झाल्यावर तर तो टक्क ताजा झाला नि म्हणाला, "ईस्ट ऑर वेस्ट! इंडिया इज द बेस्ट."

मनात आलं, शेवटी मायदेश तो मायदेश! मग मात्र माझा जावई बोलता झाला.

"आज एक पेशंट आला होता. हार्ट ॲटॅक ॲट दि एज ऑफ फोर्टी! का? ठाऊक आहे? एक थप्पड! लाखमोलाची थप्पड!"

"म्हणजे? सांगतोस काय?" प्राजूचे बाबा आश्चर्यानं म्हणाले.

"सांगतो, सांगतो. सगळं सांगतो." असं म्हणून अभिजितनं त्या थपडेची कहाणी साद्यंत सांगितली. तीच तुम्हाला सांगतेय. लाखमोलाची अमेरिकन थप्पड!

जॉन सिम्प्सन हा वेल्डिंगचं काम करणारा कुशल कारागीर दिवसभराचं काम करून घरी गेला, तेव्हा त्याचं डोकं आऊट व्हायची वेळ आली. साहजिकच होतं ते. त्याचं तेरा वर्षाचं 'बाळ' सर्व विषयांत नापास झालं होतं. आपल्या बाळाचं ते प्रतापी प्रगतिपुस्तक बघितल्यावर त्याच्यातला बाप खवळून न उठला तरच नवल!

जगभरातल्या कुठल्याही बापानं जी प्रतिक्रिया व्यक्त केली असती तीच.. आणि तशीच या अमेरिकन बापानंही व्यक्त केली

खाडकन आपली हस्तमुद्रा त्यानं आपल्या बाळाच्या गालावर उमटवली.

"मी दिवसभर कष्ट करून पैसा कमावतो. तुमची पोटं भरतो. तुमची शिक्षणं करतो. त्याचं हे बक्षीस?" तो भसाभसा ओरडला.

एव्हाना बाळ मिकीचा गाल भप्प सुजला होता. किती झालं तरी एका कुशल वेल्डरची थप्पड होती ती! त्यामुळे सुजल्या गालावर पाचही बोटं वेल्ड झाल्यागत शिक्कामोर्तब करून होती. नंतर बापाला थोडं वाईट वाटणं साहजिकच होतं! पण त्यानं ते मिकीला दाखवलं नाही. दुसऱ्या दिवशी जॉन नेहमीसारखा कामावर गेला आणि मिकी नित्याप्रमाणे शाळेत गेला.

त्याचा गाल अजूनही पूर्वस्थितीला आलेला नव्हता. आणि त्यावरल्या मुद्रा

काल लाल नि आज निळ्या दिसत होत्या.

''काय रे हे?'' त्याच्या शिक्षकांनी मिकीला विचारलं.

''बाबांनी मारलं!'' मिकीचं प्रामाणिक उत्तर.

''मारलं? अरे वा! नापास कां झालास याची कारणं शोधून त्यावर उपाय करायचे की मारायचे? नि तेही असं अघोरी? मारणं हा दंडनीय गुन्हा आहे हे ठाऊक नाही काय तुझ्या बाबांना, आँ? थांब! त्यांना चांगलाच धडा शिकवतो मी!''

मास्तर एका दमात तावातावानं बोलले.

''शिकवा शिकवाच सर! त्यांनाही कळू दे. की त्यांनाही कुणी तरी धडा शिकवू शकतो म्हणून!'' मिकी लगोलग उत्तरला. कालच्या थपडेचा राग त्याच्या मनातून अद्याप उतरला नव्हता.

शिक्षकही वस्ताद!

उतावळे!

गेले की सरळ पोलिसात.

आणि केली की लेखी तक्रार.

केवळ पोरगं नापास झालं.. तेही महिन्याच्या महिन्याला घेण्यात येणाऱ्या फालतू परीक्षेत.. तर बापानं मुलाला बेदम मारलं. वाटल्यास खात्री करून घ्या. त्याचा सुजलेला गाल नि त्यावरले निळे वळ.. तुम्हाला या 'प्रसादाची' ग्वाहीच देतील. बालमनावर असे निर्घृण आघात करणं हा कायद्यानं दंडनीय गुन्हा असल्याकारणानं आणि मिकीचा कर्तव्यदक्ष शिक्षक म्हणून हे पोलिसांच्या कानावर घालणं माझं आद्यकर्तव्य असल्यानं मी हा गुन्हा लेखी स्वरूपात नोंदवीत आहे. यावर त्वरित कार्यवाही व्हावी ही विनंती.

आपला

XXX

आता आपले पोलीस असते तर त्यांनी त्या मास्तराला समजावलं असतं, 'अरे बापच तो! पोरगं नापास झालं तर भडकवणारच मुस्काटात! त्याशिवाय धाक बसतो का पोराला? लाडानं पोरं बिघडतात मास्तर!'

मुळात मुलांना थोडा मार हा हवाच! अशी आमची समजूत असते ना!.

पण ते पोलीस पडले अमेरिकन. त्यातून त्या दिवशी त्यांच्या भागात कमी तक्रारी झाल्या असाव्यात. किंवा ही एकुलती एक तक्रार असावी. कारण त्यांनी मास्तरची तक्रार लगेच हातावेगळी करायची ठरवली की!

पोलीस थेट जॉनच्या कामाच्या ठिकाणी गेले आणि त्यांनी जॉनला त्या 'थप्पड

गुन्ह्यासाठी' अटक केली.

वर तीन हजार डॉलर दंड ठोठावला. करा हिशेब!

छत्तीस गुणिले तीन हजार!

एक लक्ष ८ हजार रुपये.

बाप रे बाप!

कुण्या बापानं आपल्या सख्ख्या पोराच्या थोबाडीत मारल्यावर त्याला झालाय असा दंड?

''बाबा, मी पुन्हा असं करणार नाही. मला मारू नका मी पुढल्या परीक्षेत तुम्हाला सर्व विषयांत पास होऊन दाखवतो की नाही बघा! आजपासून मी अभ्यासाला लागतो!''

इ.इ... काऽही नाही!

संस्कृतीमधली तफावत म्हणतात ना ती हीच! तर. . मिकीचे बाबा जॉन सिम्पसन यांना हे अटक वॉरंट नि हा दंड (दणदणीत!)... ती रक्कम!. . सारं ऐकून गरगर न झाली तरच नवल. ते जे चक्कर येऊन पडले ते थेट पोलिसांच्या गाडीतून लिंकन हॉस्पिटलमध्ये दाखल झाले.

माझ्या डॉक्टर जावयाच्या ताब्यात.

रोगनिदान झालं.

भावनेचा उद्रेक!

आणि...

आणि हार्ट ॲटॅक!

मिस्टर जॉन यांच्यावर अभिजितनं उपचार तर चालू केले. .

पण...

घरी आला तो अतिशय अस्वस्थ होऊन! आपल्या दीड महिन्याच्या मुलाकडे बघून तो पाळण्यात डोकावत म्हणाला

''ओजूबेट्या.. . या देशात जर तुला वाढवायचं असेल तर अंगाला हात लावायची मला मुळीच परवानगी नाही. इथली थप्पडही लाखमोलाची असते बच्चमजी!''

यावर मी नाक फुगवून म्हणणार होते... की भारतात असूनही मी माझ्या मुलीना कधी बोट सुद्धा लावलं नाही. पण.. प्राजक्ताकडे बघून मी तो मोह आवरला! हो.. नाहीतर म्हणायची... इतकी बोलायचीस... की त्यापेक्षा एक थप्पड परवडली!

आणि भारतात मला त्यासाठी अटक झाली नसती... की दंडही!

# ऑपरेशन बाळंतिया

न्यूयॉर्कच्या अतिभव्य रस्त्यावरून रस्ता चुकलेले आम्ही हिंडत होतो. जावई चक्रधर होता. मुलगी पुन्हा पुन्हा नकाशा बघत होती. आपण कुठली लेन चुकवली त्याचा शोध घेत होती. शेवटी गाडी रस्त्याच्या कडेला लावली आणि शांत चित्ताने पुन्हा नकाशा बारकाईने बघितला... तो अर्थात लेकीनं आणि जावयानं. माझ्या नवऱ्याची अस्वस्थता मला जाणवत होती. पण त्या निर्मनुष्य रस्त्यावर देवाचा धावा करण्यापलीकडे आम्ही काही करू शकत नव्हतो. देवा धाव...

इतक्यात 'तो' आला एका जपानी माणसाच्या रूपात. त्याची गाडी त्याच्या कंपाउंडच्या बाहेर काढत होता म्हणूनच बोलण्याइतपत दिसला. 'हेल्प.' माझा जावई त्याच्यापाशी पोचला. फ्लशिंग हॉस्पिटलचा पत्ता विचारला. ''फॉलो मी!'' तो म्हणाला. आणि सुरू झाला मग दोन मोटारींचा पाठलाग. वेगवान. मधे दुसरी कार येता कामा नये. हा 'हरवला' तर काय घ्या?

सापडले एकदाचे! आमचा देवदूत खाली सुद्धा न उतरता विस्तीर्ण रस्त्यावर सुसाट वेगात निघून गेला.



हॉस्पिटलमध्ये पहिलाच दणका 'आईला.'

मॅटर्निटी वॉर्डमध्ये जायला आईला परवानगी नाही? का नाही? मी कित्ती चिडले तरी उपयोग काय?

नाही म्हणजे नाही. ओन्ली हजबंड! नाहीतर कोच!

कोच म्हणजे बाळंतपणात कळाबिळा कशा घ्याव्यात त्याचं ट्रेनिंग देणारा!

म्हटलं, हाय रे दैय्या! मला माझं प्राजक्ताच्या वेळचं बाळंतपण आठवलं. वेणा सुरू झाल्या आणि

सावरकर वाड्यातनं मी नि अक्का पायी पायी पाटणकर हॉस्पिटलमध्ये गेलो. कळा किती जोरदार असतात याची पूर्ण कल्पना नव्हती मला. (तशी कोणत्या पहिलटकरणीला असते म्हणा!) मी जोरात कण्हत होते.

''अक्का, डॉक्टरांना ताबडतोब बोलाव.'' अक्काच्या मागे लकडा लावीत होते. शेवटी तिथली दाईच माझ्यावर डाफरली, ''आगं गप. अजून लई टाईम हाय तुला. डाक्टर शिनिमाला गेलेत.''

''सिनेमाला? काय कमालै?'' मी किंचाळले, पण उपयोग नव्हता. ते सिनेमा बघून आल्यावरही कितीतरी वेळ गेला नि रात्री दोन सदोतीसला मी आई झाले

सव्वीस वर्षापूर्वीचा तो 'इतिहास' आठवीत मी अस्वस्थपणे कोचावर बसून भीमरूपी महारुद्राचं आकरं घातलं. सकाळी सात ते सव्वादहा! जावई खाली आला.

''झाली?''

''छे! अजून कळा यायचं इंजेक्शन दिलं नाही.''

मी अगदी नर्व्हस. तिला कळाच येत नव्हत्या. त्या याव्यात म्हणून परत माझी आकरी सुरू झाली.

मधेच मला एकदम हसू आलं.

ब्रह्मचारी मारुतीला कां बरं मी परत परत वेठीला धरीत होते? बिचारा! रात्री साडेदहापर्यंत त्या कोचावर बसून मी उबून गेले. नाही म्हणायला मधे तासभर मला लेकीजवळ 'मोठी मेहेरबानी' म्हणून बसू देण्यात आलं होतं!

साडेदहा. माझा नवरा नि जावई चिनी जेवण खात शेजारच्या कॅंटीनमध्ये बसले होते. इतक्यात रिसेप्शन काउंटरवरला ओरडला,

''देशपांदी.''

मी ताडकन उठले, ''देशपांदी नाही, देशपांडे. माझीच मुलगी.'' मी त्याला म्हटलं त्याचा कोरा चेहरा बघून तीच रेकॉर्ड इंग्लिशमध्ये वाजवली. त्यावर तो दुष्ट हसला.

''नो मदर! ओन्ली हजबंड.''

माझा अगदी तिळपापड झाला. पण त्याचं त्याला तिळभरही सोयर नव्हतं. इतक्यात 'हजबंड' आले नि वर धावले अकरा वाजून दहा मिनिटांनी तो खाली आला, तेव्हा त्याचा अवघा चेहरा बाप झाल्याचं बोलत होता.

''झाली?''

''हो. सुखरूप सुटका झाली मुलगा झाला.''

माझे डोळे झरझर वाहू लागले. मारुतीला वंदन करून मी रिसेप्शनला विचारलं.

अर्थात इंग्रजी फाडत.

''आता बघता येईल का बाळ आजी आजोबांना? आम्ही केवळ तेवढ्यासाठी सात समुद्र ओलांडून लेकीकडे आलो आहोत.''

''ओन्ली टेन मिनिट्स.''

टेन तर टेन! चला...

म्हणत लेकीकडे गेलो. श्रांत, क्लांत, तृप्त. तिचा चेहरा कुरवाळला आणि म्हटलं...''बाळ कुठाय?''

जावई बाळांच्या खोलीकडे आम्हाला घेऊन गेला. तिथे ओळीनं अकरा बाळ होती. त्यांच्या डोक्याशी एका उभ्या दांड्यावर त्यांच्या नावाच्या पाट्या होत्या. चिनी, जपानी, मेक्सिकन, अमेरिकन बाळांची वेगवेगळी नावं! आपलं पटकन दिसलं. ओजस देशपांडे! इथलं बारसं आधीच करावं लागतं ना! आत्यानं कानात कुर्र्र्र करून नाव सांगायची गोड पद्धत अमेरिकनांना मंजूर नसावी.

सगळं कसं फास्ट!

दोन्ही नावं आधीच नोंदवा.

मुलगा झाला तर हे!

मुलगी झाली तर ते!..

''अहो, आपलं बाळ बघा.''

नातवाकडे बोट करीत मी नवऱ्याला म्हटलं आणि बाळाला नजरेनं न्हाण घातलं.

माझ्या नवऱ्याला परत लेकीला भेटायची इच्छा झाली... आणि तो मागे वळला. त्यानं नेमकं चुकीचं दार ढकललं नि तो डॉक्टरणींच्या रेस्टरूममधे शिरला.

बापरे!

वाक्बाण सटासट सुटले नि तो घाबरून जो बाहेर पळत आला तो प्राजक्ताच्या गायनॅकॉलॉजिस्टच्या डोक्यावरच आदळला.

थोड्या गरमागरमीनंतर परत एकदा लेकीचं दर्शन घेऊन आम्हाला बाहेर काढण्यात आलं.

पुढे दीड महिन्यानंतर मी कॅलिफोर्नियात गेले. माझी भाची अरुंधती हिला न्यूयॉर्कमधल्या अजबकथा ऐकवल्या; तर ती हसतच सुटली.

''इथे आमच्या स्टेटमधे आख्खी फॅमिली लेबररूममधे आली तरी चालते.'' ती म्हणाली.

मी चाटच पडले.

इथे प्रत्येक स्टेटमध्ये कायदे वेगवेगळे!

''बाळंतपण बघायला नवरा, आई, बाप, कोच सगळ्यांना परवानगीय इथे. इतकंच काय मावशी, आईचं मोठं मूल आईची डिलिव्हरी बघू शकतं, आपलं भावंड कसं जगात आलं ते!'' ती म्हणाली. मग स्वत:च्या वडिलांना तिनं विचारलं, ''बाबा, तुम्हाला बघायचं आहे का बाळंतपण?''

अरुंधतीलाही नववा लागला होता.

''छे छे! काहीतरीच काय?'' वासुदेवराव तातडीनं म्हणाले.

''मावशी, इथे तर बाळतीण होतानाची व्हिडिओ फिल्म पण काढतात.'' अरुंधतीनं सांगितलं.

मला अगदी कसंसंच झालं. आपण लग्नाची व्हिडिओ फिल्म काढतो. अलीकडे अलीकडे बारसं, वाढदिवस अशा पण व्हिडिओ फिल्म काढतात. पण बाळंत होतानाची व्हिडिओ फिल्म?

आणि नंतर ती एकत्र बसून सर्वांनी बघायची?

शिव! शिव!

''अग मावशी, गेल्या आठवड्यात मी चेकअपला गेले होते तर लेबर वॉर्डात एकच धावाधाव चालू होती. जी बाई बाळंत होणार होती तिला आपल्या बाळंतपणाची व्हिडिओ फिल्म हवी होती... आणि नवऱ्याच्या व्हिडिओ कॅमेऱ्यातली बॅटरी वीक झाली होती. हिनं कळा आवरून धरल्या. बॅटरीसाठी आरडाओरडा नुसता! शेवटी एकदाचं मनासारखं झालं नि बॅटरी लागली.

''हं... आता करा सुरू!'' असं म्हणून बाईसाहेब जोर देऊ लागल्या. बोला आता!''

''काय बोलू?'' मी अवाक् होऊन म्हटलं.

बाळंतपण– प्रसूती- या प्रकाराकडे कितीही वस्तुनिष्ठपणे बघितलं तरी 'हा' प्रकार काही माझ्या पचनी पडण्यासारखा नव्हता.

''आऊताई, आपण असली फिल्म नाही करायची बरं का!'' निरुताईने– माझ्या मोठ्या बहिणीने अरुंधतीला दटावले.

''छे छे.... आई, तू काळजी करू नकोस.'' ती हसत म्हणाली.

''अमेरिकन माणसं कसली थेरं करतील...'' बहीण बडबडली.

''थेरं म्हणू नकोस हं आई.'' तिनं माझ्या बहिणीला मधेच अडवलं.

''खयाल अपना अपना म्हण!''

आम्ही फक्त खांदे उडवले.

## अगतिक

लेकीकडे येऊन दोन महिने झाले होते. इतका बर्फ पडत होता की बाहेर कुठे जायची म्हणून सोय नाही. मेची आठ तारीख उजाडली आणि प्रसन्नतेचा सागावा घेऊन सूर्यदेवांनी दर्शन दिलं. न्यूयॉर्कमधल्या विषम हवामानाला कंटाळलेले आम्ही त्या सूर्यदर्शनाने उल्हसित झालो.

‘आता हां हां म्हणता बर्फ वितळेल. तुम्ही आता फिरायला बाहेर पडायची तयारी करू लागा.’ लेकीनं फर्मान काढलं. आम्हालाही कितीतरी गोष्टी बघण्याची उत्सुकता होती. वर्ल्ड ट्रेड सेंटर, चायना टाऊन, म्युझियम, एंपायर स्टेट बिल्डिंग, झू आणि सर्वात महत्त्वाचा म्हणजे स्वातंत्रदेवतेचा पुतळा. स्टॅच्यू ऑफ लिबर्टी!

‘सगळ्यात आधी आपण स्टॅटन आयलंडला जाऊया हं! मला स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा बघायचा आहे.’ मी म्हटलं. यांनीही आनंदानं होकार भरला. लेकीनं हातखर्चाला तीस डॉलर्स दिले. ते घेऊन आम्ही निघालो. सबवेनं जाऊन, फेरी बोटीनं प्रवास करून इच्छित स्थळी पोहोचलो. तेव्हा मनात समाधानाची लहर उमटली. कारण आपणहून आम्ही दोघांनी केलेला इथला हा पहिलाच प्रवास होता. न्यूयॉर्कच्या अवाढव्य जंजाळात आमची दोन टिंबं मिसळली होती.



स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा! अतिभव्य शिल्प! समुद्रलाटांनी वेढलेले मनोहारी चारशे पन्नास पायऱ्यांचा संकल्प. आहे चढायची तयारी? तर करा सुरुवात. मग थेट स्वातंत्र्यदेवतेच्या मुकुटातून परिसराची भव्यता देखता डोळा दिसेल. एका बाजूला न्यूयॉ... ...का बाजूला न्यू जर्सी! जर चढताना दमणार असाल ...र तिच्या परकराच्या घेरापर्यंत लिफ्टने चला. आणि ...डक्यात समाधान माना. सगळ्या सूचना वाचून मी

याना म्हटलं, 'इतक्या लाब, सातासमुद्रापलीकडला हा स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा आपण कशाला पुन्हा बघायला येणारोत? हिमत करू नि चढू. वणीची देवी बघायला नाही का चढत?' यांनी मला आनंदानं संमती दिली नि आम्ही चढाई केली अपूर्व आनंदाचा ठेवा घेऊन खाली उतरलो. तेव्हा माझा आखडलेला डावा गुडघा मोकळा झाला होता. खूप बर वाटत होतं, पण पाय बोलू लागले होते. आम्ही अंमळ झाडाच्या सावलीत कठड्यावर विसावलो. आणि कण्हल्यासारखा आवाज ऐकू आला.

'हे बघ, रडून काही उपयोग नाही. रडणं हा उपाय नाही. ती फक्त दुर्बलता आहे '

मराठी शब्द ऐकून कान सजग झाले. मान गर्रकन वळली. नाकात चमकी, केसात अबाड्यावर माळलेलं फूल, चांगली साडी, गळ्यात मंगळसूत्राबरोबर लक्ष्मीहार आणि अगदी नऊवारी साडी. बाई तर भल्या घरातली दिसत होती. चेहऱ्यावर खानदानी तेज होतं गृहस्थाना पूर्णचंद्र टक्कल होत. पण तरतरीत नाक, गोरापान रग आणि उंचेला खणखणीत आवाज यानं ते लक्षवेधी दिसत होते.

बाईचा गळा दाटून दाटून त्यांना रडण्याचे उमाळ्यावर उमाळे येत होते. ते बघून मला अगदी कससच झाल. मी माझ्याही नकळत त्यांच्यापाशी सरकले. दुसऱ्याच्या सुखदु:खात नाक खुपसायची अमेरिकनांची पद्धत नाही. प्रत्येकाचं सुख दु:ख ही ज्याची त्याची खासगी मालमत्ता! पण आपलं तसं असतं का? छे! प्रतिक्षिप्त क्रिया घडावी तशी मी त्यांच्या अगदी जवळ गेले नि बाईच्या खांद्यावर थोपटलं. दोन साड्या... भले एक गोल. .एक नऊवारी! पण परदेशी एकदम जवळच्या झाल्या.

'काय झालं? मी जाणू शकते का?' मी अत्यंत आपुलकीनं विचारलं, अपमान झेलायची तयारी ठेवून. पण माझा भिजला स्वर त्या जोडप्याला जवळचा, आपला वाटला असावा. हेसुद्धा एव्हाना आमच्यात मिसळले होते.

'हिला परत भारतात जायचं आहे.' त्या गृहस्थांनी म्हटलं

'मग? अडचण आहे का काही?' मी विचारलं.

'अडचण सगळीच! म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही.'

'म्हणजे?'

'आम्ही सगळं विकून टिकून इकडे आलो आहोत. मुलाच्या आग्रहाखातर.'

ती बाई आता थोडी सावरली होती.

'एकुलता एक आहे आमचा शंतनू. खूप मोठा इंजिनिअर आहे कॉम्प्युटरमधला. दहा खोल्यांचं घर आहे त्याचं इथे. सून आहे आम्हाला. लग्न करून घ्यायला भारतात आला होता तो दोन वर्षामागे. आम्हीच बघितली होती ही मुलगी. सुरेखा!

नावासारखी सुरेख आहे अगदी–'

मी त्या कठड्यावर त्यांच्या अगदी निकट बसले होते 'आमचीही मुलगी इकडे असते. सर्जन आहे. तिचा नवरा लिंकन हॉस्पिटलमध्ये शिकतो नि नोकरी करतो. तोही भारतात एमडी झालाय. आमच्या लेकीला नुकतंच एक छोटं बाळ झालंय. दीड महिन्याचं झालं आता. तिच्या बाळंतपणासाठी तर आलोय आम्ही दोघं सात समुद्र पार करून. माझी रजा मे संपेपर्यंत आहे. नंतर मात्र थांबता नाही येणार.' मी एवढी सगळी माहिती सांगितली ती त्यांना मोकळेपणा वाटावा म्हणून.

'भाग्यवान आहात.' त्या म्हणाल्या. 'आम्ही इथलं नागरिकत्व घेतलंय आणि आता कण कण मरत जगतो आहोत.'

'दुसऱ्या देशात येणं सोपं आहे, पण इथे रुजणं कर्मकठीण आहे. आमचा मुलगा चांगला आहे. सूनही चांगली आहे, पण आमचं वय वाईट आहे.'

'म्हंजे? मी समजले नाही.'

'मधूनमधून बरं वाटेनासं होतं. इथली विम्याची पॉलिसी या वयात आम्हाला मदत करीत नाही आणि औषधांची भली थोरली भयभीत करणारी रक्कम आमच्या मुलाला परवडत नाही.'

त्या गृहस्थांचं बोलणं ऐकून मी आणि माझे पती सुन्न झालो.

'आम्हाला बरं नाहीसं झालं की सुनेच्या कपाळावर आठ्याच आठ्या उमटतात. मुलगा त्रासतो. नंतर दहादहा दिवस ती दोघं आमच्याशी बोलत नाहीत. खूप अपराधी वाटत राहातं.'

'म्हणून मी यांना इकडे घेऊन आलेय, आज हट्ट करून. म्हटलं, स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्याजवळ तरी यांना बुद्धी होऊ दे परत भारतात जायची.' बाई आर्त झाल्या होत्या.

'पण जायचं कुठे? धर्मशाळेत?'

'थोडेफार पैसे आहेत ना हो? मग एक खोली घेऊन राहू. नाहीतर देवाची आळंदी आहेच! पण चला. आपण आपल्या मातीत मरू!' त्यांना परत रडण्याचे कढ येऊ लागले.

तिथून उठवत नव्हतं आणि तिथे बसवतही नव्हतं. त्या गृहस्थांचं नावही मला ठाऊक नाही... ना त्या बाईचं. इतकंच काय, त्यांनाही आमचं नावगाव कुठे ठाऊक होतं? पण वेदना जाणायला नावगावाची खरंच गरज असते का? छे! मला तरी तसं वाटत नाही. पुन्हा कधी ती भेटतील? शक्यता नाही वाटत. उरात जाणवते ती फक्त सहवेदना!

## बॉब दि बेस्ट

भू-प्रवास २० २५५८३

बॉब आम्हाला डिस्नेलॅंडला भेटला. भव्य डिस्नेनगरीत आम्ही प्राण्यांची परेड बघायला उत्सुकतेनं उभे होतो. आमच्या शेजारीच हा उभा होता. दोन्ही हात आडवे पसरून त्यानं मोठ्ठी जागा अडवली होती. सहा फूट दोनतीन इंच असावा. कारण त्याच्या शेजारी मी अगदीच जाडं टिब वाटत होते.

''इंडिया?'' साडीधारी मला बघून त्यानं उत्सुकतेने विचारलं. मला आता या प्रश्नाची सवय झाली होती. किंबहुना सगळ्यांनी असं विचारावं म्हणून मी सार्वजनिक ठिकाणी आवर्जून साडीच नेसून जात होते.

''येस.'' मी हसून म्हटलं. तोही हसला. मग नावगाव झालं. प्राथमिक परिचयही!

''कोणी येणार आहे का?'' मी विचारलं.

''हो. म्हणून तर जागा अडवून उभा राहिलो आहे. चार मेंबर्स अजून यायचे बाकी आहेत.''

''ओह्... म्हणजे तुमची फॅमिली!''

''म्हटलं तर फॅमिलीच...'' तो इतकं बोलतो आहे तोवर एक नऊ वर्षांची मुलगी वेगात धावत आली आणि तिनं 'बॉऽऽब' असं म्हणत त्याला धडक दिली. तिच्यापाठोपाठ तिच्याहून थोडेसे मोठे नि एकासारखे एक दिसणारे छापाचे गणपती बॉबच्या उजव्या डाव्या खांद्याला लटकले. मी ते दृश्य डोळ्यात सामावते आहे तोच एक पस्तीसच्या आसपास असलेली टिपिकल अमेरिकन रंगाची शेलाटी नि उंच बाई हात फैलावून बॉबकडे सरकली. मुलं बाजूला झाली नि एकमेकांशी मस्ती करू लागली. बॉबनं त्या बाईला कुशीत घेतली. तिनं अगदी आम्हा दोघांसमोर त्याचा मुका घेतला. मुलांना त्याचं काहीही वाटलं नाही. ती आपल्यातच दंग होती.



''थँक्यू बॉब. थँक्यू सो मच. यू मेड माय चिल्ड्रन हॅपी टुडे.'' ती गहिवरून म्हणाली. तिचे डोळे पाण्यानं टच्च भरले होते. बॉब तिला थोपटत होता.

मी ते सारं बघून बुचकळ्यात पडले. बॉबच्या ते लक्षात आलं असावं. थोड्याशान ती स्थिरस्थावर झाली. बॉबपासून विलग झाली.

बॉबनं माझ्याकडे बघून म्हटलं,

''मिली, या डॉ. वाड. लेखिका आहेत आणि हे त्यांचे पती. हे दंतवैद्य आहेत.''

तिनं आमच्यापाशी हस्तांदोलन केलं.

''इंडिया?'' तिनं मला नेहमीचा प्रश्न विचारला मी हो म्हटलं.

''ही माझी मैत्रीण मिली. माझ्यासारखीच लॉसएंजेलिसमधल्या युनिव्हर्सिटीत लेक्चरर आहे. फरक इतकाच की ती अर्थशास्त्र शिकवते आणि मी शारीरिक शिक्षण हा विषय घेतो. मी मिलीच्या मुलांचाही मित्र आहे.''

इतक्यात ती जगप्रसिद्ध ॲनिमल परेड वाजत गाजत आमच्या दिशेने येऊ लागली. एकच गर्दी उसळली. मिलीच्या धाकट्या मुलीला ती रंगीबेरंगी परेड नीट दिसावी म्हणून बॉबनं तिला खांद्यावर घेतली. वॉल्ट डिस्नेच्या सगळ्या कॅरॅक्टर्स भूमीवर अवतरल्या होत्या आणि चक्क बाळगोपाळांशी हस्तांदोलन करीत होत्या. चीत्कार, जल्लोष यांनी सारं वातावरण भरून नि भारून गेलं होतं.

परेडचा मनमुराद आनंद उपभोगून आम्ही मोठी माणसं सुद्धा काही वेळ वय विसरलो.

''चला, आपण बरोबरच पिझ्झा खाऊया. मी तुम्हा दोघांना आमंत्रण देतोय.'' बॉब म्हणाला.

''थँक्यू!'' आम्ही त्याच्या आमंत्रणाचा अतिशय आनंदानं स्वीकार केला।

पॅपरोनी पिझ्झा खाता खाता बॉब आणि आम्ही कितीतरी गोष्टी बोललो. बॉब डोल आणि बिल् क्लिंटन ह्यांच्या चुरशीच्या लढतीपासून ते त्यावेळी भारतात नरसिहा राव यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यापर्यंत. माझ्या मुलींबद्दल मी त्याला उत्साहान सांगितलं. एक मुलगी सर्जन, एक अभिनेत्री... हे ऐकून बॉब म्हणाला, ''तू एक कृतार्थ मॉम आहेस मला आनंद वाटतोय.''

मिलीच्या डोळ्यात पाणी आलं. ''माझी मुलं आत्ता कुठे जरा स्थिरावली आहेत. कोणत्या कोणत्या प्रसंगातून त्यांना जावं लागलं याची आठवण झाली तरी माझे डोळे भरून येतात. विजया, माझा नवराही याच... आमच्याच युनिव्हर्सिटीत पदार्थविज्ञान या अवघड विषयाचा प्रोफेसर होता. पण महासंशयी! मी कुठे जाते,

कुणाशी काय बोलते, किती बोलते. . सगळ्याचा संशय! माझ्यावर हात टाकायला सुद्धा तो कमी करीत नसे.''

''काय सांगतेस?'' मला मोठं आश्चर्य वाटलं. इतक्या प्रगत देशात, इतकं शिक्षण घेतलेली एक प्राध्यापक बाई नवऱ्याचा मार खात तीन मुलं होईपर्यंत त्याच्या जवळ राहत होती?

''आश्चर्य वाटल ना तुला?'' तिनं माझा चेहरा न्याहाळीत मला विचारलं. मी स्पष्ट कबुली दिली.

''मी सगळं काही माझ्या ह्या छकुल्यांसाठी सहन करीत राहिले. लग्न झालं नि वर्षातच मी विल आणि नीलला जन्म दिला. ह्या जुळ्या मुलांची उस्तवार करता करता शर्ली पोटात राहिली. त्यांच्या डोक्यावरचं बापाचं छत्र काढून घेण्याची काही माझी इच्छा नव्हती. पण पुढं पुढं माझा नवरा मला कोंडून ठेवून कॉलेजातही जाऊ देईना तेव्हा हा माझा मित्र माझ्या मदतीला धावला. आय ॲम ग्रेटफुल टु बॉब.''

''आता शर्लीचे बाबा कुठे असतात?'' मी विचारलं

''त्याला गर्दचं व्यसन लागलंय. ही इज हॉस्पिटलाइज्ड.''

''मिलीशी घटस्फोट झाल्यावर त्याला एकदम रिकामपण आलं. मिलीवर पाळत ठेवण्यात त्याचा दिवसाकाठचा सारा वेळ बांधला गेला होता. तो मोकळा झाला. टॉम व्यसनाधीन झाला. हळूहळू व्यसन इतकं वाढलं की त्याची प्राध्यापकी गेली '' बॉबनं सांगितलं.

''पण बॉब दर संध्याकाळी... जवळपास रोज... टॉमकडे जातो. काऊन्सेलिंग करतो. त्याला गोष्टी वाचून दाखवतो आणि सुट्टीच्या दिवशी मला नि माझ्या मुलाना वेळ देतो. आम्हाला आनंद देतो. आता माझी मुलं खूप सुखात आहेत. निर्धास्त आहेत. इट्स ऑल बिकॉज ऑफ धिस व्हेरी व्हेरी नाईस फ्रेंड ऑफ माईन.'' मिलीनं बॉबचा डावा हात उचलला आणि आपल्या डोळ्यांना लावला.

ती खूपच भावनावश झाली होती. बॉब मात्र मंद हसत होता. ''बॉबवर मी अन्याय करतेय असं मला खूपदा वाटतं. खरं तर माझ्यासाठी, माझ्या मुलांसाठी इतकं सार करणाऱ्या बॉबशी मी लग्न करायला हवं. त्यालासुद्धा असंच वाटतं कधीतरी मग रुसून बसतो तो.''

''का करीत नाही मग तुम्ही लग्न? तुमची जोडी अगदी मेड फॉर ईच अदर आहे '' माझे पती म्हणाले.

''डॉक्टर, मला लग्न या प्रकाराची दशहत बसली आहे. टॉम माझा प्रियकर

होता! तेव्हा सारं कसं सुंदर होतं, पण तो नवरा झाला नि सारंच बिनसून गेलं. चोवीस तास जेव्हा दोन भिन्न वृत्तींची माणसं एकत्र येतात तेव्हा ती एकमेकांच्या आयुष्यावर कुरघोडी करायचा प्रयत्न करतात. मग त्यातला एक वाघ होतो नि दुसरा कोकरू. आयुष्यभर घाबरून राहाणारं. आता कुठे मी शांत, स्वस्थचित्त झाले आहे. निर्भर आयुष्य जगतेय. डॉक्टर, मला सतत भीती वाटते की चोवीस तास एकत्र राहाण्याचा आयुष्यभराचा करार मी आणि बॉबनं केला तर आमच्या नात्यातला हा गोडवा संपून जाईल. ही कोवळीक जळून जाईल. संवेदनाशून्य, कायद्यानं बांधलेलं... बांधलेलं कसलं? जखडलेलंच नातं पुन्हा एकदा तयार झालं तर ते सहन करायची माझी तयारी नाही होत मनाची!''

''इट्स ओके डार्लिंग. मी कधीही हट्ट करणार नाही. फक्त वाट पाहीन.'' बॉब म्हणाला.

एकमेकात हरवून गेलेल्या त्या दोन मित्रांकडे बघताना माझे डोळे मात्र गच्च भरून आले होते.

## टिकलेलं लग्न!

माझ्या मुलीचे दिवस अगदी भरत आले होते. पोट चांगलंच उतरलं होतं. तरी फिरण्याचा आमचा व्यायाम मात्र नियमित चालू होता. खालच्या मजल्यावर राहणारी माझ्याच वयाची 'नेली' एव्हाना माझ्या तोंडओळखीपलीकडच्या परिचयाची झाली होती.

म्हणजे आल्या आल्या प्राजक्तानं तिचा माझा परिचय करून दिला तेव्हा तिनं घट्ट आवळून माझा पापा घेतला होता. प्राजूनं बाबांचा परिचय करून दिला तेव्हा ती रिपीट परफॉरमन्ससाठी पुढे झाली तेव्हा मी जोरात खाकरले.

ह्यांना माझ्या खाकरण्याचा अर्थ बरोबर समजला. नेलीचा पापा हुकला. ह्यांनी समंजसपणे नमस्कार केला.

''दॅट इज द वे वी ग्रीट इन इंडिया.'' मी माहिती पुरविली.

''वेरी नाईस हजबंड.'' असं प्रशस्तिपत्र हिनं माझ्या नवऱ्याला ताबडतोब देऊन टाकलं. आता हिला पहिल्याच दृष्टिक्षेपात ह्यांच्यातलं चांगुलपण कसं कळलं ते मला मुळीच कळलं नाही.

बायकांना दुसऱ्यांचे नवरे नेहमीच अतिशय चांगले वाटतात हे मला ठाऊक असल्यानं मी स्वत:ची समजूत घातली.

तर त्या दिवशी बाहेर एकसारखं बर्फ पडत असल्यानं मी प्राजूला म्हटलं,



''ताई, आज तू भरल्या दिवसांची अशी बाहेर नको ग पडूस. मला काळजी वाटते. रस्ते निसरडे झालेयत.''

''ठीक आहे. मी घरी थांबते. बाबा थांबतील माझ्या सोबतीला. त्यांना नाही फिरलं तरी चालेल. त्यांनी आपलं शरीर बघ कसं मेंटेन केलंय. पण

तुला चाललंच पाहिजे. जा बघू. नेली आंटीबरोबर जा आज.''

निघाले मी. डॉक्टर लेकीचं फर्मान! टाळणार कसं? स्वत:च्या वाढलेल्या शरीराचा एकदम राग आला.

''अग मूठभर हृदयावर किती हा ताण?'' माझ्याकडे बघून लेकीन असे उद्गार काढले की मला खूपच नर्व्हस व्हायला व्हायचं. म्हणून तर न्यूयॉर्कभर फिरत सुटले होते मी. किती रस्ते पाठ झाले होते मला.

मी खाली उतरले नेलीला विचारलं.

''येतेस का? आज मी अगदी एकटीय. मोकळी असलीस तर चल मला आनंद वाटेल. एक मोठी रपेट मारून येऊ.''

''तुझा नवरा?''

''मुलीजवळ थांबलाय.''

''व्हेरी नाईस हजबंड.'' ती कौतुकानं म्हणाली.

''हं.''

''चल. जाऊया.'' ती घर काळजीपूर्वक बंद करून निघाली. रस्त्यावर भुरूभुरू हिमवर्षाव होत होता. आमच्या हातमोज्यांवर नि पुलओव्हरवर हिम बरसत होतं त्याचा अननुभूत आनंद घेत मी जपून पावलं टाकीत होते

''तुमच्याकडे हिम पडतं?''

''मुंबईत नाही. तिथं फक्त घामाच्या धारा लागतात. पण मला तरीही मुंबई फार आवडते.'' मी म्हटलं.

''साहजिक आहे. तुझ्या नवऱ्याचं गाव ते!''

''नवऱ्याचा काय संबंध?'' मी विचारलं.

''नवरा ही केवढी मौल्यवान चीज आहे ते सतत नवरा बाळगणाऱ्या स्त्रीला कळायचं नाही.'' ती बडबडली.

''म्हणजे?''

''तू बाळंतपणाला नवरा बरोबर घेऊन आलीस ते फार चांगलं केलंस.''

''मग काय करणार! इथे धुणी, भांडी, केर, लाद्या, स्वैपाक, अंगाला लावणं, बाळाचं न्हाण, धुणं सारं काही स्वत:च करावं लागतं असं कळलं म्हणून मदतीला घेऊन आले. माझ्या एकटीच्यानं निभाव लागला नसता नेली. आमच्या भारतात सर्व कामाला माणसं मुबलक मिळतात.''

''तसं नाही ग. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे नवरा टिकवणं.''

''म्हणजे?'' मी न समजून विचारलं. लग्नाला पंचवीस पंचवीस वर्षं होऊन

गेल्यावर नवऱ्याला टिकवायचं ते काय? कळेचना.

"बाई ग... मी माझ्या लेकीच्या बाळंतपणाला मेक्सिकोत गेले होते तीन वर्षापूर्वी. केवळ चार महिने होते बघ. तेवढ्यात इकडे माझ्या नवऱ्यानं दुसऱ्या बयेशी सूत जमवलं आणि. " नेलीनं नाक रुमालात शिकरलं नि डोळे पुसले.

"काय सांगतेस काय नेली?" मला इतकं विचित्र वाटलं हे सगळं. अगदीच अतर्क्य!

"सोडून गेला तो मला! मी लेकीचं बाळंतपण करून आले तर म्हणतो कसा. मला एकटं टाकलंस . म्हणून असं झालं. म्हणजे त्याच्या चुकण्याचं खापर वरती परत त्यानं माझ्याच डोक्यावर फोडलंन. म्हणून माझं मन बघ, हळवं हळव होऊन गेलंय अगदी. जो भेटेल त्याला नि तिला मला एकच सांगावंसं वाटतं. बायांनो, नवरे सांभाळा! त्यांना काखोटीला मारून फिरा."

मला आता वेड लागायची पाळी आली होती.

"एवढा आघात माझ्यासाठी पुरेसा नव्हता बर वीज!"

"का? आणखी काय झालं नेली?"

"तिकडे मेक्सिकोत माझ्या मुलीला तिचा नवरा सोडून गेला ग! एक चिमुकलं बाळ तिच्या फ्रॉकात टाकून."

"काय सांगतेस काय?"

"खरंच वीज. ती आणखी वेगळीच ट्रॅजिडी झाली. तिला अंगावर चांगलं दूध यावं, तिच्या बाळाला सगळी व्हिटॅमिन्स, प्रोटिन्स आईच्या दुधातून मिळावी म्हणून मी मुलीला एक्स्ट्रा कॅलरीजचं रिच फूड दिलं ना! त्यामुळे जाडी झाली माझी मुलगी. जरा जास्तच जाडी झाली. मी तिथे असतानाच त्यांच्या मारामाऱ्या चालू होत्या. मीच मधे पडायची. म्हणायची, मूल जरा मोठं होऊ दे; मग ती जाईल जिम्‌मधे. होईल पहिल्यासारखी बारीक. तू काळजी करू नकोस."

"मग?"

"त्यानं अल्टिमेटम दिलन. सहा महिन्यांचं. पण नाही झाली बिचारी बारीक!"

"बाप रे ! अशा गोष्टीसाठी घटस्फोट मिळतो?"

"अग घोरणाऱ्या नवऱ्याला आमच्या बायका नाही सोडत का? मग हे तर केवढं व्हॅलिड रीझन आहे! आणि घटस्फोटाची वाट बघतात कुठे नवरे? सरळ पळून जातात. तुमच्यात रस नसलेला नवरा तुमच्या जवळ राहून तरी उपयोग आहे का काही? सांग तू! तुम्हाला तो शिवणारही नसेल तर काय फायदा? अं?"

मला थंडीतही घाम फुटला!

आम्ही घरी आलो.

माझ्या नवऱ्याकडे मी अतिशय प्रेमभरानं बघितलं. आपल्या नवऱ्याचं अस्तित्व आपण इतकी वर्षं... अगदी इतकाली वर्ष... किती बिनधास्तपणे गृहीत धरून चाललो आहोत, याचा मला त्या क्षणी विलक्षण विस्मय वाटला.

टिकलेल्या लग्नाचा अभिमान मनात दाटून आला. बायको मुलीचं बाळंतपण करायला अमेरिकेत गेली म्हणून आजवर कुणा भारतीय नवऱ्यानं उतारवयात दुसरं लग्न केल्याचं एकही उदाहरण मी ऐकलं नव्हतं तरी! बायकोचं एका बाळंतपणातच होणारं चुरमुऱ्यांचं पोतं भारतीय नवरे इमाने इतबारे आयुष्यभर सांभाळनात हे ठाऊक होतं तरी! माझ्या प्रेमळ नजरेनं हे कावरेबावरे झाले आणि त्यांनी मला विचारलं, ''अशी काय बघतीयस? तब्येत बरीय ना?''

माझ्या सात्त्विक नवऱ्याचा खरं तर मला मुका घ्यायचा होता. पण लेकीकडे बघून तो मोह आवरला.

## निरोप

वैद्यकाकांना अखेरची घरघर लागली होती. मी, हे, माझ्या दोन्ही मुली, हिरालाल शहा हे चित्रपटनिर्माते, संवेदना ही छोट्या पडद्यावरली अभिनेत्री आणि तिचा तरुण मुलगा सुकुमार! वैद्यकाकांच्या अवती भवती उभे होतो. काकांची पत्नी उज्ज्वला छोट्या पडद्यावर लहानमोठ्या भूमिका करणारी गुणी कलाकार होती. पण चार वर्षापूर्वीच तिचं निधन एका बसअपघातात झालं होतं. अगदी दुर्दैवी अंत. एका मुलाला खिडकीजवळची जागा हवी होती. हिनं ती दिली. वैद्यकाका नि उज्ज्वला उटी बघायला गेले होते. बस कलली नि जवळ जवळ लवंडली. क्लीनरनं अर्धवट बंद केलेला दरवाजा धाडकन उघडला नि फक्त उज्ज्वला बाहेर फेकली गेली. गेली ती गेलीच. तसूभर जखम नाही. कुठे अस्थानी मार लागला एक ईश्वरच जाणे! उटीहून वैद्यकाका एकटे परत आले. अगदी एकटे झाले. एक हजार स्क्वेअर फुटांच्या ब्लॉकमध्ये भुतासारखे राहायला लागले.

तशी त्यांना दोन मुलं होती. अनया आणि आनंद अनया गणिताची प्राध्यापिका आहे न्यूयॉर्कमध्ये. आनंद कॉम्प्युटर इंजिनियर आहे सिॲटल येथे. दोन अत्यंत कर्तबगार, अत्यंत हुशार मुलांचा पिता आपले अखेरचे क्षण मोजीत होता.



त्यांचे ओठ हलले. क्षीण स्वरात ते आपल्या मुलांना हाक मारीत होते. डॉक्टरांनी खूण केली. माझी मोठी मुलगी पुढे झाली. अनया होऊन त्यांच्याजवळ गेली. सुकुमार पुढे सरकला. आनंद होऊन वैद्यकाकांना बिलगला.

त्यांची प्राणज्योत क्षणकाल मोठी झाली आपल्या अनया आणि आनंदला कुशीत घेऊन वैद्यकाकांनी सुखाने प्राण सोडले.

''थॅंक्स. डॉक्टरांनी दोन्ही मुलांना थोपटलं.''

''फार ध्यास घेतला होता काकांनी दोघा अपत्यांचा. पण अनयाची बोस्टनला कॉन्फरन्स होती आणि तिचा पेपर तिला आजच तिथे वाचायचा आहे. आज रात्री तिचा फोन येईल. वैद्यकाका जिवंत असते तर... पण आता उशीर झाला। '' डॉक्टरांनी एक दीर्घ सुस्कारा सोडला.

''आणि आनंद?'' मी न राहवून विचारलं.

''तो चारच महिन्यांपूर्वी येऊन गेलाय ना! सारख सारखं परवडणार नाही म्हणाला. त्या ऐवजी त्यानं एक लठ्ठ बॅंक ड्राफ्ट मात्र पाठवलान. काकांची एसी रूम, स्पेशल नर्स, औषधं, उत्तमातली उत्तम वैद्यकीय सेवा. यासाठी!''

''पुढे काय करायचंय?'' ह्यांनी व्यवहारी प्रश्न विचारला. डॉक्टर क्षणभर विचारात पडले. मग म्हणाले, ''वाडसाहेब, आता कुणासाठी आणि कशासाठी थांबायचं? काकांची इच्छा होती की त्यांना विद्युतदाहिनीत दहन करावं; तेव्हा हर्समधून सायनला न्यायचं सरळ.''

''अहो पण अनया, आनंदला फोन तर करू.'' संवेदना म्हणाली. उज्ज्वलाची ती खास मैत्रीण होती.

''ॲज यू विश!'' डॉक्टरांनी खांदे उडवले. त्यांच्या रिसेप्शनिस्टनं अनयाचा बोस्टनचा नंबर दिला. आनंदचा रेसिडेन्सचा नि ऑफीसचा असे दोन्ही नंबर दिले. आम्ही एसटीडी आयएसडी बूथवर गेलो.

''चारपाचशेला तरी फोडणी बसेल. नाही ग विजया?'' संवेदना म्हणाली. तिचं खरं होतं. दोनदोन आयएस्‌डी कॉल्स.

''आपण फिफ्टी फिफ्टी करू.'' मी म्हटलं.

''त्यापेक्षा एकच कॉल करू. आनंदला. तो अनयाला कळवेल. वाटल तर बोस्टनचा नबर देऊया म्हणजे झालं.'' संवेदना म्हणाली.

''ओके पण त्या एका कॉलचेही फिफ्टी फिफ्टी करूया.''

''ॲग्रीड.''

आम्ही दोघी बूथवर पोचलो. फोन नशिबानं पटकन लागला. आनंद स्वत: फोनवर भेटला. त्यामुळे फार बरं वाटलं

''आनंद, वैद्यकाका गेले!''

''केव्हा?''

''आत्ताच. आत्ता इथे दुपारचे बारा वाजताहेत.''

''इकडे रात्रीचे बारा वाजतायत.''

''हं. असेल. पण वीस मिनिटांपूर्वी काकांची प्राणज्योत मालवली.''

''तुम्ही?''

''हं. मी वाडकाकू बोलतेय.''

''बाबांना पीसफुल डेथ आली ना काकू?''

''हो. तशी पीसफुलच म्हणायला हवी. पण तुमची आठवण काढीत त्यांनी प्राण सोडला.''

''दॅट इज बट नॅचरल! काकू... आय हॅड सेंट मनी.''

''हो. म्हणाले डॉक्टर.''

संवेदना अस्वस्थ होत होती. म्हणाली, ''येतोय का विचार ना? पटकन विचार.'' मी हो हो असा इशारा केला.

''तू येतोयस उत्तरक्रियेला?''

''नाही काकू. आय थिंक डेड बॉडी इतका वेळ ठेवणं काही बरोबर नाही. आणि आता काय उपयोग? बाबा काही आम्हाला आता पाहू शकणार नाहीत.''

''हो. तेही खरंच म्हणा!''

''काकू, मी अनयाला कळवतो. ती सध्या एका सेमिनारसाठी बोस्टनला गेलीय. पेपर रीडिंग करून ती बाबांना भेटायला भारतात येणार होती. पण नाऊ इट इज ऑफ नो यूज. तुम्ही उत्तरक्रिया करा. म्हणजे तसे पैसेबियसे मी भरपूर पाठवलेयत. नो वरी. डॉक्टर कुलकर्णीकडेयत.''

''बरं.''

''काकू, थँक्स.''

''इट इज ओके आनंद.''

''काकू, मी चुकत नाही ना?''

मी स्तब्ध झाले. मी यावर काय बोलणार? मृत्यू पावलेल्या बापाची उत्तरक्रिया हा प्रश्न 'भावनिक' पातळीवर सोडवायचा की 'व्यावहारिक' हा किती वैयक्तिक प्रश्नय नाही का?

मी फक्त एक दीर्घ उसासा सोडला.

''एनी वे, काकू, बाबांच्या नावानं फिफ्टी थावजंडचं एक फिक्स डिपॉझिट करून एका डिझर्विंग पेशंटला त्याचं इंटरेस्ट द्यायला सांगा डॉक्टर कुलकर्णींना. ही हॅज डन अ लॉट फॉर माय फादर.''

त्याचा कंठ दाटून आला. मग तो घाईने म्हणाला,

''बरंच बोललो आपण. आयएस्‌डी कॉल आहे. काकू, ह्याचे पैसे निस्संकोचपणे

डॉक्टर कुलकर्णींकडून घ्यायचे. मी भरपूर पाठवले आहेत. त्यांच्याकडे. प्रॉमिस?''

मी परत गप्प झाले.

''काकू, प्रॉमिस?''

''प्रॉमिस.''

''ठेवतो काकू. बाबांना इथूनच प्रणाम करतो. आय ॲम ग्रेटफुल टु ऑल ऑफ यू.''

फोन बंद झाला.

''नाहीच ना येत?'' संवेदना म्हणाली.

''चारशे पासष्ट....'' बूथवरून आवाज आला.

पैसे चुकते करून आम्ही हॉस्पिटलला गेलो. डॉक्टर कुलकर्णींना पूर्ण कल्पना होतीच. हर्स आली. शव चढलं.

सुन्न मनानं आम्ही विद्युतदाहिनीपाशी पोहोचलो.

''मा, शेवटच्या क्षणी मी वैद्यकाकांचा आनंद झालो होतो नि प्राजक्ता अनया झाली होती. आम्हा दोघांना मिठीत घेऊन त्यांनी प्राण सोडला. आता आम्ही दोघंच त्यांना अखेरचा निरोप देतो.'' सुकुमार संवेदनाला म्हणाला. प्राजू नि सुकुमारनं वैद्यकाकांचा देह विद्युतदाहिनीत लोटला. माझा नवरा गीतेचे श्लोक म्हणत होता नि मी डोळे पुशीत उभी होते.



# काही महत्त्वाचे पत्ते

1. Orlando Int. AYH Hostel.
   at Planiation Manor.
   227 North. Eola Drive.
   Orlando. Florida.

2. Hotel Travelodge.
   Int. National Drive
   Orlando. 1-800-675-1610.
   (Collect call-free)

3. Youth Hostel-Naigara Falls-
   Int. AYH Hostel.
   1101. Ferry Ave. Rt. 62 &
   Memorial Parkway N-Falls. 14301
   Phone: 716-282-3700.

4. Int. National AYH Hostel
   1009-11th St. N. West. Washington
   DC. 20001 1-202-737-2333.

5. Tour Mobil- For W.A.D.C.
   202-554-5100

6. White house Visitors Information Centre-
   Phone 202-523-3847
   (For the Video film of the white house)

7. White house Ticket Collection
   Phone : 202-456-7041.

8. Anaheim Courtsey Lodge.
   414 West Ball Rd. Anaheim
   California- 92805
   Tel. 1-800-999-1367
   (Free Call)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 220
२९५०३
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

9. Rajive Tirodkar
YHAI National Exe. Member.
State Secretary.
Maharastra State Br. of YHAI
109 Swapnapurti.
Dr. Babasaheb Ambedkar marg.
Parel Naka, Mumbai- 400012.

10. Upendra Shah
Argyle Travels & Tours,
Passport, Vissa, Hotel Booking,
Domestic Int. National Ticketing
15 / B East West Villa,
Nana Chowk, Grant road,
Mumbai- 400 007.
Tel. 386 1976 / 388 1193 / 385 8443.

11 Sameer Vidya- Guru Raj Travels.
4, Ram Chandra Nivas, Ram Maruti Rd.
Near Baby Buscuit Mart, Dadar.
Mumbai- 28.
Phone: 4327169.

## लक्षात ठेवण्याजोग्या गोष्टी

१. टॅक्स्या वॉशिंग्टन डीसी व न्यूयॉर्क सोडता रस्तोरस्ती धावत नाहीत. त्यांचे बुकिंग अगोदर करावे लागते.
२. आपण सिलेक्ट केलेल्या प्रत्येक प्रेक्षणीय स्थळासाठी प्रतिदिन किमान १०० डॉलर्सची खर्चाची तरतूद खिशात हवी.
३. विमानतळावरले लॉकर्स वापरा नि मजेत 'हलके' होऊन फिरा.
४. यूथ हॉस्टेल्सचे लॉकर वरल्यापेक्षाही स्वस्त! वापरा.
५. चिनी जेवणं, बर्गर्स, पिझ्झा आणि फ्रेंच फ्राईज मुबलक खा. खिशाला परवडतात. सर्व जागी हे खाणे मिळते.
६ अमेरिकेतही टॅक्सीवाले मीटर सोडून डील करतात, हे लक्षात असू द्या.
७. अमेरिकेतल्या रस्त्यावरल्या खरेदीत बार्गेनिंग चालते.

अच्छा! आपला प्रवास सुखाचा होवो!

REFBK-0029503
REFBK-0029503